म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
सं. क्र. ७४२८
RFFBK-0000853

ॐ नमः शिवाय.

# श्री सिद्धारूढस्वामींचें चरित्र.

( कानडी वरून हें मराठी भाषांतर. )

परशराम सिताराम सबनीस

हेड मास्तर मराठी शाळा हुबळी

यांनीं केलें

तें जिज्ञासू लोकांकरिता

मुंबईंत इंदुप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शके १८३५. ] REFBK-0000853 [ सन १९१३ इ.

किंमत १२ आणे.

हें पुस्तक रा॰ रा॰ दामोदर सांवळाराम यंदे, यांनीं नं॰ ४३४ ठाकुरद्वाररोड मुंबई येथें, " इंदुप्रकाश " स्टीम प्रेसमध्यें मालकाकरितां छापिलें व पर्शराम सिताराम सबनीस यांनीं हुबळी येथें प्रसिद्ध केलें.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

मनुष्य प्राण्यानें जन्माला येऊन इतर जीव कोटीप्रमाणेंच शारीर क्रिया तेवढ्या कराव्या असा ईश्वरी संकेत असता तर त्यानें मनुष्य प्राण्याला इतर प्राण्यापेक्षां अधिक असें जें ज्ञान दिलें आहे, तें दिलें नसतें. ज्या अर्थी त्यानें हें ज्ञान दिलें आहे, त्या अर्थी प्रत्येक मनुष्यानें मी कोण ? कोठून आलों ? मला कोठें जावयाचें ? माझें पुढें काय होणार ? मरण म्हणजे काय ? मेल्यावर काय होतें ? याकरितां माझें कर्तव्य काय ? वगैरे गोष्टींचा विचार केला पाहिजे. हा विचार पूर्वी जे साधुसंत होऊन गेले त्यांनीं करून ठेविला आहे व हल्लीं छापखाने सुरू झाल्यामुळें त्यांचे विचाराच्या लेखाच्या आवृत्यावर आवृत्या निघत आहेत व त्या पुस्तकांतील मजकूर पाठ करून वाटेल तितकें शब्दपांडित्य करितां येतें व प्रतिपक्षास कुंठितही करतां येतें; पण त्याप्रमाणें क्रिया मात्र घडत नाहीं. याला कारण त्या लेखांचें खरें ज्ञान होऊन त्याचें खरें रहस्य समजून घेऊन त्याची साक्ष पटण्यास खऱ्या सद्गुरूची गरज आहे. असे हे श्रीसिद्धारूढ स्वामी महाराज खरे सद्गुरु आहेत. यांचें चरित्र कानडींत १९०९ सालीं तयार झालें. पण निव्वळ मराठी भाषा जाणणारे स्वामींचे भक्त आहेत. त्यांना त्याचा उपयोग होईना. याकरितां त्यांजकडून पुष्कळ लोकांना त्या कानडी चरित्राचें मराठी भाषांतर करण्याबद्दल विनंति करण्यांत आली. व आज एक जण भाषांतर करीत आहे, उद्यां कोणी ओंवीबद्ध भाषांतर

करीत आहे, अशा गोष्टी ऐकूं येऊं लागल्या. शेवटीं वेदांतमालेचे कर्ते रा० वामनराव फणसळकर यांनीं या चरित्रापैकीं पहिल्या एक दोन प्रकरणाचें मराठींत भाषांतर करून तें त्यांनीं केलेल्या स्वामीच्या मराठी चरित्रांत प्रथम देऊन पुढें इतर माहिती व त्यांना सहवासानें स्वामी संबंधाच्या ज्या गोष्टी माहीत होत्या त्या त्यांत दाखल केल्या. व श्रीस्वामी-महाराजांचें एक मराठी चरित्र छापून तयार केलें! पण कानडी चरित्रांत काय लिहिलें आहे हें जाणण्याची मराठी भक्त लोकांची इच्छा तशीच राहिली. तेव्हां मला जरी कानडी चांगलेसें येत नाहीं तरी एकवेळ चरित्र साधारण वाचून त्यांत काय विषय आहेत हें पाहिलें व शेवटीं पुनः एक वेळ वाचून त्याचें मराठी भाषांतर लिहून काढिलें आणि स्वामीस वाचून दाखविलें. त्यांनीं बरें आहे असें सांगितल्यावरून हल्लीं तें रा. रा. वसंतराव आनंदराव दाभोळकर यांचे मदतीनें छापण्याची व्यवस्था झाली.

ह्या चरित्रांत २।३ ठिकाणीं स्वामीकडून चमत्कार घडले असें मूळ-चरित्रकारांनीं दाखविलें आहे. त्याबद्दल मी रा० रा० वामनराव फणसळ-कर यांचे प्रेरणेवरून खुद्द स्वामीस विचारिलें. तेव्हां जिज्ञासूनें त्याचा लौकिक अर्थ घेऊं नये. अज्ञानी मनुष्याला श्रद्धा उत्पन्न व्हावी म्हणून तें दिलें असेल. तिळाचीच गोष्ट घ्या. ते खरे तीळ न मानतां नामरूपीं तीळ असें मानावें. महिषीबद्दल एक गोष्ट आहे ती रागरूपी महिषी असें समजावें. या प्रमाणें बाकीच्याही चमत्कारांचा जिज्ञासूनें परमार्थपर अर्थ लावावा.

या पुस्तकांत प्रथम कानडी चरित्राचें मराठी भाषांतर दिलें आहे. मूळ चरित्रांत प्रत्येक प्रकरणाचे आरंभीं व शेवटीं एकेक श्लोक आहे. पण त्या प्रकरणाशीं त्याचा संबंध नाहीं फक्त त्याचा परमार्थपर अर्थ आहे म्हणून त्या श्लोकांचें मला आलें तसें कविताबद्ध मराठी भाषांतर करून तें या चरित्राचे शेवटीं ३१ वें प्रकरण घालून दाखल केलें आहे.

एथें काय आहे. स्वामींचा चरित्रक्रम कसा आहे वगैरे जाणण्याचीही भक्त मंडळीस आवश्यकता असते म्हणून त्याची माहिती ३० वे प्रकरणांत दिली आहे.

रा० रा० बाबा गर्दे यांनीं केलेलें महाराजाविषयींचें पद, व इतर कांहीं पदें व अभंग वगैरे ३२ वे प्रकरणांत दाखल केलीं आहेत; आणि शेवटीं हल्लीं एथें जी कानडी आरती म्हणतात तिचें मराठी चालींत मराठींत भाषांतर करून ती आरती दिली आहे.

ईश्वरीप्रेरणेनें व पूर्ण सुकृतानें स्वामी महाराजाकडे जाण्याची मला बुद्धि झाली व त्यांची ही अल्प सेवा मजकडून घडली याप्रमाणेंच आणखीही सेवा होवो. मी कोण? कशाकरितां जन्मास आलों? माझें कर्तव्य काय? वगैरे माझी जिज्ञासा तृप्त होऊन जन्म मरण्याच्या फेऱ्यांतून मला मुक्ति मिळो अशी जगन्नियंत्या सदगुरूची प्रार्थना करून त्यास प्रणाम करितों.

मूळ ग्रंथ श्री कबीरदासस्वामी यांनीं रचिला आहे त्या आधारानें हें भाषांतर करून तें प्रसिद्ध करण्याची जीज्ञासा झाली व ती जगापुढें मांडण्याचे कामीं माझे परम स्नेही श्री. रा. रा. वसंतराव आनंदराव दाभोळकर जे. पी. मुंबई यांनीं जें प्रोत्साहन दिलें त्याचेंच हें फल आहे व त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे हें येथें कळविल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं.

हुबळी,<br>ता. २५-१०-१२

सर्वांचा नम्र दासानुदास,<br>परशराम सिताराम सबनीस.

# अनुक्रमणिका.

| प्रकरण नंबर. | प्रकरणाचें नांव. | पृष्ठें. |
|---|---|---|
| १ | समभाव–तिळाची गोष्ट. .... .... .... | २ |
| २ | महिषी व बालक संजीवन. .... .... .... | ४ |
| ३ | मुलांस उपदेश. .... .... .... .... | ६ |
| ४ | बालवैराग्य व गृहत्याग. .... .... .... | ८ |
| ५ | स्नेहांचा ( अंपक अधिकाऱ्यांचा ) त्याग .... | १२ |
| ६ | सद्गुरू प्राप्ति. .... .... .... .... .... | १५ |
| ७ | सद्गुरूपदेश. .... .... .... .... .... | १७ |
| ८ | तीर्थाटन आरंभ व समाधि सिद्धि .... .... | २० |
| ९ | कावेरी तीरीं शयन. .... .... .... .... | २२ |
| १० | कर्मठांच्या कर्मांचा तिरस्कार. .... .... .... | २५ |
| ११ | उत्तम शिष्यांस उपदेश. .... .... .... | २८ |
| १२ | तीन शिष्यांस उपदेश. .... .... .... | ३१ |
| १३ | कनकद्वाराचें दर्शन. .... .... .... .... | ३४ |
| १४ | गोकर्ण क्षेत्र भैरवलीला. .... .... .... | ३७ |
| १५ | नानातीर्थाटन. .... .... .... .... | ४१ |
| १६ | उत्तर दिशेकडील तीर्थाटन. .... .... .... | ४३ |
| १७ | नैय्यायिकोपदेश. .... .... .... .... | ४५ |
| १८ | व्यास काशींत भोजन. .... .... .... | ४८ |
| १९ | सावकारास उपदेश. .... .... .... .... | ५० |
| २० | राम नाम महिमोपदेश. .... .... .... | ५३ |

२१ मारवाड्याचा रोगपरिहार. .... .... .... ५७
२२ भद्राचल व मंगलगीरी पर्वतास गमन..... .... ६०
२३ पंचीकरण विचार. .... .... .... .... ६३
२४ विजापुरांतील गरिबीचा अनुभव. .... .... ६६
२५ एका सद्भक्ताची नम्रता व विजापुर त्याग. .... ७०
२६ पुराणिकास उपदेश. .... .... .... .... ७२
२७ हुबळीस आगमन व तोरवीवाल्याचे विहिरींत कालक्रमण ७७
२८ भीमप्पा उज्जणवर याचे घरीं रहाणें. .... .... ८०
२९ दुष्काळी लोकांस जेवण व उत्सव. .... .... ८५
३० शिष्यांची व इतर माहिती. .... .... .... ८८
३१ कानडी चरित्रांतील पद्यांचें भाषांतर. .... .... ९५
३२ इतर पदें व आरत्या. .... .... .... ....

[illegible]

[illegible]

श्रीसद्गुरु सिद्धारूढ स्वामी महाराज.



वसंतराव आनंदराव दाभोळकर. परशरामपंत सबनीस.

ॐ तत्सत्

अथ.

# श्री सिद्धारूढस्वामींचें चरित्र.

## श्री सिद्धारूढस्वामींचें स्तोत्र.

### अनुष्टुप छंद.

सच्चिदानंदरूपं हि सिद्धारूढयतीश्वरं ।
महावाक्योपदेष्टारं श्रीगुरुं तमहं भजे ॥ १ ॥
यदंघ्रिकमलद्वंद्वं तापत्रयनिवारणं ।
शांतैक्यपददं देवं सिद्धारूढमहं भजे ॥ २ ॥
अहं न जाने त्वत्पादमहिमां करुणाकर ।
भक्तिर्ममास्तु सततं त्वत्पादकमले गुरो ॥ ३ ॥
अक्षरं मंगलं नित्यं वाङ्मनोतीतमव्ययं ॥
अद्वैतं निर्मलं शांतं अचलं शुद्धमीश्वरं ॥ ४ ॥
अक्षरं निर्मलं नित्यं वाङ्मनोती त मव्ययं ।
अद्वैतं त्रिजगत्पूज्यं अचलं शुद्धमीश्वरं ॥ ५ ॥

### आर्या.

श्रीशालीवहनशके गजाष्टशैलेंदुपरिमिते काले ।
आगत्य भ्रूलतिका-नगरं लीलां हि दर्शयामास ॥ १ ॥
संसारजलधिमग्नान् सर्वजनानुपदिशन्सह च्छात्रैः ॥
ज्ञानप्लवेन सुजनान् संसाराब्धेश्च तारयामास ॥ २ ॥
तच्चरितं सुमहद्भुतमखिलोद्धारार्थमद्य कथयामि ।
दोषा यदि विद्यंते विद्वांसो भूषयंतु गुरुकृपया ॥ ३ ॥

## प्रकरण १ लें.

श्रीमद्ब्रह्मविचार-साधक अशा या भरतभूमिनांवाच्या स्त्रियेला शिरोभूषणाप्रमाणें शोभणारे या विदुरकोटिनांवाच्या ग्रामांत शिवचरणकमलीं लीन असा गुरु शांतप्पानांवाचा महात्मा रहात होता. त्याची देवमल्लम्मा नांवाची प्रतिव्रताग्रेसर, सूर्यासारखी तेजस्वी व चंद्राला जशी रोहिणी तशी पत्नी होती. ही नवरा बायको शिवध्यानतत्पर राहून, अतिथी, अभ्यागत यांचा परामर्ष घेऊन श्री नंदिकेश्वराची पूजा करीत आनंदानें कालक्रमणा करीत होतीं. भुकेल्यास अन्नदान देऊन शेषप्रसाद ग्रहण करून तसेंच शिवकथाश्रवण, व सच्छास्त्राध्ययन यांच्या योगानें विवेकवैराग्यसाधनसंपन्न होऊन रहात असतां, केवळ मोक्ष-साम्राज्य शिवगुरु श्रीवीरभद्रस्वामी यांच्या करकमलापासून उत्पन्न झालेल्या गुरुपूजेंत तत्पर होऊन आपलें निजस्वरूप जाणून भक्तियुक्त अंतःकरणानें रहात असतां श्रीमज्ज्ञानानंदैश्वर्ययुक्त अशा सद्गुरु वीरभद्रस्वामींनीं त्या दंपत्याला ब्रह्मात्मैक्योपदेश प्रतिपादिलेल्या शून्यसंपादन वगैरे वचनग्रंथांचा उपदेश केला आणि त्यांना लिंगांगसामरस्य भावांत निःसंदेह केलें. ह्या दंपत्याच्या पोटीं तीन मुलगे झाले. त्यांपैकीं वडील दोघांना व्यव-हारांत घालून, लहान असलेला सिद्ध त्याला आपल्याजवळ बस-वून नेहमीं गुरुवाक्यश्रवण करवीत असतां सिद्धाला पांच वर्षें झालीं. एके दिवशीं कूडलसंगम नांवाच्या देवाच्या वचनशास्त्रांत लिंगैक्य विचार निघाला असतां, बालक असा सिद्ध म्हणाला कीं, मी लिंगैक्य व्हावें म्हणून मनांत निर्धार करून सर्व ठिकाणीं सम-भाव ठेवून रहातों. पुढें एके दिवशीं मुलांबरोबर खेळत असतां, मुलांनीं तीळ मागितले; पण तीळ शिंक्यावर एका गाडग्यांत

ठेविले होते, त्या ठिकाणीं हात पोंचेना. म्हणून एका काठाने त्या गाडग्यास खालीं भोंक पाडून, त्या भोंकांतून तीळ गळूं लागल्यावर खालीं धोतर धरिलें व त्यांतील तीळ, जमलेल्या सर्व मुलांस दिले; तरी धोतरांत तीळ होतेच. गांवांतील प्रत्येक मुला-जवळ बरेच तीळ आहेत असें लोकांनीं पाहून, हे तीळ कोठून आणले म्हणून विचारितां त्या मुलांनीं "गुरुशांतप्पाचा मुलगा सिद्ध यानें आम्हांस दिले" असें सांगितलें. तें ऐकून, बाहेर बसलेल्या देवमल्लमाला विचारून ते घरांत गेले आणि पहातात तों दीड पायली तीळ मावणाऱ्या गाडग्याच्या खालीं बरेच तीळ सांडले आहेत, व मुलांजवळही पुष्कळ तीळ आहेत. तें पाहून ती मुलास म्हणाली, मुला हें काय केलेंस? तेव्हां तो म्हणाला, मी काय केलें; तुझेंच पायाचा हा प्रसाद. आईला आश्चर्य वाटून ती मनांत म्हणाली, हा कोणी तरी आवतारिक पुरुष आहे किंवा प्रत्यक्ष देवांश आहे; आपण धन्य आहों. नंतर ती एके दिवशीं सिद्धाला शाळेस जा असें म्हणूं लागली; तेव्हां तो म्हणाला आंत, बाहेर, चोहोंकडे शिवध्यानरूपी शाळा असल्यावर आणखी कोणत्या शाळेस जावयाचें? अझून कोणत्या शाळेस जावें म्हण-तेस? आई, विद्यार्थ्यानें विद्येचा अभ्यास करावा; परंतु विद्या-मूर्तीनें विद्येचा अभ्यास करणें म्हणजे सरस्वतीनें विद्वानांची अपेक्षा करणें, चंद्राला दुधानें न्हाऊं घालणें किंवा सूर्यापुढें मशाल धरणें अथवा लक्ष्मीला धनिकाची गरज लागणें, अशासारखें हें आहे. हें त्याचें बोलणें ऐकून देवमल्लमा आपल्या मनांत म्हणाली कीं, ह्या माझ्या मुलाचीं हीं वाक्यें कल्पित नसून; मंत्रवाक्येंच आहेत. असा मुलगा माझ्या पोटीं झाल्यामुळें, माझा गर्भ सफल झाला व मी धन्य झालें.

## प्रकरण २ रें.

पुढें एके दिवशीं हा पांच वर्षांचा सिद्ध म्हशीच्या पाठीवर बसून, मुलांना ' या, या ' मी हत्तीवर बसलों आहे, म्हणून तुम्ही निरनिराळीं वाद्यें वाजवीत मला मोठ्या समारंभानें बोलावून न्या; असें म्हणाला. तेव्हां सर्व मुलांनीं बरें म्हणून त्या म्हशीस माराबयास आरंभ केला; परंतु ती पुढें पाऊल टाकीना. तेव्हां वर बसलेला सिद्ध म्हणाला कीं, ज्या अर्थीं ही चालत नाहीं; त्या अर्थीं ही न चालण्यासारखीच होवो. असें म्हणतांच ती म्हैस तेथेंच पडली, तें पाहून सर्व मुलें घाबरलीं व देवमल्लमाकडे गेलीं; तुझी म्हैस मरणोन्मुख केली, अशी सिद्धाची चाहडी त्याच्या आईजवळ सांगितली. हें मुलाचें बोलणें ऐकून सिद्धाची आई त्याला म्हणाली, ' सिद्धा, तूं न भीतां गाभणी म्हैस मारलीसना ? अगबाई ! आतां काय करावें, असें म्हणत रडत असलेल्या आपल्या आईस पाहून सिद्ध म्हणाला. आई तुला म्हैस पाहिजे असेल तर इतकें दुःख करण्याचें कारण नाहीं. असें म्हणून म्हशीला स्पर्श करून ' शिवायनमः ' असें म्हणतांच ती म्हैस उठून उभी राहिली. तें पहाण्याकरितां गांवांतील लहानापासून म्हाताऱ्यापर्यंत सर्वजण आले. आणि तें आश्चर्य पाहून म्हणाले कीं ' अहाहा, हें बालक, ईश्वर, विष्णु सदाशीव किंवा ऋषीश्वर कोण आहे हें आम्हांस समजत नाहीं ' मग ते मोठ्या भक्तीनें डोळेभर त्याला पाहून चित्रासारखे उभे राहिले.

नंतर कांहीं दिवसांनीं एके दिवशीं सर्व मुलांना सिद्ध म्हणाला आपण सर्वजण आज स्नानाला जाऊं. लागलेंच सर्वजण तळ्याकांठीं जमले; आणि सर्वजण पाण्यांत खेळूं लागले; तेव्हां सिद्ध

सर्वांच्या पुढें जाऊन जलक्रीडा करूं लागला आणि आपल्या मागें उभ्या राहिलेल्या मुलांना बोलावूं लागला. तेव्हां एक मुलगा म्हणाला कीं, सिद्ध मी तुझ्याबरोबर तळ्याच्या मध्यभागीं मात्र येणार नाहीं मग सिद्धानें त्या मुलाला धरून मध्यभागीं नेऊन बुडविण्याचें ठरविलें. इतक्यांत सर्व मुलांनीं सिद्धालाच बुडविण्याचा प्रयत्न चालविला; पण सिद्ध न बुडतां त्यानें त्या मुलालाच मोठ्या भोंवऱ्यांत बुडविलें. कारण ही भीति पुढें दुःखदायक होईल; म्हणून आतांच तिचा प्रतिकार केला म्हणजे पुढील दुःख नाहींसें होईल. तेव्हां सर्व मुलें घाबरलीं व सिद्धाला म्हणालीं, तूं त्या मुलास मोठ्या भोंवऱ्यांत बुडविलेंस हा मोठा अन्याय आहे. सिद्ध म्हणाला माझें असेंच ! यांत कसला अन्याय ! पाणी हाच परमात्मा आहे, त्यांत त्याला मग्न केलें व तो भयरहित झाला. ह्या तारकतीर्थांत भय धरणें हा त्याचा अन्याय नव्हे तर काय ? हें तुम्हाला न समजतां तुम्ही मला मात्र नांवें ठेवितां, हें फार योग्य व न्यायाचेंच ना ! मुलें म्हणालीं बरें, बरें, त्याला हें जल तारक (मरणदायक) झालें हा अपराध तुझाच आहे; आमचा नव्हे. अशी मुलांची बोलाचाली चालली आहे, इतक्यांत हीं बातमी त्या मरणोन्मुख झालेल्या मुलाच्या आईस समजली ती धांवत धांवत आली व हाहाःकार करूं लागली; आणि हाय बाळा ! तुला सिद्धानें पाण्यांत बुडविलें. अरेरे, मेलास रे मेलास, असें म्हणून ऊर बडवूं लागली व तोंडावर हात मारून घेत तळ्याचे कांठीं उभी राहिली. तो हाहाःकार ऐकून गांवांतील सर्व लोक गोळा झाले आणि तेथल्या मुलांना विचारूं लागले कीं, हें काय आहे. असला अनर्थकारक खेळ कशाला खेळलात ? मुलें म्हणालीं, हें आम्हीं केलें नाहीं; हें सिद्धानें केलें. मरणोन्मुख झालेल्या मुलाची आई सिद्धाला म्हणाली, बाबा, हा काय

अनर्थ केलास ? आतां मी काय करूं ? तेव्हां सिद्ध म्हणाला,– बाई तुझा मुलगा मेला नाहीं; परंतु तारकतीर्थांत, अखंडानंदांत ऐक्य झाला आहे. तुला पाहिजे तर तूं त्याचें नांव घेऊन हाक मार, म्हणजे तो येईल. देवदत्ता, देवदत्ता, अशी आईनें हाक मारतांच तो मुलगा उठून आला व आईला म्हणाला, मी हृदयाकाशांत सुखांत होतों. मला कां हाक मारिलीस, मला कां बोलाविलेंस ? त्याची आई काकुळतीनें म्हणाली, मुला; दोन–तीन तासपर्यंत पाण्यांत बुडाला होतास, मेलास असें समजून घाबरी होऊन तुला मी हाक मारिली. मुलगा म्हणाला, माझे प्राण देहांतून बाहेर न जातां, डोक्यांतील शिखाचक्रांतर्गत नाडींत राहिले होते व मी ब्रह्मानंदांत निमग्न होतों. ही गोष्ट ऐकून बाकीचे सगळे लोक मोठे आश्चर्यभरित होऊन, मोठ्या भक्तीनें सिद्धाचा जयजयकार करीत आपआपल्या घरीं गेले.

## प्रकरण ३ रें.

पुढें थोड्या दिवसांनीं सिद्धानें मुलांना सांगितलें कीं, ह्या भीमाच्या बागेंत जांभळें पडलेलीं असतात तीं खावयास जाऊं. तेव्हां मुलांना संतोष झाला. सिद्ध सर्वांच्या पुढें मोठ्या झपाट्यानें जाऊं लागला मुलें त्याच्याबरोबर पळूं लागलीं. तरी तो सर्वांच्या पुढेंच ! तेव्हां एकजण म्हणाला अरे, तुला काय वारा वश झाला कीं काय ? किंवा तूं मनोवेगानें जातोस काय ? आहेतरी काय मला सांग. सिद्ध म्हणाला, तुम्ही वायूचे उपासक असता तर तुम्हाला शीघ्रगमनाचें सामर्थ्य आलें असतें, किंवा मन स्वाधीन ठेवणाऱ्या देवाचें ध्यान मनाच्या वेगांपेक्षां त्वरित

गमनसामर्थ्य देईल. असें त्याचें बोलणें ऐकून मुलें म्हणालीं कीं, तुला तसें सामर्थ्य आहे खरें ! पण आम्ही तुझ्यासारखी शक्ति कशी मिळवावी. याकरितां सावकाश चल. इतक्यांत तीं बागेजवळ पोंचलीं आणि तेथें पडलेलीं जांभळें वेंचून खाऊं लागलीं. इतक्यांत सिद्धानें विचार केला कीं हे मायेनें मोहित झाले आहेत, ह्यांची भ्रांति घालविण्याकरितां एकादी मौज करावी. म्हणून त्यानें एक जांभूळ हातांत घेऊन खालीं फेंकलें; तों तेथें जांभुळांची मोठी रास झाली. ती पाहून सिद्धाच्या कृतीचें त्यांना आश्चर्य वाटलें व त्यांनीं तीं जांभळें यथास्थित खाल्लीं व पाहिजे तितकीं आपल्या धोतरांत बांधून घेतलीं; आणि म्हणालीं ही रास कोणी केली ? आम्ही आलों तेव्हां येथें कांहीं नव्हतें. तेव्हां हा परमेश्वराचा महिमा दुसरें काय ?

इतक्यांत सिद्ध म्हणाला तुम्ही ही फळांची रास पाहून वाटेल तितकीं खाल्लीं, पाहिजे तितकीं बांधून घेतलीं. पण ही रास कोणी दिली त्या सर्व जगद्व्यापक ईश्वराचे उपकार मानिलेत काय ? त्याचे उपकार कसे फेडाल ? तेव्हां मुलें म्हणालीं तर मग हीं फळें एथेंच टाकून जाऊं ? सिद्ध म्हणाला फळें मात्र टाकतां पण देवानें दिलेले डोळे कसे टाकाल ! एक वेळ नेत्र झांकतां येतील पण देहासंबंधीं सर्व अवयवांचा अभिमान सोडणें फार कठीण आहे. म्हणून अभिमान सोडाल तर सहजच सर्व-त्यागाचें फळ मिळेल. पण हा त्याग करावयाचा म्हटलें तर देवाचें ध्यान केलें पाहिजे व मग आत्मज्ञान झाल्यावर अभिमानत्याग होईल. इतर उपायांनीं होणार नाहीं. आतां आणखी जांभळें पाहिजेत काय ? तेव्हां मुलें म्हणालीं आनंद झाला. नंतर सर्वजण निघाले तों वाटेंत एक साप मेल्यासारखा पडला होता तो पाहून मुलें भयाभीत होऊन पळूं लागलीं; पण सिद्ध म्हणूं

लागला कीं, हे काय ? हें मन आदिकरून सर्व शरीर ईश्वराचे अवयव होतात; म्हणून तुम्हास वरचेवर उपदेश करींत असतां ईश्वराचें भूषण असलेला हा साप पाहून भयग्रस्त होऊन कोठवर पळाल. देव सर्व दिशेकडे सर्व प्राण्यांत भरला आहे, असें म्हणून लागलेच मुलांना आपल्याजवळ बोलावून धैर्य देऊन म्हणाला. या सर्पाला तुम्हीं भीऊं नका. कारण साक्षात् ईश्वराच्या जटा-मुकुटाचा अलंकार असा हा सर्प आमच्या भक्तीची परीक्षा पहाण्याकरितांच निर्जीव माणसासारखा पडून आमचा विश्वास कसा आहे हें पहात असेल. या करितां हा देवच असें समजून याला नमस्कार करा म्हणजे हा सजीव होऊन वाट सोडून जाईल असा उपदेश ऐकिल्यावर मुलें सिद्धाच्या वाक्यावर विश्वास ठेवून हात जोडून उभीं राहिलीं. तेव्हां तो सर्प जिवंत होऊन रस्ता सोडून निघून गेला ! तें पाहून मुलांना फार आनंद झाला व मोठमोठ्यानें 'ॐ नमः शिवाय' असा मंत्रघोष तीं करूं लागलीं. तो मंत्रघोष ऐकून गांवांतील लोक येऊन विचारूं लागले तेव्हां मुलांनीं सर्व वृत्तांत त्यांना सांगितला. तेव्हां आश्चर्य-मोहित होऊन ते लोक ह्या सिद्धाची पूजा केल्यास सार्थक होईल असा विश्वास धरून, साष्टांग नमस्कार घालून सिद्धाचा जयजयकार करीत घराकडे गेले.

---

## प्रकरण ४ थें.

पुढें कांहीं दिवसांनीं श्रीवीरभद्रस्वामी, गुरुशांतप्पाला व देव-मल्लम्माला जवळ बसवून घेऊन कूडलसंगम देवाच्या वचनांपैकीं वैराग्यप्रकरणाचा बोध करीत असतां. 'भूमि सपाट होईल, मेरू पतन पावेल, आकाशादि पंचमहाभूतांचा नाश होईल, स्वर्गादि-

१० मह

लोक लोकांतराचा प्रलय होईल, असें आहे तरी ह्या भूलोकांतच हे मूढलोक असून हा देह माझे असें समजून भ्रांत मनानें सुख मिळेल म्हणून खटपट करितात. हें सांगितलेलें वचन ऐकून सिद्ध गुरूला म्हणाले पूर्ण आकाश कसें नाश पावतें तें सांगा. तेव्हां गुरु म्हणाले, जाणत्या गुरूकडून समजून घे. तेव्हां बरें तर मी जाणत्या गुरूचा तपास करीन असें म्हणून दुसऱ्या दिवशीं सिद्ध गुरूचा शोध करावयाकरितां प्रवासास निघाले. तेव्हां त्यांचे अत्यंत आवडते असे सोम व भीम या नांवाचें मित्र होते. तें त्याजकडे येऊन म्हणाले कीं हे महात्म्या तूं एवढ्या लहान वयांत कसा बाहेर पडतोस ! तेव्हां सिद्ध म्हणतो; जर सर्व तार्किक मिथ्या आहे तर हें शरीर असेपर्यंतच नित्यवस्तूचा शोध केला पाहिजे नाहींतर मनुष्य जन्म मिळून व्यर्थ होय. याकरितां बाळपणांतच सर्वसंगपरित्याग करून गुरूचा शोध केला पाहिजे. कारण पुढें यौवनकालांत कामक्रोध हे रिपु येऊन, नित्यवस्तूचें ज्ञान होऊं देत नाहींत. तसेंच वृद्धापकाळींही ज्ञान होत नाहीं; कारण मन भ्रांत होऊन स्मरण रहात नाहीं. याकरितां आतांच गुरूचा तपास करण्याकरितां, प्रवासास निघावयाचें आहे. असें आहे तर आम्ही दोघेही तुझ्याबरोबर येतों, असे ते म्हणाले. सिद्ध म्हणाला, ठीक आहे चला; नंतर तीन कोसांवर असलेल्या एका गांवीं ते तिघेजण गेले. दोनप्रहर झाल्यावर, भीम व सोम यांना भूक लागली व ते म्हणाले, या गांवांत आम्हांला जेवावयास कोण घालील ? तेव्हां सिद्ध म्हणाले, तुम्हांस षड्रसान्न भोजन पाहिजे, परमात्म्याचें ध्यानाची वगैरे गोडी नाहीं. तुम्हीं परमात्म्याचें ध्यान करा ? म्हणजे तहान-भूक नाहींशी होऊन, माझ्याप्रमाणें तुम्हाला शांतिसुख मिळेल. या माझ्या शांति-सुखाचा अनुभव तुम्हांला नसल्यामुळें, तुम्हीं अन्नाची इच्छा

करितां! ते दोघे म्हणाले, वरें वरें तूं सांगितलेलें आम्हाला समजत नाहीं. भुकेच्या वेळीं अन्न मिळालें तरच शांति होऊन प्राण रहातील; कारण 'अन्नमय प्राण' अशी पाराशरश्रुति आहे; व प्राणद्वारा मनःशांति, नंतर ध्यान, ज्ञान, वगैरे होतात. सिद्ध म्हणाले, इतकें तात्त्विकज्ञान असून, शिवाचें ध्यान करणें कां विसरतां? भुकेच्या अग्निस्थानीं मन असल्यामुळें असें दुःख होतें. हा ताप सहज दूर होणारा नव्हे; याकरितां ह्याचा पालट करण्याला ध्यान हेंच साधन होय. अन्नादि उपायांनीं एक घटकाभर मात्र शांति येते. पूर्णताप-शांति होत नाहीं. पण ध्यानानें त्रिकाल-तापशांति होईल. कशी ती पहा. ध्यान करणारा प्राणी रेचक, पूरक, ह्या नाडी कडे लक्ष न देतां आनंदनाडींत कुंभकाचा समावेश करून प्राणाचें चलन करीत नाहीं, प्राणाचें चलन झाल्याशिवाय अग्नीची वृद्धि होत नाहीं तो वृद्धि पावला नाहीं तर क्षुधातृषादिताप अन्नावांचून शमतात. हा क्षुधातृषादिताप नाहींसा झाल्यावर मनाच्या आधि, व्याधि नाहींशा होतात. ह्या आधि, व्याधि नाहींशा झाल्यावर पुष्टि, तुष्टि, कांति ह्या स्थूलदेहाला व शांति मनाला प्राप्त होतात. हें मर्म न समजल्यामुळें भुकेनें शरीर कळवळतें. हें योग्य नाहीं. ह्याप्रमाणें उपदेशानें भरलेलें सिद्धाचें भाषण ऐकून असें आहे तर आपण दुसरे गांवास जाऊं असें ते म्हणाले. सिद्ध म्हणाले नळदुर्गास जाऊं, अथवा सदाशिव पेठेस जाऊं? भीम म्हणाला नळदुर्ग दूर आहे. सदाशिव पेठेसच जाऊं. दोनकोस चालत जाऊन ते सदाशिव पेठेस गेले. वाटेनें दमल्यामुळें सोम व भीम विसांवा घेण्याकरितां वृषभेश्वराच्या देवळांत बसले व सिद्ध हे नंदिकेश्वरावर बसले. इतक्यांत पुजारी पूजा करण्याकरितां आला व सात वर्षाचें पोर देवावर बसलेलें पाहून त्याला फार राग

आला. आणि म्हणाला. अरे, तुझी भक्ति काय पाण्यांत बुडाली, कां, काय झालें तरी काय? हें ऐकून न भीतां वीज गडगडली तरी आकाश जसें शांत रहातें. तसें किंवा युद्धाचा दणदणाट चालला असतां पृथ्वी जशी शांत असते, तसें शांतपणें सिद्ध म्हणाले. माझी भक्ति पाण्यांत बुडाली नाहीं. तर देवावरच ठेविली आहे. हें भाषण ऐकून पुजारी फार रागावला व तूं टीचभर नाहींस तर देवावर बसून आणखी गोष्टी सांगतोस तुला लाज वाटते? सिद्ध म्हणाले बरें बाबा तूंच सांग कीं बसणारा मोठा कीं बसविणारा मोठा ह्या वाक्याला काय उत्तर द्यावें हें न समजल्यामुळें त्यानें गांवांत जाऊन कांहीं मनुष्यांला बोलावून आणिलें. तेही त्या मूर्ख पुजाऱ्याप्रमाणेंच रागावले व त्यांपैकीं एकजण त्या मुलाला मारावयास गेला. तों त्याचा हात चौकटीस आपटून त्यांतून रक्त निघूं लागलें. नंतर त्यांपैकीं एकानें त्या मुलाला विचारिलें तू देवावर कां बसलास. मूर्ख लोक स्थावर-बुद्धीनें पूजा करितात. म्हणून त्यांना पुण्य लागत नाहीं! या करितां मी त्याची प्राण प्रतिष्ठा करितो. हें ऐकून हें बोलणें सामान्य नव्हे. महावाक्य केवळ मंत्र असें समजून सर्वजण चकित झाले व मोठ्या भक्तिभावानें नमस्कार करून मंगलस्नान घालून पूजा करून त्यांनीं त्याचा आदरसत्कार केला. नंतर जातेवेळीं त्यांना उपदेश केला कीं, स्थावरपूजेपेक्षां महात्म्याची पूजा श्रेष्ठ आहे कारण परमात्म्याचें मुखच महात्म्याचें मुख होय. म्हणून महात्म्याचे मुखावांचून परमात्म्याचे शांतीला दुसरें द्वार नाहीं. हें कशावरून म्हणाल, तर गर्भाचे शांतीला आईचें मुख हेंच द्वार आहे, दुसरें नाहीं; त्याप्रमाणेंच हें समजा. नंतर तो गृहस्थ मी आजपर्यंत बसवेश्वराची पूजा केली, त्याचें हें फळ असें मानून धन्य झाला.

## प्रकरण ५ वें.

तेथून निघाल्यावर पुढील गांवास जातेवेळीं एका कोसावरच दिवस मावळला. तेव्हां भीम भिऊं लागला व आतां काय करावें ! आम्हांला तूं कोठें घेऊन जातोस ? असें म्हणाला. तेव्हां सिद्ध म्हणाले, दुःख करूं नको. देव आहे, तो ज्या मार्गानें नेईल त्या मार्गानें जाऊं. इतक्यांत सोमाच्या पायांत कांटा मोडला. हा कोण त्रास ! मी तुझ्याबरोबर आलों नसतों तर बरें; आलों, आतां उपाय नाहीं. इतक्यांत अंधार पडला व थोडासा पाऊसही पडला; आणि त्यांना मार्गांत एक देऊळ दिसलें. त्याचा रस्ता सोडून ते दुसरे बाजूस गांव होता, त्या बाजूस वळले. तिकडे रानडुकरें व रानांतले इतर प्राणी ओरडत होते. त्यांच्या कलकलाटानें मुलें आधींच गर्भगालित झालीं होतीं; इतक्यांत सोमाचा पाय निसरून तो खालीं पडला. तेव्हां सिद्ध म्हणाले, तुम्ही गुरुकृपा करून घेण्याकरितां बाहेर पडलां, पण त्याला विसरून देहभावाकडेच लक्ष देऊं लागला, यामुळें हें दुःख होत आहे हें देहभावाचें दुःख आतां एक घटकेंत नाहींसें होईल, असें समजा. कारण ही भ्रांति फार जन्मांच्या प्रवाहानें वहात आली आहे व ही भ्रांति जन्मप्रवाह संपेपर्यंत राहणार. यामुळेंच त्रिकालबाधा होते. ह्या भ्रांतीचा नाश होण्याकरितां उपाय केला पाहिजे. पण गुरूचा शोध करण्याकरितां निघालेल्या आम्हांस अंतर्यामीं असलेल्या गुरु देवानें हें दुःख उत्पन्न केलें. कारण आम्हांला देहाचा मोह सुटावा व वैराग्य उत्पन्न व्हावें म्हणून हीं संकटें येतात. हीं जर आम्ही सहन केलीं नाहींत, तर अंतर्यामीं असलेला गुरुदेव आमचें सत्य पहाण्याकरितां, दुःखकारक जन्म देऊन परिहार करील. जें आरंभीं दुःखदायक असतें, तें परिणामीं सुखकारक

होतें. जें प्रथम सुखदायक असतें, तें अंतीं दुःखदायक होतें. तें कसें तें पहा. विषय प्रथम सुखदायक असतात, पण शेवटीं मरणाच्यावेळीं दुःखदायक होतात; व विषयांबद्दलचें वैराग्य प्रथम दुःखदायक असतें, पण शेवटीं जन्ममरण चुकवून ब्रह्मानंद देणारें होतें. असें सांगितल्यानंतर मुलें म्हणालीं, तूं केलेला उपदेश बहिर्मुख असलेल्या आम्हांला योग्य नव्हे. अंतर्मुख झालेल्या जितेंद्रिय महात्म्याला उपयोगी आहे. आतां या गांवांत जाण्याचा रस्ता आम्हांला दाखीव. सिद्ध म्हणाला, तुमचा देव गांवच काय? असें असेल तर हा गांव पहा. असें म्हणून एक दिवा दाखविला, व ते त्या दिव्याच्या धोरणानें जाऊं लागले. थोड्या अंतरावर गांवाबाहेरचें एक पडकें देवालय दिसलें. तेथें जाऊन ते बसले; इतक्यांत जोराचा पाऊस पडूं लागला व देवळाचा कांहीं भाग पडल्याचा आवाज झाला. तो ऐकून सोम म्हणाला, असल्या पडक्या ठिकाणीं आम्हाला कां घेऊन आलास! आम्ही जिवंत राहूं कीं नाहीं, याचा भरंवसा वाटत नाहीं. हें ऐकून सिद्ध ह्मणाले, गांव पाहिजे ह्मणालां; गांव मिळालें. तरी सुख नाहींच! थोडीशी इच्छा पुरती झाली, तरी मनुष्याला सुख होत नाहीं; कारण मन आणखी दुसरीकडे जातें, तें थांबविण्याचा उपाय करावा. ही गोष्ट होईपर्यंत अपरात्र झाली; नंतर पाऊस थांबला. तेव्हां त्या दोघांना फार भूक लागली होती व आतां काय करावें या विवंचनेंत ते आहेत. इतक्यांत भीम म्हणाला, आतां भिक्षेला जाऊं. सोमानें त्याला अनुमोदन दिलें व चांगला उपाय काढलास असें म्हणाला. सिद्ध स्वस्थ निजले; तेव्हां आपण दोघेच जाऊं, असा विचार करून ते गांवांत शिरले. कुत्रीं भोंकून आंगावर येऊं लागलीं; तेव्हां पळत पळत ते एका छपरांत दडून राहिले. तों घरचा मालक उठला व म्हणाला, अरे चोरांनो! काल माझें

म्हशीचें रेडकूं चोरून नेलेंत व आज काय नुकसान करावयाचा तुमचा इरादा आहे ? तेव्हां ते म्हणाले, आम्हीं चोर नव्हें दादा; भिकारी आहों, आम्हाला कांहीं तरी अन्न घाला. तेव्हां तुम्हाला कपाळमोक्ष भिक्षा घालतों असें म्हणून, मालक सोटा आणावयास आंत गेला. तेव्हां ते दोघेही पळून दुसऱ्या गल्लींत गेले; इतक्यांत समोरून दोन गस्तवाले धांवत आले व ह्यांना धरून म्हणाले, आमच्या गांवाचा नाश करणारे हेच दिसतात. हे लहान मुलांप्रमाणें आहेत, पण ह्यांच्या मागें कोणीतरी मोठा मनुष्य असेल असें म्हणून त्यांना चावडीस चला म्हणजे तुम्हांस योग्य प्रायश्चित्त मिळेल असें म्हणाले. तें ऐकतांच दोघेही आम्ही तसलीं कामें करणारे नहों, बाबा तूं मुलाबाळांचा असशील, आम्हांवर दया कर, आम्हाला थोडेंसें अन्न दे. असें म्हणाले. तेव्हां एक गस्ती म्हणाला, तुमच्या आंगावर चांगलीं वस्त्रें दिसतात मग भीक कां मागतां! तेव्हां मुलें म्हणालीं, आम्ही वाट चुकलों महाराज. तेव्हां तळवार म्हणाला, आतां अपरात्रीं गांवांत न फिरतां त्या पडक्या देवळांत जाऊन निजा व सकाळीं चालते व्हा. त्यांना सोडलें तर पुरें असें झालें होतें. लागलेच ते सिद्धा-जवळ आले व त्यांनीं झालेलें वर्तमान त्याला कळविलें. तेव्हां सिद्ध म्हणाला, अरेरे तुम्हांस फार दुःख झालें. तुम्हीं स्वामींवर विश्वास ठेवित नाहीं व अन्नाची इच्छा करितां त्यामुळें तुम्हाला अन्न तर मिळत नाहीं, पण दुःख मात्र मिळतें. ' न मागे तयाची रमा होय दासी ' हें ध्यानांत ठेवा. मी शिवध्यानतत्पर असल्यामुळें, तुम्ही जातांच एका पुजाऱ्यानें देवाला नैवेद्य आणून ठेविला. तो नैवेद्य घेऊन मी तुमची वाट पहात बसलों आहें. नंतर त्या दोघांनीं कपाळ बडवून घेऊन 'त्राहि त्राहि' म्हणून प्रायश्चित्त घेतल्यावर सिद्धानें त्याला देवापुढील नैवेद्य दाखविला. मग तिघांनींही षड्रसान्न सात्विक

आहार घेतल्यावर तेथेंच खोज्यांत असलेलें पाणी पिऊन ते निजले. त्या वेळीं भीम म्हणाला, वरून येऊन फार दिवस झाले. सोमही म्हणाला, मला घरीं जावेंसें वाटतें. तेव्हां सिद्धानें सांगितलें, तुमचीं मनें गुरूचा शोध करण्यास तयार झालीं नाहींत. याकरितां तुम्ही घरीं जा. तेव्हां ते दोघेही परत फिरले व तूं गुरुशोधनाच्या अधिकारास योग्य आहेस, त्याचा तपास करून धन्य हो. असा आशीर्वाद देऊन चालते झाले.

## प्रकरण ६ वें.

पुढें सिद्ध एकटेच हैद्राबाद, गोवळकोंडें वगैरेकडे जाऊन तिमर लंकेच्या गुहेंत पुष्कळ दिवस ध्यानस्थ बसल्यावर चित्तैकाग्रता संपादून दिव्यदृष्टीनें पाहूं लागल्यावर दक्षिणदिशेकडे दक्षिणाभिमुख संप्रदाय सिद्ध आचार्य गुरु मिळतील असें वाटून तेथून निघून श्रीशैलपर्वतास गेले व त्यांनीं तेथील सूर्यसिंहासन मठांतील पट्टद ( गादीवर असलेले ) स्वामीबरोबर ज्ञानसाधन, चित्तशुद्धि या साधनांच्या विचारांत तीन दिवस संभाषण करून विषयनिरूपण केलें तेव्हां स्वामी म्हणाले हा मुलगा पुष्कळ जन्मापासून योग्य संस्कारयुक्त असून तपोभ्रष्ट झाल्यामुळें या लोकीं आला असावा किंवा देवांश तरी असावा. म्हणून त्यांनीं त्याची पूजा वगैरे केली नंतर सिद्धानें ‘ विधिवदधीत ब्रह्मनिष्ठ ’ अशा गुरूचा शोध करीत ‘ राचोटी वीरभद्रादि नवनंदी ’ वगैरे महाक्षेत्रांचीं दर्शनें घेत घेत सुखदु:खाकडे लक्ष न देतां पर्णफलादि जो आहार मिळेल तो घेऊन केव्हां केव्हां उपवासही करीत देहदंडन करून सर्व वासनांचा त्याग केला. नंतर तो नेहमीं गुरुध्यानांत राहून क्षेत्रें पहाण्याचें सुख अनुभवित फिरत

फिरत सुरपुरास आला तेथें एका भक्ताच्या तोंडून 'गुड्डगुंटी, अमरगुंड, मल्लिकार्जुन' क्षेत्रांत असलेल्या कट्टीमठांत गादीवर असलेले स्वामींची प्रशंसा ऐकून त्याची सेवा केल्यास आपल्याला ज्ञानप्राप्ति होईल, असें समजून ते गुड्डगुंटीला गेले तेथें डोंगरावर तीन दिवस शोध केल्यावर एक देवालय दिसलें. देवाचें दर्शन घेऊन स्वामी बाहेर आले तेव्हां त्यांना साष्टांगनमस्कार करून हात जोडून नम्रपणें 'ह्या भवभ्रांतीपासून अनायासें सोडीव' अशी त्यांनीं स्वामीची प्रार्थना केली. याचा अधिकार पाहिला पाहिजे म्हणून ते उदासीनच राहिले. नंतर कांहीं दिवस फार भक्तीनें सिद्धानीं त्याच्या घोड्याची लीद काढणें वगैरे हलकीं कामें अगदीं निरभिमानपणानें केली, अन्नवस्त्राची सुद्धां काळजी न करितां गुरूचें दर्शन होतांच साष्टांगनमस्कार करावा; अशारीतीनें तो राहिला. हा योग्य अधिकारी झाला असें समजून कांहीं दिवसानंतर तेथील राजसभेंतील बहिर्मुख असलेले सुब्बे शास्त्री स्वामीजवळ येऊन म्हणाले 'उपनिषदाचें' अध्ययन करणारा या कालांत कोणी दिसत नाहीं कां म्हणाल तर 'उपनिषत्' या शब्दाचा अर्थच तसा आहे. असें त्यानें म्हटल्यावर हात जोडून उभा असलेला सिद्ध, गुरूच्या तोंडाकडे पाहून आपली आज्ञा झाल्यास थोडासा वादविवाद करीन असें म्हणाला. बरें तर चालूं दे, अशी गुरूची आज्ञा होतांच; ऐका शास्त्रीबोवा, येथें उपनिषत् शब्दावरून व्याख्यान करून, समजून घेण्यास योग्य अशा ब्रह्मत्वाच्या ऐक्याच्या रूपाचा प्रकाश करणारी ब्रह्मविद्या, हाच उपनिषत् शब्दाचा अर्थ आहे. हें सिद्धानें सांगितल्यावर शास्त्री म्हणाले, हे ब्रह्मचारी! तूं कोणत्या अर्थाच्या योगानें उपनिषत् शब्दाचा विद्या असा अर्थ करितोस. या प्रश्नाला ब्रह्मचारी यानें उत्तर दिलें कीं, जो मुमुक्षु विषयरूप

तृष्णेचा त्याग करून, गुरुमुखानें ऐकिलेल्या ज्ञानावर निष्ठा ठेवून धारणा धरील, त्याची संसारबीजभूत अविद्या नाश पावेल; याकरितां ज्ञानच उपनिषत् होय. कारण ह्याचा धात्वर्थ ज्ञानाशींच जोडलेला आहे, म्हणून उपनिषत् म्हणजे ज्ञानच. तो धातु कोणता? असें सुब्बैशास्त्री यांनीं विचारिलें. तेव्हां सिद्ध म्हणाले, "षद्लृ विशरणगत्यवसादनेषु" ह्या पाणिनीच्या सूत्राप्रमाणें उप आणि नि हे मागील उपसर्ग आहेत, ते अंत्य षद् यांस जोडून उपनिषत् हा शब्द झाला. या धातूचे तीन अर्थ होतात; कोणते म्हणाल तर; जो मंद अधिकारी असतो त्याला गर्भ, जन्म, जरादि दुःखें उपनिषत् वाचल्यानें कमी बाधा करितात. हा विशरणाचा अर्थ झाला. तसेंच जो जिज्ञासु असतो त्याला 'ब्रह्माच्या जवळ नेणारें' असा दुसरा अर्थ होतो. व जे प्रौढ–तत्वविद् असतील त्यांना 'अवसादन' अविद्येचा नाश करणारें असा तिसरा अर्थ होतो. म्हणून 'उपनिषत्' म्हणजे ज्ञान. उपनिषदाच्या योगानें होणारें कार्य ज्ञानाच्या योगानें होतें व ज्ञानाच्या योगानें होणारें कार्य उपनिषदाच्या योगानें होतें. म्हणून दोहोंचा अर्थ एकच अशा ज्ञानाचे अधिकारी अनेक आहेत. असें सांगितल्यावर सुब्बैशास्त्री म्हणाले ही प्रौढ विद्या या जन्मीं मिळालेली नव्हे; पुष्कळ जन्मांत विद्यामूर्ति देवाचें ध्यान केल्यामुळें प्राप्त झाली असावी. असें बोलून निघून गेले.

---

## प्रकरण ७ वें.

मागील प्रकरणांत झालेला संवाद ऐकून गजदंड स्वामीस फार आनंद झाला; व त्यांनीं सिद्धाप्पास जवळ बसवून घेऊन

त्यांच्याशीं महद्विचाराचा ऊहापोह करण्यास सुरुवात केली व यापुढें तूं हलकीं कामें करूं नकोस म्हणून सांगितलें. तेव्हां सिद्धांनीं प्रश्न विचारला कीं ब्रह्माचा निश्चयार्थ झाल्याचें चिन्ह कोणतें? गुरु म्हणाले ' संशय विपरीत असंभावना होऊन ब्रह्मात्मभाव दृढ होणें, यावर सिद्धान्तविवेकचिंतामणीच्या वेदांत प्रकरणांत 'अहमात्मा' या द्वयांचें ऐक्य कसें झालें? असें विचारलें तेव्हां गुरु म्हणाले अन्योन्याच्या अध्यास लक्षणाची हृदयग्रंथी आहे तोंपर्यंत द्वैतभाव असतो. मग अध्यासाचीं शिथिलता झाल्यावर दुसऱ्याच्या शरीरावर आपला अभिमान जसा नसतो तसा आपल्या शरीरावरही अभिमान नाहींसा होईल तेव्हां एकत्व ज्ञानसिद्धि होईल. मग द्वैत कोठें राहिलें. तेव्हां सिद्ध म्हणाले प्रत्यक्षप्रमाणाला विषयभूत आकाशादि पंच महाभूतयुक्त प्रपंच दिसत असतांना नाहीं म्हणतात हें कसें? गुरु म्हणाले ती प्रत्यक्ष इंद्रिय व्याप्ति, किंवा वृत्ति व्याप्ति, किंवा चैतन्यव्याप्ति, होय. ह्यांपैकीं तूं पहिली मानिलीस तर भौतिक घटावर भौतिक इंद्रियें व्याप्त होऊं शकत नाहींत कारण दोनही जड आहेत. दुसरें मानिलेंस तर शुभ्र वस्त्रानें काळा घट आच्छादिला व वस्त्राला घटाचें ज्ञान झालें असें मानिलें तर जडवृत्तीला ज्ञान झालें असें होईल. तिसरी चैतन्य व्याप्ति मानिली तर विषय वृत्तींचें व चैतन्यवृत्तीचें एकत्व ज्ञान होईल. शिवाय जगत् हें प्रत्यक्ष ज्ञान असें मानूं नये; असें जर मानिलें तर अध्यास होईल. अध्यासाची गोष्ट खोटी असते म्हणून प्रपंच ही मिथ्या कल्पना आहे. यावर सिद्ध म्हणाले, असें आहे तर गुरुमहाराज, व्याप्तिवांचून सामान्य प्रत्यक्ष होऊं लागलें, तर अप्रत्यक्ष प्रत्यक्षानें बाधित होईल. कसें म्हणाल, तर बाल्य मानल्यावांचून यौवन व यौवन मानल्यावांचून वार्धक्य कसें सिद्ध होईल? तर पूर्व कर्मकांडापासून सिद्ध झालेलें लिंगधारण आत्मलिंगज्ञान

झाल्यावर आपलें लिंग आपणच काढिलें पाहिजे. हें ऐकून असें करूं नये बरें; असें गुरु ह्मणाले. तेव्हां सिद्ध ह्मणाले कां बरें? बाबा तें शास्त्रविरुद्ध आहे. असें गुरूंनीं सांगितल्यावर सिद्ध म्हणाले, 'लिंगमध्ये जगत्सर्वं सर्वं लिंगमयं जगत् ॥ लिंगबाह्यात्परं नास्ति तस्माल्लिंग महत्सदा ॥' असें शास्त्र आहे. म्हणून मोक्षपदाला प्राप्त होणाऱ्या पुरुषानें लिंगधारण करणें योग्य नाहीं; कारण ज्ञान्यानें कर्म व ज्ञान हीं दोन्ही कशीं उपयोगांत आणावीं, यासंबंधानें ऐतरेयश्रुतीच्या पहिल्या खंडांत भाष्यकारांनीं कर्मखंडन केलें आहे. कारण यथार्थवाद परमार्थरूपाचें ज्ञान झाल्यावर कर्माचें फल दिसत नाहीं. ज्ञान्याला क्रियासंबंध बाधत नाहीं. आत्मज्ञान्याला अनाश्रय, अनावरण, अनाश्रम, अगोत्र, अदेह, अकर्मरूप असा आत्मा निरावरण असल्यामुळें कर्म चालत नाहीं. कर्म चालावयाचें झाल्यास माझा देह, मी अमुक गोत्रज, हें कर्म मजकडून व्हावें, यापासून मला अमुक फळ मिळावें, हें कर्म मीं केलें नाहीं तर मला प्रायश्चित्त भोगावें लागेल, ही भावना ज्याला नाहीं, त्यांजकडून कर्मच होणार नाहीं. मोक्षपदाला प्राप्त होणाऱ्याला हा भ्रम नसल्यामुळें, त्यांजकडून कर्म होत नाहीं. हीं सिद्धाचीं वाक्यें ऐकून गुरूंना वाटलें कीं, ह्याची बुद्धि शुद्ध ब्रह्मांत आरूढ झाली आहे म्हणून ह्याला सिद्धारूढ हें नांव शोभेल. हा कांहीं सामान्य नव्हे. याकरितां हे सिद्धारूढा, तूं माझ्या पदाला प्राप्त झाला आहेस. हें ज्ञान, देव अमरगुंड मल्लिकार्जुन याच्या प्रसादानें तुला प्राप्त झालें आहे; असा गजदंड स्वामींनीं आशीर्वाद दिला.

---

## प्रकरण ८ वें.

सिद्ध पुढें कांहीं दिवसांनीं गुरूंची आज्ञा घेऊन महातीर्थे फिरावयास निघाले. कारण त्या ठिकाणीं महात्म्ये असतात व त्यांच्याशीं संवाद करण्यास मिळावा अशी यांना इच्छा उत्पन्न झाली होती. त्याप्रमाणें हे तीर्थाटनास निघाल्यावर प्रथम किष्किंधा नगरीस जाऊन, विरूपाक्षाचें दर्शन घेऊन, हेमकूटा· वरील करस्थल नागलिंगाचे गुहेंत तीन महिने सगुण, सविकल्प समाधि साधित राहून, निर्विकल्प समाधिस्थ झालेल्या साधूंचें दर्शन घेऊन महापंपासरोवर पाहून, वसिष्ठऋषीच्या आश्रमांत तीन दिवस राहून मातंग ऋषीच्या आश्रमास गेले. तेथून स्फटिकशिला नांवाच्या तपोभूमीस गेले. तेथें वीस दिवसपर्यंत राहिले. पण क्षुधा तृषा वगैरेची बाधा झाली नाहीं, व चित्ताला आशयबाधा, चित्तविक्षेप, वगैरे योगविघ्नाची बाधा झाली नाहीं; अखंड ब्रह्माकार, प्रवाहधाराकार, अविच्छिन्न, तैलधाराकार वृत्ति राहिली, यावरून खरोखर ही तपोभूमि आहे, असें समजून पुनः एकवेळ पंपासरोवरावर येऊन मानससरोवरांत स्नान करून, रामाच्या देवळांत बसून चक्रतीर्थ पाहून, वालीभंडार यांवच्या रोखानें निघून त्यांनीं चिंतामणि आश्रम पाहिला. तेथल्या महात्म्यांशीं थोडावेळ संभाषण करून त्यांच्याशीं आत्मविचार चालला असतांना तेथें असलेल्या एका अधिकाऱ्यानें आत्मा म्हणजे काय? म्हणून विचारिलें. तेव्हां शास्त्र न जाणणाऱ्या एकानें त्याला उत्तर दिलें कीं, मीं अशी बुद्धि प्रत्येकाला आपल्या देहाविषयीं असते, याकरितां देहच आत्मा. तेव्हां दुसरा म्हणाला, ज्ञानरूप शरीर आत्मा किंवा अज्ञानरूप शरीर आत्मा म्हणतोस? अज्ञानरूप शरीरच आत्मा असें मी म्हणतों.

अज्ञप्तिरूप शरीर आत्मा असें म्हटलें तर स्नान, भोजन, योग्य दिसत नाहीं. असें उत्तर मिळाल्यावर पहिल्याचें तोंड बंद झालें तेव्हां दुसरा म्हणाला, ज्ञप्तिरूप आत्मा अज्ञप्तिरूप देहाहून भिन्न आहे. याकरितां हा ज्ञप्तिरूप आत्मा गमनागमन करणारा किंवा न करणारा असला पाहिजे. जर गमनागन न करणारा आहे म्हणाल तर त्याला त्र्यावस्था कशा संभवतील. ज्ञानरूप आत्मा गमनागम करणारा आहे, असें मानिलें तर वायु जडरूप असल्यामुळें त्या ठिकाणीं सुखदुःखसंभव नाहीं. याकरितां मनच आत्मा असावा. कां म्हणाल तर मनाच्या ठिकाणीं गमनागमन संभवतें, त्याप्रमाणेंच जाड्याचा अहंभावही संभवतो. सुखदुःखाचें ज्ञानही त्यांस होतें, म्हणून मनच आत्मा म्हणावा. बौद्ध म्हणतो कीं, कर्ता नसतांही मनोरूप करणही आत्मा होईल. कारण अहंबुद्धि ही सर्व कार्याला कर्ता म्हणून लोक प्रसिद्धच आहे; म्हणून बुद्धीला आत्मा म्हणावें. भट्टाचार्य यांचे शिष्य म्हणतात कीं, निद्रेंत बुद्धि लय पावते, म्हणून बुद्धि आत्मा नव्हे. तर निद्रेंत होणाऱ्या आनंदाला आत्मा म्हणावें. शेवटीं शून्यवादी म्हणतात कीं निद्रेंत कांहीं दिसत नाहीं. याकरितां नास्तिरूपच आत्मा होय. तेव्हां सिद्धारूढ म्हणाले कीं, असें आहे तर नास्ति हें समजून सांगतां किंवा न समजून सांगतां? समजून सांगत असाल तर नास्ति हें समजणारा अस्तिरूप असला पाहिजे. म्हणून आत्म्याचें अस्तित्व सिद्ध आहे. अर्थात् ब्रह्मरूप सिद्ध होय.

नंतर प्रारब्धवादी म्हणाला कीं, आत्मज्ञान्याला प्रारब्ध कर्माचें सुखदुःख आहे. तेव्हां सिद्धारूढ म्हणाले, सुखःदुख विषयात्मक ह्मणतां किंवा मनोवृत्तिरूप ह्मणतां? विषयात्मक असें त्यांनीं कबूल केल्यावर—आरूढ म्हणाले, तर मग सर्व मनुष्यांस एकाचवेळीं सर्व सुखदुःख झालें पाहिजे. तसें अद्यापपर्यंत कधीं झालें नाहीं व हें

लोकांच्या अनुभवाच्या विरुद्ध आहे ह्मणून पहिलें ह्मणणें बरोबर नाहीं. आतां दुसरें मानावें, तर इष्टानिष्ट हें मनोवृत्तिरूप असल्यामुळें अनेक धर्मांपासून त्याला सुखदुःख होऊं नये. कसें ह्मणाल तर अग्निधर्म उष्ण आहे ह्मणून अग्नि जाळणारा आहे. आणि पाण्याचा धर्म शीत आहे ह्मणून पाण्यानें थंडाई आली पाहिजे. मनोधर्मांपासून झालेले सुखदुःखापासून मनाला शांति व ताप होऊं नये. त्यानंतर वादी ह्मणाला, हें मनोधर्मांपासून झालेलें सुख दुःख आत्म्याला कां होऊं नये ? त्यावर आरूढ स्वामींनीं उत्तर दिलें. सुप्ति समाधिकाळीं आत्मा असून मन व त्याचे सुखदुःखादि धर्म त्याला नसल्यामुळें, आत्माच आत्मज्ञानी होय. आत्म्याला सुखदुःख नाहीं ह्मणून ज्ञान्यालाही प्रारब्ध नाहीं. तेव्हां वादी ह्मणाला, 'नाभुक्तं क्षीयते कर्म' ह्या प्रमाणावरून ज्ञान्याला प्रारब्ध भोगल्याशिवाय गति काय ? आरूढ स्वामी ह्मणाले, हें ज्ञानशून्य मनुष्यांकरितां आहे. परंतु सिद्धांत्याला सांगण्याचें नव्हे. हें सर्वांनीं ऐकिलें व ब्रह्मानंदांत निमग्न होऊन चित्समाधिसुख सलग्न होऊन ते तेथेंच राहिले.

## प्रकरण ९ वें.

पुढें कांहीं दिवसांनीं चिंतामणि आश्रमांतून निघून वेंकटगिरीस जाऊन, श्री वेंकटेशाचें दर्शन घेऊन, वाटेंतील शीतोष्णापासून होणारें सुखदुःख अनुभवित एक लहानसें वस्त्र आंगावर घेऊन, करतल हेंच पात्र व भूमि हीच शय्या समजून, जेथें तेथें मूर्खांच्या त्रास सोशीत सोशीत व कांहीं उन्मत्तांकडून दगडांचा मारही सहन करीत जात असतां, कांहींजण हा कोणत्या जातीचा आहे ? कोणाला ठाऊक ह्मणून जवळ येऊं देत

नसत. कांहीं जण हा उत्तम अधिकारी आहे, ब्रह्मज्ञान्याप्रमाणें निस्पृह आहे व आत्मज्ञानी आहे; असें समजून अन्न देत असत. याप्रमाणें प्रवास करून शिवकंचीस येऊन त्यांनीं श्रीशिवाचें दर्शन घेतलें. नंतर विष्णु कंचीस जाऊन पुढें श्रीवरदराजाच्या दर्शनास जात असतां एका ब्राह्मणाला हा गृहस्थ ब्रह्मवेत्ता असावा असें वाटलें. कारण, हा निस्पृह व जडभरताप्रमाणें उन्मत्त वेष धारण केलेला आहे. याची पूजा केल्यास महाफल मिळेल. म्हणून त्याला नमस्कार करून हात धरून घराकडे नेऊन उच्चासनावर बसवून यथाशक्ति षोडशोपचार पूजा करून, स्तुति करून त्याची प्रार्थना केली कीं ब्रह्मज्ञान्याची पूजा केल्यास ती तत्काल फलदायक होते, असें ऐकिलें आहे. तेव्हां त्यास जवळ बोलावून आतां तूं कोण? असें त्यास विचारिलें. तेव्हां प्रत्यक्ष दिसणारें शरीरच मी असें तो म्हणाला. हें धातुमय शरीर पंचमहाभूतांस वांटून दिल्यावर नाहींसें होईल. नंतर तूं कोण? असें विचारल्यावर प्राणबुद्धिसहित प्रत्येक लोकांत प्रत्येक शरीरांत संचार करणारा मी, ही बुद्धि विलयात्मक असलेल्या झोंपेंत तूं कसा होतास हें दाखविते. त्याच्या पलीकडे मला समजत नाहीं. समजत नाहीं हें समजून बोलतां न येणारा अज्ञानसाक्षीरूप तूंच असें अनुभवास आणून दिलें; तेव्हां महात्म्याचे पूजेचें फळ अदृष्ट नव्हे दृष्ट आहे, हें समजून त्यानें संतुष्ट होऊन पुनः प्रदक्षिणा व नमस्कार करून परवानगी घेतली. नंतर श्रीवरदराजाचें दर्शन घेऊन नऊ महिने फिरून चिदंबरास आले व त्याचे रहस्यस्थानाचें दर्शन घेऊन सात महिने प्रवास करून वाटेनें पर्जन्यामुळें भिजणें हेंच स्नान, उन्हानें वाळणें तेंच अंग पुसणें, अशा अवधूत स्थितींत कुंभकोणास आले. तेथें ईश्वरदर्शन घेऊन तंजावरास गेले. तेथून श्रीरंगास नदींतून जात असतां एकजण म्हणाला,

अरे प्रेतसदृश मनुष्या, अन्न नसतां रोड असून इतका कां धांवतोस? तुला पाहिजे तितकें अन्न असून पुष्ट न होतां किती चालतोस? तेव्हां अवधूत म्हणाले, अरे, अन्न वगैरे मनुष्याला रोग उत्पन्न करितात व लवकर जाण्याची शक्ति नाहींशी करितात. गमनागमनाला कारण मन आहे असें समज. तो नमस्कार करून म्हणाला, तूं श्रीरंगाचा अवतार खरा. बरें आहे असें म्हणून त्यांनीं पुढें जाऊन श्रीरंगाचें दर्शन घेतलें. इकडे जललिंगेश्वराचें दर्शन घेऊन तीन महिने फिरून मदुरा–मीनाक्षीच्या देवालयांत जातेवेळीं एक मूर्ख ब्राह्मण म्हणाला, तूं चांडाळ आहेस व संकलित चांडाळ, आशाचांडाळ, आणि कर्मभ्रष्ट चांडाळ या नीतिला अनुसरून तो देवालयांत जाऊं देईना; तेव्हां सिद्ध म्हणाले, तूंच चांडाळ आहेस कारण तुला राग आला आहे. ब्राह्मण म्हणाला कांहीं तरी दे, व आंत जा. तुला आशा आहे, तेव्हां तूं आशाचांडाळ नव्हेस काय? असें सिद्धांनीं विचारिलें. तेव्हां तुझ्याजवळ कांहीं मिळकत नाहींना! तेव्हां संकलित चांडाळत्व आलें. मग ब्राह्मण म्हणाला, तुझ्याशीं मी कोठें वाद घालीत बसूं? मला स्नान करावयाचें आहे. तेव्हां सिद्ध म्हणाले, महत्समागम सोडून कर्म आचरणारा कर्मभ्रष्ट चांडाळच. ह्मणून प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. असें ह्मणून गालावर हात बडवून त्राहि त्राहि ह्मणून नमस्कार करून बाहेर निघाला. तों देवळांत गर्भालयांत पंचामृताभिषेकाचा समारंभ मीनाक्षीदेवीकरितां चाललेला पाहून बाहेर येऊन गांवच्या लोकांचा सहवास सोडून कावेरी नदीच्या कांठीं एका देवाल्यांत जाऊन तूष्णीभावानें कांहींएक न मागतां निजले. इतक्यांत वादानें क्षोभित झालेला ब्राह्मण 'अवधूताला मी विनाकारण सोडला; त्याला मीं भिक्षाही घातली नाहीं; त्याची सेवा माझ्याकडून कोणत्याही प्रकारें घडली नाहीं; म्हणून मी फार

दुर्दैवी आहें. आतां तो महात्मा कोठें भेटेल तर शोधून आणावा' अशी चिंता करीत शोध करीत चोहोंकडे पहात कावेरी नदींत स्नान करून देवाला थोडें पाणीं घालावें म्हणून देवालयांत आला. तों त्याच्या पुण्याईनें त्याला स्वामी दिसले. तेव्हां परमानंदित होऊन साष्टांग नमस्कार करून, माझ्या घरीं भिक्षेस यावें; अशी प्रार्थना करूं लागला. तेव्हां स्वामी म्हणाले, पायानें चालत घरीं नेण्यापेक्षां एथेंच कांहीं आणून दिल्यास, दसपट पुण्य लागेल. याकरितां येथेंच घेऊन ये; तेव्हां ब्राह्मण संतुष्ट होऊन घराकडे जाऊन, लवकरच मिष्टान्नानें भरलेलें ताट घेऊन आला व स्वामींचें जेवण झाल्यावर, ते ब्रह्मानंदांत निमग्न होऊन तेथेंच निजले.

## प्रकरण १० वें.

नंतर मदुरेहून निघून श्रीरामनाथपुरांत माहात्म्याचें दर्शन घेऊन, नवपाषाणाहून हरबला खाडी ओलांडून श्रीरामेश्वराचें दर्शन घेऊन, रामझरोक्यांत एक हटयोगी प्राणायामाचा अभ्यास करीत आहे, हें पाहून स्वतः कृष्णातीरीं एका गुहेंत नियमानें तीन वर्षेंपर्यंत थोडेंसें दुधावर राहून, केलेले प्राणायामाचे कष्ट मनांत आणून अवधूत त्यास विचारूं लागले कीं, अरे हटयोगी मनुष्या, तूं हा प्राणायाम सगर्भ करितोस किंवा अगर्भ करितोस. तेव्हां तो म्हणाला, प्राकृत प्राणायामाच्या विरुद्ध सगर्भ वैकृत प्राणायाम करितो. मला फक्त आसनांगाची मात्र सिद्धि झाली आहे, तें तुला अनुभवाला कसें आलें असें सिद्धांनीं विचारिलें. तेव्हां तो म्हणाला, देहाला लघुता, जठराग्नीची स्फुर्ति, डोळ्याची निर्मळता व आरोग्य हीं प्राप्त झालीं आहेत, म्हणून हीं सांगता आली, असें मी समजतों. हें ऐकून संतोषभरित

होऊन तेथून निघून धनुष्यकोटीला जाऊन, तेथें स्नान करणाऱ्यांपैकीं एकाला अवधूत म्हणाले, तूं हा पंचभूतात्मक देह स्वच्छ असें समजून स्नान करितोस किंवा अस्वच्छ समजून स्नान करितोस. अस्वच्छतेमुळें स्नान करितो, हें तुला कसें समजलें. जातकर्मसंस्कारामुळें; हें ऐकिल्यावर हा मूर्ख असावा असें समजून, तेथून निघून दर्भशयनक्षेत्राला आले; तेथें थोडा वेळ राहून तिर्णलवेली येथील तिर्णलस्वामीचें दर्शन घेऊन जात असतां, देवालयांत एक उपासक डोळे मिटून बसलेला दिसला. त्याच्या कानांत ॐ असा उच्चार केला. तेव्हां तो डोळे उघडून पाहूं लागला; तों अवधूत त्याला म्हणाला, तूं ज्ञातउपासना करितोस किंवा अज्ञात–उपासना करितोस ? जर ज्ञात–उपासना असेल तर ज्ञानकालांत उपास्य, उपासक भाव नाहींसा होऊन ज्ञेय ब्रह्मच तो होऊन जाईल व शेवटीं ध्येय नसल्यामुळें ध्यान बंद होईल. आतां अज्ञात उपासना करितो म्हणशील तर ध्येय वस्तूचें स्वरूप न समजून, ध्यान करणाराची स्थिति न समजतां ध्यान होत नाहीं. हें तुझें कसलें ध्यान ? तेव्हां तो म्हणाला, अपरोक्षज्ञानाला भिन्न असलेलें शास्त्रपरोक्षेनें करितों. त्याला कारण काय ? असें अवधूतांनीं पुनः विचारिलें. तेव्हां "श्रद्धा" असें तो म्हणाला. श्रीसिद्धारूढ म्हणाले,–"श्रद्धा" कारण कसें ? उपासक म्हणाला, शास्त्रज्ञदेवता श्रद्धाहीन झाल्यामुळें ध्यानाकडे प्रवृत्ति होत नाहीं. एकाद्याला क्वचित् श्रद्धा उत्पन्न होत असल्यास ध्यानप्रवृत्ति होत नाहीं, म्हणून उपासकाला श्रद्धा मुख्य कारण आहे; हें ऐकून अवधूत सांप्रदायिक आहे, असें समजून तेथून निघून तोताद्रिक्षेत्राला गेले.

तेथें श्रीमन्महानारायणमूर्तीचें दर्शन घेऊन, तेथून तिरकरानच्या देवळांत लंबेनारायणाचें दर्शन घेऊन नऊ दिवस तेथें

राहिले. तेथें नानातऱ्हेचे शास्त्री असून, त्यांपैकीं कर्मकांड जाणणारा एक होता. त्यानें सिद्धारूढास विचारिलें कीं, तूं नित्य स्नान वगैरे क्रिया कां सोडिल्या आहेत? तेव्हां सिद्ध म्हणाले. 'कर्माचें फल पितृलोक. कसा म्हणाल तर कर्मीला कर्मसंस्कार चित्तांत असून अपूर्ण होऊन प्राणप्रयाणाच्या समयीं घोडे ज्या प्रमाणें रथ ओढून नेतात त्याप्रमाणें कर्मीचे प्राण ओढून नेऊन धूमांत मिसळतात, तेथून रात्रींत मिसळतात, तेथून कृष्णपक्ष, तेथून दाक्षिणायन, तेथून चंद्रलोकाला नेऊन, तेथें भोग शरीर उत्पन्न होऊन कर्मसमाप्ति झाल्यावर गारा विरघळतात त्याप्रमाणें हा देह नाहींसा होऊन शेवटीं सूक्ष्म देह कर्मसंस्कारापासून प्राप्त होऊन तेथल्या देवता सोडवितात. नंतर कर्मीला आकाशासारखें रूप प्राप्त होऊन, नंतर वायूसारखें रूप प्राप्त होतें.' अवधूतांनीं शास्त्र्यांस विचारिलें कीं आकाश व वायु हीं जड आहेत म्हणून मी भोक्ता नाहींसा झाल्यावर पुढील भोगाची प्रवृत्ति संभवते ती अशी. आकाशांतून सूर्याच्या किरणांशीं संयोग होऊन मेघरूप प्राप्त होऊन पृथ्वीवर पडल्यावर पापानुसार शरीर प्राप्त होऊन तेथें भोग भोगून पुनः शरीर प्राप्ति होऊन, कर्म संस्काराप्रमाणें कर्मे करून परलोकाला जाऊन कर्मी पुनः परत येऊन कर्मफल भोगतो. पुनः शरीर प्राप्तिशिवाय निराळें फळ नाहीं म्हणून कर्म मुमुक्षुदशेंत तिरस्कृत आहे म्हणून हा प्रश्न मुमुक्षूच्या संबंधानें करणें योग्य नाहीं. सिद्धाला तर हा प्रश्न करूंच नये अशी शास्त्र्यांची समजूत केली.

## प्रकरण ११ वें.

नंतर एक शास्त्री ही गोष्ट ऐकून तेथें येऊन सिद्धारूढाला विचारूं लागले कीं, मुमुक्षूला मुमुक्षुत्व येतें तो धर्म किंवा गुण? आरूढ स्वामी म्हणाले दोनही नव्हत. कारण धर्म असेल तर उष्णता अग्नीमध्यें नेहमीं असते त्याप्रमाणें नेहमीं मुमुक्षुत्व राहिलें पाहिजे. गुण असेल तर अभ्यासप्रवृत्ति होणार नाहीं याकरितां अभ्यासजनित भाव ह्मणावा. हा भाव कोठपर्यंत असतो ह्मणाल तर गुरुप्राप्तिपासून महावाक्यश्रवणापर्यंत असतो मग मुमुक्षुदशेची वृत्तिच 'अहं ब्रह्मास्मि' असा ज्ञानाकार परिणाम होऊन अपरोक्ष मानून देहभाव नाहींसा होऊन ब्रह्मात्मैक्य भावना स्थायिक झाल्यावर त्याच अखंड चैतन्यांत, हा समुद्रांत पडलेल्या पाण्याचे बिंदू प्रमाणें समरस होतो. हें बोलणें ऐकून त्याला आनंद झाला.

ही झालेली हकीकत पिचंडय्या नांवाच्या वेदांत्याला समजली. तेव्हां तो या माहात्म्याजवळ येऊन साष्टांग नमस्कार करून विचारूं लागला कीं, हें भौतिक चराचर व पृथ्वी आश्रयावर आहे तर पृथ्वीला आश्रय कोणता? तेव्हां गुरू ह्मणाले मोठ्या जलाशयांत पृथ्वी आहे कारण 'तद आप्य पृथिविरपांशर' असें श्रुतींत सांगितलें आहे. त्याप्रमाणें पाण्याच्या आश्रयावर पृथ्वी. तर मग पाणी कशाच्या आश्रयावर असावें? तें अग्नीच्या आश्रयावर आहे, कारण "अग्नेरापः" अशा श्रुतिमुळें अग्नीच्या आश्रयानें जल आहे तर अग्निही कोणावर तरी अवलंबून असला पाहिजे तो वायूवर अवलंबून आहे, कारण "वायोरग्निः" या प्रमाणानें वायूच्या घर्षणापासून अग्नीची उत्पत्ति होते. तर वायूला काय

आधार,' आकाश कारणं "आकाशाद्वायुः" या श्रुत्युक्तीप्रमाणें आकाशाचा श्वास वायु झाला. कारण आकाशांत वायूचें चलन नाहीं, म्हणून आकाश कोणत्याही अधिष्ठानावर आहे असें म्हटलें तर अक्षर रूप परमात्म्याचे अधिष्ठानीं कल्पित आहे. कां म्हणाल तर "तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः" या श्रुतिप्रमाणानें परमात्म्याचें अपरोक्ष ज्ञानाकरितां आकाश कल्पित आहे असें सिद्धाचें वाक्य श्रवण करून तें सप्रमाण आहे असें पाहून त्या वेदांत्यास फार आनंद झाला. व त्यानें महात्म्याला यथाशक्ति अन्नोदक देऊन संतुष्ट केलें. नंतर पुनः एकानें विचारिलें. मन सर्वदा चंचल होतें, याला कारण वायु व रजोगुण होय. यांत वायु चंचलतेला कसा कारण ह्मणाल, तर आकाशाचा पाव भाग व वायूचा अर्धा भाग मिळून मन झालें आहे ह्मणून एक दळ सोडून एका दळाला वायु आहे. वायूनें येणारें चंचलत्व आणि एकाविषयांत असणाऱ्या स्थानीं असलेला निर्धाराचा विकल्प करावणें हा रजोगुण धर्माचें चांचल्य होत. त्यांपैकीं तुमचें कोणतें चांचल्य? पूर्वींच्या स्थानीं असलेलें दळ सोडून दुसऱ्या स्थानीं जाणारें चांचल्य असलें, तर पतंजली योगशास्त्राच्या नियमाप्रमाणें मात्रादिक्रमानें प्राणायाम निर्दोष केला तर स्थानभ्रष्ट होणाऱ्या चांचल्याचा परिहार होईल. अथवा द्वितीय अनिर्धाररूप विकल्पाची बाधा झाली तर आत्मानात्म, दृग्दृश्य विवेक केला तर तोही परिहार होईल. असा विवेक तुला कसा फलित होईल ह्मणशील तर सत्कथन, सच्चिंतन, सत्समागम ह्यांच्या योगानें होईल. तर मग सत्संग कोठें शोधावा? ह्यावेळीं सुदैवानें प्राप्त झालेल्या ह्या महात्म्याच्या संगानें आतांच विवेक करावा. असें म्हणून. तर मग अवधूता, दृक् ह्मणजे काय? दृश्य ह्मणजे काय? अवधूत ह्मणाले

कूटस्थाचें चित् प्रतिबिंब युक्त असलेलें अंतःकरणवृत्तीला इंद्रियांचे सहाय्यानें शब्दादि अवलोकन करितांना त्याला दृश्य ह्मणतात; व त्याला पहाणारे इंद्रियाला दृक् म्हणतात. इंद्रियांना अंधपणाचे वगैरे दोष असले तरी त्याचे दोष जाणणारी वृत्ति दृक् ह्मणावी. ह्या वृत्तीला संशयादि दोष आले तर ह्या वृत्ति दोषांचा विचार करणाऱ्या चिदाभासाला दृक् असें ह्मणतात. तर मग हे महात्मन्, चिदाभास बुद्धीच्या आधीन आहे. आतां बुद्धि झोपेंत लय पावली मग दृक् कोण? तर चिदाभासाचें परमार्थ रूप कूटस्थ आत्माच खरें दृक् मानावें. त्याला पाहणारा दुसरा कोणी असला पाहिजे, तर मग दृक् याला निराळें दृक् नाहीं ह्मणून तेंच खरें दृक्. ह्या निजदृकूला आंत बाहेर असा भेद नाहीं. ह्मणून स[illegible]न भासणारा सर्व प्रपंच एक [illegible]ळीं प्रयत्न न करितां [illegible]ण होईल. असहाय, चिन्मात्र, कूटस्थ, परब्रह्म, परम[illegible], परतत्त्व, निर्लेप, नित्यानंदघन, शंभुलिंगरूपी दृक् तूंच असून तुला आणखी निराळें दृक् नाहीं [illegible]स सांगितलें. तेव्हां मलयनाथ ह्मणाला दृक्ला इतकीं लक्षणें कशाला सांगितलीं, तेव्हां हें मलयनाथा, न्यायशास्त्र जाणणाऱ्याला अतिव्याप्त्यादि दोष आले तर ते निवारण करण्यास हे विशेषण रूपीं खड्ग होय. असें ह्मणालें. तेव्हां हे महात्म्या, तुझें वाक्यामृत ऐकून कृतार्थ झालों; इतकेंच नाहीं तर माझे पूर्वज सुद्धां धन्य झाले. मी धन्य आहें, मी धन्य आहें, मी धन्य आहें, असें ह्मणून जमिनीवर साष्टांग नमस्कार घालून चालता झाला.

---

# प्रकरण १२ वें.

नंतर पांचव्या दिवशीं तिरकराय देवाची पूजा करणारा रामभट्ट येऊन विचारूं लागला कीं, स्वामी तुह्मी मलयनाथाला दृग्दृश्य विचार ऐकविला. तो असो. हा सर्व प्रपंच कोणत्या प्रकाशानें प्रकाशतो? असें त्यानें विचारिलें तेव्हां अवधूत म्हणाले ऐक. हे रामभट्टा दिवसा सूर्याचे ज्योतीनें प्रकाशतो, असें ऐकिलें नाहींस? रामभट्ट ह्मणाला होय दिवसा सूर्याची ज्योति; ऐक रात्रीं कोणती ज्योति ह्मणशील तर चंद्र, दीप, नक्षत्रें, खद्योत, विद्युल्लता वगैरे रात्रीचा प्रकाश होय, तेव्हां महाराज ह्मणाले असें आहे तर दिवसा असलेली सूर्यज्योति रात्रीं असलेल्या दीपादीप पदार्थांच्या ज्योतीच्या योगानें प्रकाशतें! हें ऐकून 'नेत्राच्या योगानें' असें भट ह्मणाला. झांकणें व उघडणें हे दोन धर्म आहेत. यामुळें डोळे उघले ह्मणजे सर्व प्रकाशमय होते. परंतु डोळे झांकले ह्मणजे कशाच्या योगानें प्रकाश होतो. असे महात्मे ह्मणाले, बुध्दीनें प्रकाश होतो असें भट्ट ह्मणाला. तेव्हां समर्थ ह्मणाले कीं, ही बुद्धी कोणापासून प्रकाशते. भट्ट ह्मणाला प्रथम स्फूर्तिरूप अहंकार युक्त भेदभावानें प्रकाशते, तेव्हां समर्थांनीं विचारिलें. समाधि लागल्यावर अहंकार लय होतो; व चिदाभास त्याचा त्यांत ऐक्य होतो. नंतर स्वेतर ज्ञान शून्यरूपी चिदाभास स्वयंज्योति स्वरूपात्मक आत्माच सर्व अवस्थेंत सर्व दृग्दृश्य प्रकाशणारा आहे ह्मणून तोच स्वज्योति असे तूं समज हें ऐकून निजस्थिति प्राप्त होऊन कृतार्थ झालों, कृतार्थ झालों, असें ह्मणून नमस्कार करून उपरति पावला. नंतर सहाव्या दिवशीं कर्मकांड वादी चिदंबर दीक्षित येऊन विचारूं लागले कीं अवधूता तूं

' तत्त्वमसि ' ह्या महावाक्याचा काय अर्थ करितोस? अवधूत ह्मणाले तूंच ब्रह्म आहेस असा अर्थ करितो. दीक्षित ह्मणाले असा करूं नये कारण कर्म करणारा आत्मा देव लोकांस जाऊन देवत्व मिळवून शुध्द झाल्यानंतर स्तुतिपर होईल. अवधूत ह्मणाले महावाक्य कर्मकांड संबंध पर नसल्यामुळें स्तुतिपर ह्मणूं नये. कारण द्रव्य, गुण, कर्म, जाति, धर्म, वर्ण, आश्रम असेल तर त्या वस्तूला स्तुतिपर ह्मणणें शोभेल. निरालंब निर्विशेष आत्म्याला कोणतीही कल्पना शोभत नाहीं. ह्मणून स्तुतिपर न होतां महावाक्य मुमुक्षूला उपदेशपरच होतें. स्तुतिपर झालें तर महावाक्य समजण्यास ज्ञानी कर्माश्रमधर्माच्या अभिमानानें कर्मांत तत्पर झाला पाहिजे असेंच जिकडे तिकडे दिसत असून स्तुतिपर असलेलें तुझें वाक्य शास्त्राविरुद्ध ह्मणावें. यावरही दीक्षित ह्मणाले, अस असेल तर उपासनापर कां होऊं नये. अवधूत ह्मणाले प्रत्येक उपासनापर ह्मणतोस किंवा अहंगृह ह्मणतोस! दीक्षित ह्मणाले अहंगृह असें ह्मटलें तर ज्ञान्याला मानसकर्म आहे, असें ह्मणावयाला प्रमाण नाहीं. ह्मणून उपासनापर नव्हे. असें आहे तर ज्ञान्याला कर्म नाहीं. ह्या ह्मणण्यास असें प्रमाण आहे कीं, ' न कर्मणा न प्रजया न धनेन त्यागेनैके अमृतत्व मानशुः ' असें श्रुत्युक्त प्रमाण आहे. तर मग ही श्रुति त्यागपर होईल; ज्ञानपर होणार नाहीं ह्मणून इतर श्रुति ज्ञानादेव तुकैवल्यं नान्यः पंथापनय विद्यते " अशी श्रुति आहे; ह्मणून महावाक्य ज्ञानपरच; कर्मपर नव्हे कर्मपर असतें तर अविद्या निवारक झाले नसतें असें ह्मटल्यावर शांत झाले. नंतर सातव्या दिवशीं प्रातःकाळीं अवधूत ब्रह्मानंदरूपानें देवाच्या पुढें असलेल्या सभामंडपांत बसले असतां न्यायशास्त्र जाणणारा तिरकंभट्ट येऊन अवधूताला विचारूं लागला, तुह्मी ब्रह्मात्मैक्याला काय लक्षणानें ओळ-

खावें म्हणतां ? महात्मे म्हणाले–जें सुखदायक, नित्य प्रकाशमान असणारें, श्रेष्ठ असलेलें, नामरूपाचा आधार असलेलें, बुद्धीला अगोचर असलेलें, बुद्धीला प्रकाशविणारें, शुद्ध, अपार, महावाक्य लक्षार्थ, जें आहे, तेंच तें असें समजावें. तर मग ब्रह्मसुख नाहींच. त्यावर महात्मे म्हणाले. विषयांतच सुख आहे, निद्रेंत सुख आहे; नैयायिक आनंदालाही गुण समजतात. सुखच ब्रह्म म्हटलें तर तिन्हीं वस्तूंत ब्रह्मत्व होईल; असें झाल्यास क्षणिक, अनित्य, सातिशय, अशा त्रिदोषानें व्याप्त होऊन ब्रह्माचें लक्षण सर्वठिकाणीं व्यापून राहील, या योगानें ब्रह्माला सुखमात्र एक लक्षण न देतां सुखाच्या जोडीला नित्य असें लक्षण जोडावयाचें, सोडलें तर कोणताही अतिव्याप्तीचा दोष येणार नाहीं काय ? तर मग नित्य लक्षणमात्र लक्षित आहे, ब्रह्म म्हणजे आकाश, दिशा, काल, मन, आत्मा त्याप्रमाणेंच पृथ्व्यादि पंचमहाभूतें, परमाणु, वगैरे हे सर्व पदार्थ नित्य समजून ब्रह्मच होतील. असें होऊं नये. ब्रह्म नेहमी प्रकाशित आहे, म्हणून निर्दोष, तर मग हे सिद्धांत्या. ब्रह्मप्रकाश लक्षण मात्र शिल्लक राहिलें म्हणजे सूर्य, चंद्र, अग्नि, ज्योति, वीज वगैरे प्रकाशयुक्त पदार्थमात्रांत अतिव्याप्ति होईल. म्हणून त्याच्या निवृत्तिसाठीं विभुलक्षण लाविलें तर अतिव्याप्ति होणार नाहीं. तर मग विभू हें एक लक्षण सांगितलें तर आका-शांत अतिव्याप्ति होईल. त्याच्या निवृत्तीकरितां आधार हें दुसरें लक्षण लावलें तर तो दोष नाहींसा होतो. ह्याप्रमाणें कोणत्याही रीतीनें अतिव्याप्ति दोष आल्यास पुढील निवृत्ति होईल. पण आनंदाला गुण म्हणणें योग्य नाहीं. कारण गुणाला त्यांनीं आगंतुकत्व सिद्ध केल्यामुळें आनंद गुण होईल तर, एककालीं कदाचित् विच्छित्ति होईल. आत्मन् आधाररूप प्रेमाला केव्हांही विच्छित्ति नाहीं म्हणून आनंद गुण नव्हे. मग तिरकंभट म्हणाले.

बुद्धीला ब्रह्म न समजणारें आहे तर मग अविद्यामूलकबंध बुद्धीचें दुःख नाहींसें कसें होईल? असें विचारिलें तेव्हां ही गोष्ट असंस्कृत बुद्धीला लागू नाहीं. वेदांतश्रवणानें संस्कृत झालेल्या बुद्धीला अवेद्य असें सांगणें योग्य नव्हे. अशुद्ध बुद्धीचें लक्षण परद्वारा शोधन तत्पदें लक्ष्याला व्यापून आहे म्हणून आवरण भंग होऊन ब्रह्मसाक्षात्कार झाला म्हणवितो, तेव्हां दुःखनिवृत्ति होते. हें ऐकून तिरकंभट विश्राम पावले.

---

## प्रकरण १३ वें.

नंतर आठव्या दिवशीं आठ वाजतां अवधूत अयाचित वृत्तीनें बसले असतां नशीबानें एक नैवेद्य आला तो खाऊन पाणी पीत असतां एक गोविंदभट नांवाचामनुष्य आला. तो लौकिक संस्कारी असल्यामुळे विचारूं लागला कीं सिद्ध महाराज, ज्ञान्यालाही तहान भुकेची व्यथा होते, निवृत्ति होत नाहीं. त्याप्रमाणेंच प्रारब्धही त्याला दुःख देतेंच. मग ब्रह्माकार वृत्तीनें ही दुःखनिवृत्ति, सुख-प्राप्ति, होते हें म्हणणें तुमच्या उदाहरणावरून खोटें ठरतें. तेव्हां सिद्ध म्हणाले, हा प्रश्न आत्मचैतन्य लक्षून केलास किंवा देहाला अनुलक्षून केलास? आत्मचैतन्याला लक्षून केला असें म्हणूं शकत नाहीं कारण आत्मा षडुर्मीरहित, पंचकोशविलक्षण, देह त्रयातीत आहे, यास्तव त्याला देहधर्म नाहींत, आणि देहावर लक्ष ठेवून विचारीत असशील तर देहाला प्रारब्ध भोग भोगणें भाग आहे, म्हणून त्याचा संबंध चैतन्याला नाहीं. देहाच्या संबंधामुळें लागलेली भूक, तहान, झोंप, आज़ार, सुख, दुःख हे आत्म्याचे नव्हत. म्हणून मुमुक्षुदशेंतच तिरस्कार करून आत्मस्वरूपी

झालेल्या ज्ञान्याला कोणता संबंध सांगावा असें सिद्धारूढ यांनीं म्हटलें. तेव्हां गोविंदभट हात जोडून म्हणाला तुम्हीं वेदांत ग्रंथांतील वाक्यें बोललां तर मला काय समजेल. आम्ही देहात्मभावी लौकिकी असल्यामुळें आमच्या सारख्यांना दर्शनाचेंच फळ मिळावें इतकीच इच्छा. असें म्हणून त्याला विचारसामर्थ्य नसल्यामुळें तो नमस्कार करून निघून गेला.

नवव्या दिवशीं स्वामी विश्रांति घेत असतां गुज्जमा नांवाची एक बाई येऊन नमस्कार करून म्हणूं लागली कीं, मी अज्ञानी, दीन, मला धन्य होण्याचा मार्ग दाखविला पाहिजे. अवधूत म्हणाले. प्रातःकाळीं स्नान करून विधीप्रमाणें पवित्र विभूति, रुद्राक्ष धारण करून क्रमानें अंगन्यास, करन्यास वगैरे करून मानसपूजेनें स्वस्थ चित्त होऊन नेहमीं पंचाक्षरी मंत्र जपण्याचा स्त्रीला अधिकार आहे. म्हणून निःसंदेहानें मंत्र जप केला असतां निःसंदेह होऊन मुक्त होशील. तें ऐकून ती नमस्कार करून निघून गेली. याप्रमाणें तेथें ९ दिवस ब्रह्मानंदांत काळ घालवून पुनः अवधूत तीर्थाटन करण्याचे निमित्तानें बाहेर निघाले. तेव्हां पुष्कळ मानमर्यादा करून तेथल्या लोकांनीं गांवच्या हद्दी पर्यंत त्यांना पोंचवून त्यांची स्तुति केली व आशीर्वाद घेऊन ते माघारी आपआपल्या घराकडे गेले. अवधूत पुढें छायानारायणाचें दर्शन घेऊन तेथून सुंदरमहादेव देवस्थान पाहून ठस्करा मस्करा ह्या स्थानापासून निघून तिरस्टार मध्यें श्री कृष्णमूर्ति पाहून पद्मपुराला आले. तेथें अनंतशयनाचें दर्शन घेऊन देवालयांत ब्राह्मणपंक्ति बसल्या होत्या. तेथें जाऊन भोजनास बसले. चार कर्मठ मिळून अवधूताला विचारूं लागले कीं तूं शूद्र असल्यासारखा दिसतोस व पंक्तीमध्यें कसा बसलास ! तेव्हा अवधूत म्हणाले, ब्राह्मणाची खूण ब्राह्मणाला लागते व शूद्राची शूद्राला

लागते; चोराला सर्व चोरच दिसतात. कारण ' यथा भावस्तथा-देवः ' असें प्रमाण आहे. तेव्हां ब्राह्मण म्हणाले, जर तूं विप्र आहेस तर तुला ' शिखा यज्ञोपवीत कां नाहीं ' ? अवधूत म्हणाले. " अशिखः अयज्ञोपवीतः यतिः याहच्छिको भवेत् " अशी श्रुति आहे तिचें विस्मरण झालें काय ? तर मग यतींचें कंथा, दंड आदिकरून कांहीं दिसत नाहीं. तेव्हां अवधूत म्हणाले, ज्ञान दंड, समता कंथा, वैराग्य विभति, विवेक कमंडलू, इत्यादि ज्ञानमुद्रा पाहण्याची तुम्हाला दृष्टी नसल्यामुळें तुम्ही चुकतां ! तेव्हां त्यांपैकीं एकजण म्हणाला हा माहात्मा आहे. याला अगो-दर जेवायास वाढलें पाहिजे. कारण वैश्वानर आतिथी रूपानें प्राप्त होतो म्हणून याला वैश्वानर बुद्धीनें सत्कार करावा. तेव्हां सर्वांनीं अवश्य म्हणून अर्घ्य, पाद्य, नैवेद्य वगैरेनीं त्याला तृप्ति दिली.

नंतर अवधूत तेथून निघून जनार्दनस्वामी नांवाच्या क्षेत्राला येऊन सर्वत्र फिरून जनार्दनस्वामीची आचमनमुद्रेची मूर्ति डोंगरावर आहे, ती पाहून सर्व ज्ञान्याचें हें मूळ असें समजून घेऊन तेथून निघून उडुपीस श्री कृष्णाचें दर्शन घेऊन कनकदासाचे दरवाजा जवळ येऊन म्हणाले, हा साक्षात् ब्रह्मरूप आत्माच क्षेत्रज्ञ आहे व तो सर्व क्षेत्रांत व्यापून राहिला आहे म्हणून हें उडुपिक्षेत्रस्थ श्रीकृष्ण क्षेत्रज्ञ होय. त्या आत्म्याला कृष्ण हें नांव कसें आलें म्हणाल तर सर्व सृष्टीचें ज्ञान आकर्षण करणाऱ्या आत्म्याला कृष्ण नांव आलें. असें म्हणून क्षणमात्र विश्रांति घेऊन निर्विकल्प समाधि धारण करून बसले.

—

## प्रकरण १४ वें.

पुढें भोगदायक कर्म उद्बुद्ध होऊन, समाधींतून उत्थान होऊन, धर्मस्थळींहून मुरडेश्वराचें दर्शन घेऊन तेथून गोकर्णाच्या कोटि-तीर्थांत आचमन करून, तेथून महाबळेश्वराचें दर्शन घेण्याकरितां देवालयांत येत असतां म्हणाले; हें क्षेत्र भू देवी नांवाच्या गाईचा कर्ण आहे म्हणून गोकर्ण हें नांव खरें आहे. याकरितां गोकर्ण महावाक्य ऐकिल्यानें मोक्ष होतें म्हणून हें क्षेत्र मुक्तिदायक आहे. असें समजून महाबळेश्वराचें दर्शन घेऊन बाहेर आले. तेथें अकस्मात् एक जटाधारी साधु आला व आपल्यासारखाच कोणी हा आहे, असें समजून हात धरून उभयतां मित्रभावानें समुद्रकांठीं जात असतां जटाधारी साधु थंडी वाजते, असें म्हणाला. तेव्हां तेथेंच एक फाटकी हांतरी पडली होती, ती त्याच्या गळ्यांत अडकवून ही तुला कंथा होईल. आतां याच्यावर एक माळ पाहिजे असें म्हणून तेथें पडलेल्या करट्यांची माळ त्याच्या कंठांत घातली; व तेथें एक अतार होता त्याच्या जवळून थोडेंसें कुंकु मागून घेऊन ते त्या साधूचे तोंडास माखून उजव्या हातांत फुट-लेली घागर व डाव्या हातांत केरसुणी, मयूर पिच्छासारखी धरून भैरवासारखा दिसतोस, असें हांसत हांसत बोलत जात असतां, एक रणहलगीवाला भेटला त्याला हाक मारून आम्ही भिक्षा मागण्याकरितां फिरत आहों, तूं आमच्या बरोबर हलगी वाजवीत आलास तर आम्हास जें मिळेल त्यांपैकीं एक भाग देऊं. तो म्हणाला स्वामी महाराज उद्योग नाहीं म्हणून मी स्वस्थ बसलों होतों. इतक्यांत हा चांगला उद्योग आला म्हणून ढण-ढण वाजवीत पायांत घुंगरू बांधून घेऊन नाचत यांच्यापुढें

चालूं लागला. नंतर एका रताळें भरलेल्या गाडीपुढें, हा जटाधारी, भैरव वेष घेतलेला, व रणहलगी वाजविणारा हे नाचूं लागले, त्यांना उत्तेजन येण्याकरितां स्वामी शाबास, वाहवा, खाशी, खाशी, असें म्हणूं लागले, तेव्हां या दोघांना आनंद होऊन ते वेडीं वाकडीं पद्यें गाऊं लागले, व नाना तऱ्हेचे हावभाव करूं लागले. ती मौज पहाण्याकरितां हजारों लोक जमले. शेवटीं रताळें-वाल्यानें तें फुटकें गाडगें भरून रताळीं दिलीं, तीं वाटेनें खात खात, प्रत्येक दुकानापुढें वाजवीत, नाचत, जें मिळेल तें घेऊन पुनः महाबळेश्वराच्या देवळांत गेले. तेव्हां तेथें एक साधु ज्ञानेश्वरी वाचीत होता. कांहीं सद्भक्त श्रोतेही श्रवण करण्यास विराजमान झाले होते. अवधूत, जटाधारी बोवा, व हलगी वाजविणारा यांसह मिळून संताजवळ गातगात गेले आणि म्हणाले, अहो संतहो, दररोज तुह्मीं पुराण सांगतां; आतां आह्मी ' ऊर्ध्वमूल मधः शाखीं ' हा श्लोक आहे, त्याचा अर्थ मी सांगतों. अवश्य सांगा अशी परवानगी घेऊन स्वामी व्यासपिठावर बसले. 'ऊर्ध्वमूल मधः शाखां' ह्या प्रकारची श्रुतीच वरील श्लोकाला मूळ आहे. ह्या श्रुतीचा अर्थ करीत असतां पुष्कळ ब्राह्मण जुळले. अवधूतांनीं पुष्कळ प्रकारांनीं पूर्वपक्ष केला आणि वैराग्यपर अर्थ सर्वांस उपदेशिला, तो सर्वांनीं मान्य करून नंतर पुराणसमाप्ति केली व मंगल आरती केली. आरतींत त्या दिवशीं दररोजच्या चौपट द्रव्य आलें. तेव्हां हें द्रव्य माझें आहे असें स्वामी हांसत हांसत म्हणाले, तेव्हां हा हें खरेंच म्हणतो, असें समजून अमुक अमुक कारणाकरितां हें आरतींतील द्रव्य आमचें आहे, असें संत मंडळी म्हणूं लागलीं. तेव्हां आरूढ म्हणाले तें कां? मी श्रम घेऊन सांगितलें

म्हणून हें द्रव्य माझें आहे. असें म्हणून चेष्टा करण्याच्या हेतूनें त्यांनीं ते पैसे पदरांत बांधल्यासारखें केलें, तेव्हां संतांनीं त्याचा पदर धरला आणि आम्हीं पुष्कळजण आहों व तुम्हीं तिघेजण आहां म्हणून आम्हीं सांगतों तें ऐका. तेव्हां स्वामी म्हणाले याचे दोन भाग करूं. हें बोलणें संतांनीं मान्य केल्यावर अवधूत पुनः म्हणाले तुम्हीं पैशाचे संत, किंवा शांतीचे संत ! तुम्हीं असा कलह कराल तर मूर्ख ठराल. आम्हीं द्रव्याची अपेक्षा करणारे साधु नहोंत, सदा सद्भावयुक्त असला तर साधु, नेहमीं शांत असला तर संत, ह्या थोड्याशा ( ७॥ ) रुपयांच्या खुर्चाकरितां भांडतां ? असें म्हणून आपल्या जवळच्या फाटक्या झोळींतून सोन्याच्या सात मोहरा काढून स्वामींनीं त्यांना दिल्या. तें पाहून आश्चर्य वाटून लोक म्हणाले, हा महापुरुष जगदुद्धारक आहे. विषय विषासारखे मानून तृणासारखे तुच्छ मानणारा असल्याशिवाय हा त्यागी असणार नाहीं. ह्याच्या दर्शनानें सर्व पाप्यांचा उद्धार होईल. ह्यावर विश्वास ठेवणारे धन्य होत. ह्याचीं वाक्यें ऐकणारे शिष्य कृतार्थ होत; पूर्वोक्त श्रुतिस्मृतिपुराणेतिहास इत्यादिकांत सांगितलेलें वैराग्यज्ञान ह्यांच्या ठिकाणीं प्रत्यक्ष दिसतें असें म्हणून ते परमानंदित झाले.

मग पुनः पूर्वींप्रमाणें नाचत हालगी वाजवीत, गात, भैरववेष घेतलेला, जटाधारी साधु नाचण्यांत तल्लीन झाला असतां त्याच्या मागें शाबास शाबास म्हणत पश्चिमद्वाराकडून समुद्रनाथाच्या दर्शनाला जात असतां एका भटाचे घरापुढें एक भक्त मोठ्या थाटानें पुजासाहित्य व फळें घेऊन देवालयाकडे जात असतां अवधूत त्यास विचारूं लागले कीं, अरे भक्ता, हा नैवेद्य व द्रव्य वगैरे कोठें नेतोस ! भक्त म्हणाला महाबळेश्वराकरितां नेतों. अरे मीच महाबळेश्वर नसलों तर तिकडे ने. भक्त म्हणाला,तूं देव कसा?

तुला फलाची आशा आहे या करितां तूं मनुष्यच. इतक्यांत भैरव-वेषधारी बावा त्या ब्राह्मणाचा हात धरून तें सामान घेण्याचा प्रयत्न करूं लागला. तेव्हां तो ब्राह्मण मोठ्यानें ओरडला. लागलेच जवळच्या घरांतून दुसरा एक भटजी धांवत आला, व जटाधारी बुवाला मारूं लागला तेव्हां अवधूत पुढें येऊन म्हणूं लागले कीं ह्या भैरववेषधारी मनुष्याचा विचार काय होता तो समजून घेऊन मार. तो विचार असा कीं, महाबळेश्वर सर्वांच्या अंतर्यामीं आहे म्हणून शीलेच्या रूपानें तृप्त होण्यापेक्षां मनुष्याच्या ठिकाणीं असलेल्या प्राणद्वारानें विशेष तृप्त होईल. कारण भुकेलेल्या मनुष्याला दिलेलें अन्न परमात्म्याला पोंचतें; कारण ‘ अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ’ अशी भगवदुक्ति आहे, म्हणून ह्या साधूला दिलेलें देवाला पोंचतें, हें बोलणें त्यानें मान्य केलें; व तें सर्व पूजासाहित्य वगैरे त्याला दिलें. नंतर तेथें बसून तीन भाग करून तिघेही भोजन करून घरधन्यानें दिलेलें पाणी पिऊन तृप्त होऊन खेळ करीत जात असतां भट्ट म्हणाला; तुह्मी कोठें रहातां ? तेव्हां नागतीर्थावर रहातों असें सांगून तिघेही चालते झाले.

पुढें दोघेही नाचत पैसे मागत फलोपहार वगैरे सामुग्री घेऊन समुद्राकडे गेले व समुद्रनाथाला नैवेद्य समर्पण करून जें मिळालें होतें तें सर्व वाजविणाराला देऊन आपण चालते झाले. तेव्हां तो वाजविणारा मनांत म्हणाला, आजची माझी प्राप्ति पाहून बायको व मुलगा हीं संतुष्ट होतील. माझ्या बायकोला लुगडें नाहीं तें आणून देतां येईल, मुलाला व मला धोतरें घेतां येतील. असा विचार करून त्यांची परवानगी घेऊन नमस्कार करून तो घरीं गेला. मग हे दोघे नागतीर्थावर स्नानास गेले व तेथेंच

तीन दिवस राहिले. अवधूत राहिलेल्या जागीं पुष्कळ मुमुक्षु लोक येऊन आपआपल्या शंका निवारण करून घेण्याकरितां वादविवाद करित व संतोष पावून जात.

## प्रकरण १६ वें.

नागतीर्थाहून पुढें स्वामी उळुविस गेले. तेथून श्रीपंढरीस जाऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घेऊन कल्याणि वगैरे शहरें पाहून व मोठमोठीं देवालयें पहात पहात नाशिकास गोदावरी तीर्थ पाहून पंचवटींतील गुप्त गुहेंत जाऊन काळ्या रामाचें दर्शन घेऊन, नंतर त्र्यंबकेश्वराचें दर्शन घेऊन तेथून डाकुरजीस जाऊन पुढें द्वारकेस गेले. तेथें गोमतीतीर्थ व विष्णुपद पाहून द्वारकानाथाचें दर्शन घेऊन येत असतां वाटेंत वैष्णवांपैकीं एक यति अवधूताला पाहून म्हणाला, तूं जगत् मायामय मिथ्या आहे असें म्हणणारांपैकीं दिसतोस. हें ऐकून सिद्ध म्हणाले होय, तर मग व्यावहारिक मानतोसना! किंवा प्रातिभासिक मानतोस? तेव्हां सिद्ध म्हणाले, स्वप्नासारखें प्रातिभासिक मानतों. तेव्हां वैष्णवानें विचारलें, स्वप्नाच्या प्रातिभासिकाला अधिष्ठान कोणतें! ब्रह्माधिष्ठान म्हणशील तर ब्रह्मज्ञान्याला स्वप्न न दिसलें पाहिजे. कारण ज्ञानाधिष्ठानामध्यें अध्यास होत नाहीं, म्हणून आत्माधिष्ठान म्हणजे त्वंपद शोध करण्याला योग्य अधिकाऱ्याला आत्मज्ञान झाल्यावर स्वप्न पडूं नये. तेव्हां अवधूत म्हणाले, जागृतावस्थेच्या अभिमानाला अधिष्ठान असलेल्या चेतनाला आवरणानें स्वप्न कल्पित होईल. अथवा जागृतावस्थेंत दिसणारे सर्व विषय अवच्छिन्न चेतनावरणानें स्वप्नही प्रातिभासिक होतें. अन्यपक्षीं कारणशरीर अवच्छिन्न चेतनाला सदोषावर्ती होऊन स्वप्न अध्यास होईल. कारण 'अहं' 'इदं' प्रतीति

झाल्यावर समकालांत स्वप्न आपल्या कारणांत विलय होतें. म्हणून कारणशरीरावच्छिन्न चेतनच अधिष्ठान मानावें. असें ऐकून सत्य आहे असें त्यानें कबूल केलें. तेथल्या एका वैष्णवानें स्वामीला पाहून आज पारण्याचा दिवस आहे, याकरितां अतिथीला सोडून भोजन करूं नये, असें शास्त्र आहे; म्हणून आरुढाला बोलावून त्याचें आतिथ्य केलें. पुढें उज्जनीस जाऊन महांकालेश्वराचें दर्शन घेण्याकरितां इकडे तिकडे फिरत असतां देवालयांतील दिव्य मूर्ति पाहून तो आपल्या चैतन्याच्या पादशक्तीनें उज्जनीला प्रकाशित करीत आहे, असें समजून तेथून निघून ओंकारेश्वराला आले. युगांत एकवेळ कोटिलिंग उत्पन्न होण्याचें तळें पाहून म्हणाले, कलियुगांत मनुष्याला विश्वास वाटावा म्हणून पक्षितीर्थांत भक्ताला जसे पक्षी दररोज दिसतात, तशीं ह्या महा स्थानांत लिंगें प्रत्यक्ष दिसतात. असें म्हणून ब्रह्मपुरींतील निर्वाण आखाड्यांतील महात्म्याचें दर्शन घेऊन तेथून रुद्रपुराला गेले. तेथें ओंकारेश्वरास हस्तस्पर्श करून तीर्थ घेऊन खालील डोहांत असलेल्या माशांना अन्न घालतांना पाहून, भगवंतानें बसल्या ठिकाणीं आहार ठेवला आहे; यासाठीं अन्नाकरितां प्रयत्न करण्याचें कारण नाहीं; असें मनांत आणून ध्यानस्थ बसले. नंतर दोन तासांनीं आणखी एक भक्त पुष्कळ फळें घेऊन माशांस घालीत असतां ह्या महात्म्याला पाहून त्यानें विचार केला कीं, हा आनंदसागरांतील निवृत्तिनदींत मत्स्यावतार रूपानें आहे म्हणून याला प्रसंतर्पण करून मग माशांस अन्न वगैरे घालावें हें बरें; असें मनांत आणून अनेक प्रकारचीं पक्वान्नें, केळीं, शर्करायुक्त पदार्थ, अनेक प्रकारचे डाळीचे पदार्थ आणि इतर शाकभाज्या वगैरे यांचे पुढें ठेवून माशाकरितां आणलेल्या फळांच्या पांच टोपल्याही ह्यांच्यापुढें आणून ठेवल्या. मग स्वामींनीं मिताहार करून विश्रांति घेतली.

नंतर ते सर्व पदार्थ मांशांस घाला असें स्वामींनीं म्हटलें. तेव्हां ते पाण्यांत टाकिल्यावर मोठमोठे मासे खालीं वर तोंड करून उड्यां मारतांना पाहून आनंद पावून स्वामी तेथून निघाले.

## प्रकरण १६ वें.

पुढें मथुरेस जाऊन श्रीकृष्णाचें दर्शन घेण्याकरितां त्याजपुढें उभे राहून ह्मणाले, कीं तूंच आत्माराम अंतर्बाह्य भरला आहेस. असें म्हणून राधाकृष्णाचे देवालयांतील दिव्यमूर्ति पाहून वृंदावनांत भगवंतांनीं रासक्रिडा केलेली जागा पाहून, मुरलीधराचें दर्शन घेऊन तेथून निघून काश्मीरास जाऊन, तेथें अनेक ज्योतिषांची गांठ घेऊन, खगोलसंबंधीं विचार करून एके दिवशीं स्वस्थ बसले असतां सहज एका जोशाला विचारिलें कीं, सुमुहूर्त उच्चारावयाचा झाला, तर प्राप्तकालींचा किंवा अप्राप्त कालींचा ? तेव्हां जोशी ह्मणाला सुमुहूर्त प्रथमपाद पांचव्या मुहूर्तांत उच्चारला पाहिजे. सिद्धारूढ होय ह्मणाले. जोशानें त्या अवधूताला ज्योतिषशास्त्रांत गति आहे असें पाहून विचारिलें कीं, सूर्यग्रहण एकांश, द्व्यंश, पूर्णांश काय कारणानें होतें ? अवधूत म्हणाले, ज्या राशींत सूर्य येतो त्या राशींत नक्षत्राचे नऊपाद असतात. त्यांपैकीं सूर्य जेवढ्या पादांत असतो, तेवढें अंशग्रहण होतें हें ऐकून जोशालाही आनंद झाला.

पुढें तेथून निघून पंजाबांत आल्यावर एका गांवीं ज्ञरक मुनीच्या सांप्रदायानें औषधें देणाराची गांठ पडली. त्याला सांगूं लागले कीं, रोगाची साध्यासाध्य परीक्षा करून नंतर गुणपारिग्रह पाहून प्राण आदिकरून चार भाग करपून त्यांपैकीं दोन भाग ईश्वर-

स्मरणानें व बाकी राहिलेले दोन भाग औषधानें निवृत्त करावे. हें ऐकून वैद्य ह्मणाला होय. तेथून अमरसरोवराला येऊन हें क्षेत्र पुष्कळ सरोवरासारखेंच आहे असें समजून, नानकशहाचे देवालयांत जाऊन त्यानें केलेला गुरुमुखी नांवाचा लेखी ग्रंथ पाहून, तेथें असलेल्या लोकांना ओंकारोपासना तुमच्या ग्रंथांत प्रसिद्ध आहे, म्हणून तीच तुह्मीं करावी असा त्यांना उपदेश करून, सारंगपुरावरून कुरुक्षेत्रास येऊन तेथून हारिद्वारास आले, तेथून बदरीनारायणाचे आश्रमास येऊन बदरीकेदारेश्वर पाहून गंगोत्रीचें दर्शन घेऊन ज्ञानवापीजवळ निर्विकल्प समाधि लावून बसले.

तेथें हें शरीर अजगरासारखे जमिनीवर टाकून देऊन हे पडले असतां तेथें शिवानंद नांवाचा संन्याशी आला आणि हा निजलेला मनुष्य शिवासन घालून योगाभ्यास करीत असावा किंवा ब्रह्मनिष्ठ होऊन सहजास्थितींत असावा. याची परीक्षा करावी म्हणून याला हस्तस्पर्श केला तेव्हां अवधूत डोळे उघडून पाहूं लागले. नंतर त्याच्या मनोभिप्रायाप्रमाणें हें कोणतें आसन म्हणून विचारिलें, तेव्हां अवधूत म्हणाले, तुला जर आसनज्ञान आहे तर तूं कोणत्या आसनांत आहेस ? तेव्हां संन्याशी म्हणाला, मी उभा राहिलों आहे, तें स्तंभासन होय. तूं शयन केलें आहेस तें आसन कोणतें ? तेव्हां अवधूत म्हणाले, आईच्या गर्भांतून बाहेर आल्यावर देहच आपण असें मानणाऱ्या जीवाला आसनादि असतें पण पूर्ण ब्रह्मानंदांत ऐक्य होणाऱ्या महात्म्याला कोणतेंही आसन नाहीं तेव्हां संन्यासी म्हणाला. बिंब प्रतिबिंबाला भेद संसर्ग आहे किंवा अभेद संसर्ग आहे ! अवधूत म्हणाले भेदाभेद तादात्म्य हें अनिर्वचनीय आहे. असा माझा सिद्धांत आहे. तो कसा असें संन्याशानें विचारिलें. उपाधि भेद अनुभवानें अभेद आहे. तो कसा ? असें पुनः संन्याशानें विचारिलें. तेव्हां

अवधूत म्हणाले दर्पणांत तोंड पहातांना मानेवर असलेलें तोंड उत्तरेकडे असलें तर दर्पणांतील बिंब दक्षिणेकडे तोंड असलेलें दिसतें. हा उपाधीत भेद आहे व अनुभवाच्या वेळीं हा अभेद वाटतो. तो कसा तर आरशांत पहाणारा आपल्या मिशा, मुख, लावण्यवगैरे सलक्षण आहे, असा अनुभव आपल्या ठिकाणीं समजून अभेद असून भेद, अभेद, ह्याचा निश्चय न करितां अनिर्वचनीय सिद्धांत होय असें म्हणाले. तें संन्याशाला पटलें. नंतर त्यानें मधूकरी आणली होती ती उभयतांनीं बसून खाऊन तृप्त होऊन मित्रभावानें वागून संन्यासी आपल्या आश्रमास गेला. सिद्धारूढ एके दिवशीं ढुंढपाणी लिंगाच्या दर्शनास जात असतां तीन वर्षें ज्वरानें ग्रासलेल्या एका ब्राह्मणाचें दुःख पाहून त्याचा ज्वर नाहींसा करून पंचाक्षरोपासना कर असें सांगून पुढें चालते झाले.

---

## प्रकरण १७ वें.

पुढें फिरत फिरत केदार घाटावर येऊन केदारेश्वर लिंगाचें दर्शन घेऊन जंगमवाडीकडे जाऊन तेथून अन्नपूर्णा देवालयांत येऊन देवीचें दर्शन घेऊन सुराभांड लिंग पाहून ब्रह्मघाट उतरून तेथें आचमन करून विश्रांति घेण्याकरितां दशाश्वमेधघाटावर येऊन देवालयांत बसून मनांत विचार करूं लागले कीं, प्रजापतिनें या ठिकाणीं दशाश्वमेधयज्ञ केला म्हणून या स्थानांस दशाश्वमेधघाट असें नामाभिधान प्राप्त झालें. मी आणि प्रजापती भिन्न नाहीं कारण अनेक प्रजांच्या वृत्तिस्थितिला मीच अधिष्ठान आहें म्हणून प्रजापतीला व मला भेद नाहीं. नंतर अन्यवृत्ति उपशमनार्थ चिंतन करण्यांत एक क्षण निर्विकल्प समाधि लावून

बसले. इतक्यांत महादेव शास्त्री, त्याचे २६ शिष्य बरोबर घेऊन तेथें आला " द्रव्य गुण, कर्म सामान्य, विशेष, समवाया भावा सप्तपदार्थः तत्र द्रव्याणि पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, काल, दिक्, आत्म, नांनाभि, नवेव रुपादि चतुर्विंशति गुणाः उत्क्षेपणादि पंचकर्माणि सामान्यं द्विविधं विशेषास्त्वनंता एव समवायस्त्वेक एव अभावश्च तुर्विधाः तत्र गंधवती पृथ्वी साद्विविधा नित्यानित्याचेति नित्या परमाणुरूपा अनित्याकार्य रूपा, सायुन त्रिविधा; शरीरेंद्रिय विषय भेदात् शरीर मस्मदादीनां, इंद्रियं गंधग्राहकं घ्राणं नासाग्रवर्ती विषयो, महत्पाषाणादि " असा आपल्या शिष्याला महादेवशास्त्री उपदेश करीत असतां जगन्नाथभट्ट नांवाचा आणखी एक शास्त्री ७२ विद्यार्थी बरोबर घेऊन आला व गौतमोक्त न्याय शास्त्रांपैकीं नामाचा उपदेश करूं लागला. तो कोणता म्हणाल तर " प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन, दृष्टांत, सिद्धांत अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितंड, हेत्वाभास, छलजाति, निग्रह, स्थान " वगैरे सोळा पदार्थांचें लक्षण व परीक्षा यांचा उपदेश करूं लागला. महादेवशास्त्री म्हणाले " सप्तैव पदार्थाः " नंतर जगन्नाथभट्ट म्हणाले " ननु षोडशपदार्थाः तत्व ज्ञानान्निश्रेय साधिगम इति न्यायशास्त्रे निरूपिते " " तस्मात्कथं सप्तैव इति दृष्टे सति " तऱ्हां महादेवशास्त्री म्हणाले हे सोळा पदार्थ या सातांत अंतरभाव होतात. असा दोघांचा वाद चालला असतां जगन्नाथ भट्टानें द्रव्यलक्षण विचारिलें. महादेव शास्त्री म्हणाले; " गुणानामाश्रया द्रव्यः "

इतक्यांत अवधूत मनांत म्हणाले, हे अनित्य वस्तूबद्दल विचार करीत बसले तर नित्य वस्तु यांना मिळावयाचीच नाहीं; याकरितां यांची वृत्ति नित्य वस्तूकडे फिरवावी, म्हणून त्यांनीं त्या शास्त्र्यांला विचारलें कीं, पंडितहो, तुम्हीं द्रव्य गुणादि विचार करणारे आहां.

द्रव्यगुणादि हें आपलें स्वरुप मानितां किंवा त्यांना भिन्न मानितां? त्यांपैकीं जडस्वरूप आपण आहों म्हणाल तर तें योग्य नव्हे कारण तुम्हीं चेतन स्वरूपीं आहां म्हणून जडाला पृथक् गणिलें पाहिजे. अभिन्न जें चेतन तें ब्रह्मचेतनापासून निराळें किंवा अभेद आहे? भेद म्हणाल तर "एक मेव" या श्रुतीला विरोध येईल म्हणून तसें म्हणूं नये; अभेद असेंच मानिलें पाहिजे. हा अभेद निरंतर किंवा ज्ञानकालीं? ज्ञानकालीं म्हणाल तर "स्वतः सिद्धत्व" जाईल याकरितां असें म्हणूं नये तर मग हा अभेद निरंतरच आहे. तरी पण हें निरंतर अभेद ज्ञान आपोआप मोक्षदायक होतें अथवा कर्मवासना वगैरेचें सहाय घेतें? तेव्हां पंडित म्हणाले, 'सहाय घेतें' आरूढ म्हणाले "ज्ञानादेव तु कैवल्यं" ह्या श्रुतींत 'एव' हें पद ज्ञानाला असहाय आहे, म्हणून 'तु' पद व्यर्थ होईल. कारण 'तु' पदानें सर्व जड साधनें व्यावर्तन करून ज्ञानाचें फल कैवल्य हें सिद्ध झालें. हें अवधूताचें भाषण ऐकून शास्त्री म्हणाले हा तपोनिधि विश्वेश्वराच्या कृपेनें ब्रह्मनिष्ठ आणि अनुभवी झाला आहे. म्हणून यांच्यापाशीं तर्क चालत नाहीं. कारण आमच्यापाशीं शब्दज्ञान आहे तसें अनुभवज्ञान नाहीं. ह्या महात्म्याच्या ठायीं नम्रभाव धरावा. तेव्हां ते शास्त्री आपल्या शिष्यांसहित समोर उभे राहून हात जोडून म्हणाले. स्वामी महाराज 'तथास्तु, तथास्तु.' अवधूत म्हणाले, हे अविमुक्त क्षेत्र तारकोपदेशाचें स्थान आहे म्हणून सर्व शास्त्र्यांनीं तारकोपदेशाच्या वेळीं समन्वय करावा. तसें न करितां भिन्नान्वय करणें योग्य नव्हे, कारण वेद करणाऱ्या देवाचा तसा अभिप्राय नाहीं, हें ऐकिल्यावर सत्यं आचार्यवर्य असें म्हणून नमस्कार करून ते शास्त्री चालते झाले.

## प्रकरण १८ वें.

गेल्यावर त्यांच्यापैकीं तीन शिष्य पुनः परत येऊन स्वामीस
लागले कीं, तुह्मीं आह्मांस ब्रह्मोपदेश करणें योग्य नाहीं;
अप्रत्यक्ष असलेलीं व कधीं न ऐकलेलीं वाक्यें ऐकून
मन अभावरूप होतें, सद्भावरूप होत नाहीं. अवधूत
मन शून्यांत लय होतें किंवा ज्ञानशून्यांत लय होतें ?
न्यांत लय होतें असें ह्मणूं नये, तें लय होतें असें ह्मटलें
मजलेली गोष्ट नाहींशी होईल. तसें अनुभवास येत नाहीं.
तां ज्ञानलयरहित आहे ह्मणून शून्यभाव सद्भाव ह्मणावा. हें
शिष्य ह्मणाले तुमचें सांगणें असें आहे कीं आह्मीं गरीब
राजासारखे होऊं. अवधूत सांगू लागले कीं पित्त झालेल्या
ा आपणच तळवार ( रामोशी ) अशी भ्रांति होते; तशी
भ्रांति आहे. तेव्हां ते ह्मणाले तुमची स्थिति निराळी व
ी स्थिति निराळी, आरूढ ह्मणाले ह्या दोन्ही स्थितीला
ण नसल्यामुळें असलेल्या निर्विशेषण स्थितींतला आत्मा,
आणि अंधार न समजणाऱ्या आकाशाच्या निर्मलत्वाप्रमाणें
रूप आहे. हें ऐकून ते आह्माला अनुभव आला नाहीं असें
. अवधूत ह्मणाले सांगितलें एवढें विसरूं नका. तें असो
ांडित कां होऊं नये ह्मणालतर पांडित्य अभिमानाला कारण
ते ह्मणाले अभिमान असला तर काय झालें ? अवधूत ह्मणाले
ार्वांपासून पंडित ब्रह्मराक्षसाच्या जन्मास जातात. तें समजून
कांहीं पंडित भयानें विद्यागर्व सोडून देतील तर बरें. हें
त्यांना आश्चर्य वाटलें, आणि आह्माला ब्रह्मस्थिति मिळेल
आशीर्वाद द्यावा असें ह्मणाले. तेव्हां तुमची भावना चांगली

असेल तर तसें होईल, असा आशीर्वाद देऊन अभ
त्यांचे शिरीं ठेवून चालते झाले.

अवधूत हे तेथून निघून अहिल्याघाटावर येऊन तेथें क्ष
विसांवा घेऊन नंतर नारदघाट पाहून, तेथून चौसत्तीघाट
पांडेश्वरघाटाला येऊन चवकीघाट पाहून महाश्मशान घ
जाऊन तेथें शिवालयांत महादेवाची मूर्ति पाहून तेथून
जाच्या घाटास येऊन नंतर लोलार्क घाट पाहून, आशीसंगम
जाऊन आनंदानें थोडा विसांवा घेऊन नंगा घांटावर जाऊन
तेथें एक नंगा बैरागी येऊन विचारूं लागला कीं, वस्त्रें धारण
णाराला काळजी असते, सुख नसतें. तूं साधु असून तुला
कशाला पाहिजेत? अवधूत म्हणाले, वस्त्रें वर्ज्य केलेल्या
स्पर्श जाणणाऱ्या इंद्रियविषयाच्या संयोगापासून सुख-दुःख
किंवा नाहीं? नंगा म्हणाला, प्रारब्धानें व्यवहार चालला
शांतता असेल तर सुख दुःख नाहीं. सिद्धारूढ म्हणाले,
शांतताच सुखाचें साधन होय. पांघरूण घेणें न घेणें हें सु
साधन नव्हे. बैरागी म्हणाला "मू दिवाणा दिल शिया
म्हणजे वर खुळ्यासारखा दिसतोस पण आंत शहाणा
ब्रह्मनिष्ठ आहेस. असें म्हणत निघून गेला.

अवधूत तेथून निघून व्यासकाशी म्हणतात, त्या रामन
जाऊन राजाच्या पक्या तलावावर बसून क्षणभर विश्रांति
गिरिजादेवीच्या देवालयांत जाऊन निर्विकार-समाधिस्थ
राहिले. इतक्यांत देवीचा पुजारी येऊन आरुढास पाहून म्हण
हा अतिथी कित्येक दिवसांचा उपाशीं असावा. कारण याचे
अगदीं पाठीस लागलें आहे. हें ऐकून आरूढ मनांत म्हणाले
व्यासमुनींनीं काशींत तीन दिवस भिक्षा मागितली, तरी
मिळालें नाहीं. म्हणून काशीला नानाप्रकारांनीं तुच्छ केल

४

काशीबाहेर जा, असा परमात्म्यानें त्याला शाप दिल्यामुळें, ते जसे उपाशी बाहेर पडले त्याप्रमाणेंच मी आज तीन दिवस उपाशी असून, आज एथें आलों आहें. एथें प्रारब्धपरिचारक काय करितो पाहूं. असा विचार करीत आहेत, इतक्यांत पुजारी ह्मणाला, हे अतिथी, तूं कोण आहेस ? अवधूत ह्मणाले, तुला तूं जाणलेंस तर तूं जो कोण आहेस तोच मी आहें. तर मग जेवण करतोस काय ? तूं जेवलास तर मी जेवतों. पुजारी ह्मणाला, मला भूक लागली आहे घरीं जाऊं या. महात्मे ह्मणाले, घरीं घेऊन जाऊन अन्न घातलेंस तर थोडें पुण्य लागेल, पण एथेंच जेवावयास घातलेंस, तर महत्पुण्य लागेल. पुजाऱ्यानें घरीं जाऊन मालपुवा वगैरे पक्वान्नें राजाच्या भोजनशाळेंतून पाहिजे तेवढीं आणलीं. ते दोघे भोजन करीत बसले आहेत, इतक्यांत आसपासचे वरेच अतिथी गोळा झाले. तेही त्यांच्या बरोबर जेवून तृप्त झाले. मग स्वामी पंचक्रोश यात्रेस निघाले.

---

## प्रकरण १९ वें.

स्वामींनीं प्रथम जनकराजानें स्थापिलेल्या कर्दमेश्वराचें दर्शन घेऊन दुसऱ्या मुक्कामाला भीमचंडीचें दर्शन घेऊन गंधर्वसेन, काकी शुक्त, पश्चिमेश्वर इत्यादि लिंगें पाहून तिसऱ्या मुक्कामाला अयोध्यावासी श्रीरामचंद्राचें दर्शन घेऊन, मार्गांत द्रौपदीतीर्थ पाहून, चवथ्या मुक्कामाला पांच पांडव पाहिले. तेथून निघून मध्यें असलेलीं लिंगें पाहून पांचवे मुक्कामाला आले, तेथें कपिलधारातीर्थीं आचमन करून सिद्धकरी इत्यादि लिंगें पाहून स्वर्गफल देणारी सिद्धदुर्गाही त्यांनीं पाहिली. नंतर शिवराम

नांवाचें लिंग पाहून निर्वाश्या, सर्व सुंदरी, सिद्धि, बुद्धि, स्वधा, स्वाहा, महानिद्रा इत्यादि शक्तियुक्त देवता पाहून पंचक्रोश यात्रेची समाप्ति करून ते एके ठिकाणीं बसले. इतक्यांत एक गृहस्थ लाह्याचें पीठ घेऊन जात होता, त्यानें अवधूतास पाहून त्याला थोडेंसें पीठ द्यावें,असा मनांत विचार करून दोन बुचुकल्या पीठ त्यास दिलें. तें अवधूत घेऊन बसला आहे, इतक्यांत दैवयोगानें कांहीं भक्त तेथें येऊन दहीं—पीठ कालवून खात बसले. त्यांनीं कोरडेंच पीठ घेऊन बसलेल्या अवधूतास पाहून एक द्रोणभर दहीं व थोडेंसें मीठ दिलें. तें स्वामींनीं घेऊन त्यांत मीठ कालवून त्याचा लाडू करून खाल्ला व तेथेंच स्वरूपस्थितींत विश्रांति घेऊन सकाळीं उठून प्रयागतीर्थाला निघाले. वाटेनें मनांत म्हणूं लागले कीं, क्षेत्रसंचार करण्यास सामर्थ्य नसणारा क्षेत्रनामाचें संकीर्तन करील तर तो धन्य होईल. कारण सर्व तीर्थक्षेत्रांचीं नांवें परमात्मावाचक आहेत; म्हणून त्या नामाचें ध्यान करणारा तें रूपच पावतो. नंतर प्रयागतीर्थास पोंचल्यावर संगमाच्या ठिकाणीं स्नान करणारे, तीर्थाच्या कावडी भरणारे, आणि रामेश्वराहून आणलेल्या वाळूचीं लिंगें करून संगमांत निमज्जन करणारे पुष्कळ लोकांना पाहून स्वामी म्हणाले कीं, हे ह्या कर्मानें ईश्वराला प्रसन्न करून घेऊन त्याच्या प्रसादानें पुनीत होऊन, ज्ञानाला अधिकारी होतील; असें म्हणून तेथून निघून किल्ल्यांत संगमनाथाचें दर्शन घेऊन अक्षय्यवटाचें मूळ पाहून तेथून निघून मोगल सराईत येऊन गांवांत शिरावयाचे वेळीं दिवस गेला व अंधार पडून झडीच्या पावसाला सुरुवात झाली. मेघ गडगडूं लागले, सोसाट्याचा वारा वाहूं लागला, विजा चमकूं लागल्या, वादळानें दिशा धुंद झाल्या, अशावेळीं सुद्धां शांत चित्तानें एक अलंकारिक विचार करीत चालले होते. तो असा कीं मेघ कां गडगडत असावे ? इंद्राचा

शत्रु जो मैनाकपर्वत तो समुद्रांत बुडाला आहे व समुद्रनाथानें त्यास पाठीशीं घातलें आहे, म्हणून इंद्राचा योद्धा मेघ हा समुद्र-नाथाला मोठमोठ्यानें ओरडून सांगत आहे कीं, इंद्राचा शत्रु मैनाकपर्वत याला बाहेर सोडतोस कीं युद्धास येतोस ? मेघाच्या गडगडण्यावर ही उत्प्रेक्षा आहे.

गांवांत गेल्यावर एका सावकाराच्या घरांत जाऊन बसले. तेव्हां एक सेवक येऊन ह्मणाला कीं हें सावकाराचें घर आहे. तूं येथें कां बसलास ? तेव्हां अवधूत ह्मणाले, हा मुशाफरखाना आहे, असें समजून मी एथें बसलों. सेवक ह्मणाला तूं मूर्ख आहेस ? मी शेण खात नाहीं, अन्न खातों. मला शेण खाणारा ह्मणतोस तेव्हां तूंच मूर्ख. असें अवधूत ह्मणाले. सेवक ह्मणाला मी कस मूर्ख ? तेव्हां स्वामी ह्मणाले, ह्या घरांत हल्लीं कोण राहतो ? सावकार; ह्याच्यापूर्वीं कोण रहात होतें ? ह्याचा बाप; ह्याच्या पूर्वीं ह्याचा आजा; समजलें बाबा. तेव्हां स्वामीं ह्मणाले एका-मागून एकजण एथें वस्ती करीत आले आहेत; स्थिर असा कोणीही राहिला नाहीं. तर मग हा मुशाफरखाना नव्हे काय ? हें मर्म न समजतां हें घर सावकाराचें आहे, असें ह्मणतोस तेव्हां तूं मूर्ख नव्हेस काय ? असा दोघांचा वाद मोठमोठ्यानें चालला आहे; असें पाहून सावकार आंतून बाहेर येऊन सेवकास ह्मणाला, ह्या सर्व गोष्टी वैराग्यास कारण आहेत व त्याचें बोलणें नीतीस अनुसरून आहे म्हणून ह्यानें मला उपदेशच केला. याकरितां हा माझा खरोखर गुरुच होय. असें शिपायास सांगून अव ता-कडे पाहून प्रार्थना करूं लागला कीं, गुरुमहाराज, आज आपण एथेंच रहावें व उद्यां जावें. तेव्हां अवधूत ह्मणाले, तूंही आपल्या आयुष्याच्या एके दिवशीं जाणार आहेस, तेव्हां या धर्मशाळेंत मीही तसाच आहें. मग सावकारानें नम्रपणें नमस्कार करून

हात धरून त्यांना माजघरांत नेलें. आरसेमहाल दाखवून दिवाण-खानाही दाखविला. तेथें त्याचीं मुलें बुद्धिबळें खेळत होतीं. तेथे अवधूतांनीं एकदां प्यादेमात आणि घोडमात केली. आणि एका डावांत राजा हत्तीजवळ, व एका डावांत वजीराजवळ असूनही त्यास शह दिले. एका डावांत बुरजी झाली. तेव्हां सर्व-जण म्हणाले, हा बोलण्यांत व खेळण्यांतही हुषार आहे. मग त्याला दुसऱ्या घरांत भोजनास घेऊन जात असतां तीन महिन्यापासून सावकाराची आई पोटशूलानें आजारी होती. तिच्या पोटांत मोठी कळ येऊन ती रडूं लागली. तिचें रडें ऐकून अवधूत म्हणाले. कोण रडत आहे? तेव्हां सावकार म्हणाला, माझ्या आईला तीन महिन्यां-पासून पोटशूळाची व्यथा आहे व आज कळ अधिक उठल्यामुळें ती रडत आहे. तेव्हां अवधूत म्हणाले असें धैर्य सोडूं नका. चला आपण तेथें जाऊं; असें म्हणून सर्वजण तेथें गेले. स्वामी म्हणाले, पूर्वजन्मांत केलेलें पाप दुसऱ्या जन्मांत व्याधिरूपानें पीडा देतें. तें शिवध्यान, मानसपूजा, महात्म्यांचें पादतीर्थ घेणें, इत्यादि उपायानें नाहींसें होतें. हें ऐकून सावकारानें ह्या महात्म्याचें पादतीर्थ दिलें, तत्काल पोटशूळ बंद झाला. तें पाहून सर्वांना आनंद झाला.

---

## प्रकरण २० वें.

पुढें भोजनोत्तर सावकार म्हणाला, स्वामी महाराज, ह्या पलंगा-वर निजावें. तेव्हां अवधूत म्हणाले, मला जमीन व छप्परपलंग सारखाच. नंतर पलंगावर निजून म्हणाले, प्रारब्धभोग एक-वेळ उघड्या पायांनीं फिरवितो व एकवेळ पलंगावर निजवितो. पण हे दोन्ही मिथ्या आहेत. 'नंतर स्वामी' प्रातःकाळीं जागे

होतांच कोणास न विचारतां घरांतून बाहेर पडून गयेस जात असतां वाटेंत एका शिवालयांत बसले.

ती शिवपूजेची वेळ होती, यामुळें पूजा वगैरे होऊन वाद्यें वाजविणें झाल्यावर गायन सुरू झालें. गाणारा भैरवी रागांत गाऊं लागला. हा पूजाकाल आहे, तेव्हां शंकराभरण रागांत गावयास पाहिजे, असें स्वामी म्हणाले. गवयांनीं तें कां? म्हणून विचारिलें. तेव्हां स्वामी म्हणाले, शंकराचीं आभरणें म्हटलीं, तर त्याचें हृदय झांकणारे सर्पच; व शंकराभरण रागाचें फल नाभिस्थान सोडून ऊर्ध्वमुख होऊन ब्रह्मरंध्राकडे जाणें हेंच आहे. तेव्हां गवई उठून येऊन स्वामींस नमस्कार करून रागाच्या उत्पत्तीचें स्थान कोणतें असें विचारूं लागले. तेव्हां स्वामी म्हणाले, परशिव जो ईश्वर, सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष, ईशान्य, निरंग अशा सात मुखांपासून सात प्रकारचे स्वर क्रमानें निघाले आहेत व त्यांना षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत, व निषाद अशीं सात नांवें आहेत; आणि हे स्वर शरीराच्या निरनिराळ्या भागांपासून उत्पन्न होतात. ते असे–कंठापासून षड्ज, याच क्रमानें डोकें, नाक, हृदय, मुख, टाळु व पूर्वांग यांपासून बाकीचे ६ स्वर निघतात. त्यांचा रंजनकाल कोणता म्हणाल तर मध्यान्हीं षड्ज, याच क्रमानें अपरान्ह, सायाह्न, पूर्वरात्रि, अपरात्रि, निशावसान, प्रभात, हे सहा काळ बाकीच्या स्वरांस योग्य होत. आणि त्या षड्जादि स्वरास उपमान स्वर कोणते म्हणाल, तर मोराचें ओरडणें. त्याच्यासारखा स्वर षड्ज, याचक्रमानें पोळाचें डुरकणें, बोकडाचा ध्वनि, क्रौंचाचा स्वर, कोकिलाचें गाणें, मत्तहत्तीचा ब्रूंही शब्द, जात्यश्वाचें खिंकाळणें, हे उपमान स्वर होत. सजीव मनुष्याच्या ज्या भागापासून जे स्वर निघतात, तेथें ते परत नेऊन त्याचा लय केला, तर परमात्म्याचे कृपेनें आत्मज्ञान होऊन मुक्त

व्हाल. याकरितां ईश्वरप्रीत्यर्थच स्वराचा उपयोग करावा. मनुष्याकरितां करूं नये. इतकें सांगितल्यावर सर्व गवयी नमस्कार करून निघून गेले व स्वामीही चालते झाले.

पुढें गयेस गेले. तेथें विष्णुपदीं पिंडदान करितात, तें पाहून आईच्या गर्भांतील १५ दिवसांचा पिंड ह्यासारखा असावा अशी कल्पना करून तेथून वैजनाथ क्षेत्रास गेले. तेथील देवालयांत अभिषेक चाललेला पाहून आपल्याशींच म्हणाले कीं, सूर्य हा नमस्कारप्रिय, वायु गंधप्रिय, गणपति दूर्वाप्रिय, त्याप्रमाणें महादेव हा अभिषेकप्रिय असावा; म्हणूनच याला सर्वजण अभिषेक करितात. स्थूललिंगाला स्थूल पाण्यानें अभिषेक करावा, असें प्राकृत मंद पुरुषाला सांगितलें आहे. कारण देवांत असलेली शिलाबुद्धि नेली, तर देवबुद्धि शिलक रहाते. तशी देहीची देहबुद्धि गेली तर आत्मबुद्धि प्रत्ययाला येईल; असा पूर्वींच्या लोकांनीं उपदेश केला आहे. असा विचार करीत तेथून अरुणाचलाला जाऊन परमात्म्याचे स्मरणमात्रानेंच मोक्ष आहे, म्हणून शास्त्रानुसार आपलें ध्येय वस्तुतत्परतेनें एक क्षण निर्विकल्प स्थितींत अरुणाचलावर बसून वृत्ति सविकल्पाकडे आली तेव्हां हा अरुणाचलेश्वर ध्यानप्रिय आहे. याकरितां ध्यानपूजा योग्य आहे. म्हणून "आत्मा त्वं गिरिजापति" इत्यादि संप्रदाय आचार्यांनीं सांगितले आहेत, त्याप्रमाणें आपला आत्माच अरुणाचल आहे. असें समजून मानसपूजारूप ध्यान करून तेथून पर्वत उतरून गंगा १०० मुखांनीं समुद्रास मिळाली आहे, तेथें गेले.

त्या ठिकाणीं चार दिवस संचार करीत असतां सहज एके दिवशीं महाराजांच्या मनांत असे विचार आले कीं, ही महागंगा, भक्तिरसमय झालेली देवी, शंकराच्या जटेतून भगीरथाच्या तपाला मान देऊन कपिल महामुनीच्या क्रोधाग्नीनें दग्ध झालेल्या

भगीरथाच्या पूर्वजांना साठ हजार सगरांना, पावन करून इतर लोकांनाही पावन करण्याकरितां भूलोकास आली. नंतर तेथून पुढें कलकत्यास जाऊन महाकालीचें दर्शन घेऊन तेथून जगन्नाथपुरीस आले. तेथील नीलचक्र पाहून देवालयांत देवदर्शन घेण्याकरितां वांकून उभे राहिले असतां, एकावर एक अशी सात भांडीं ठेवून शिजवून तयार केलेल्या भाताच्या भांड्यापैकीं, एक भांडें घेऊन देवाला नैवेद्य दाखवून पुजारी सर्वांस प्रसाद देत होता, तो आपल्याला मिळावा अशी स्वामींस इच्छा झाली व अन्नच ब्रह्म असलेल्या स्थानाचा महिमा लक्षांत आणून तें अन्न घेतलें. नंतर कांहीं ब्राह्मणसमुदाय येऊन देवदर्शन घेऊन अन्नाचीं दोन भांडीं विकत घेऊन भोजन करीत असतां अवधूताला पाहून ह्या अतिथीला थोडें घे असें एकजण म्हणाला. तें घेऊन तृप्त होऊन देवाचें पुनः एकवेळ दर्शन घेऊन बाहेर येऊन थोडी विश्रांति घेऊन समुद्रतीरीं कबीरदासाच्या मंदिरास गेले. तेथें पुष्कळ संत पाहून क्षणभर शांतिसुख अनुभवून, सविकल्प वृत्ति झाल्यावर हे संत रामनाम पुनः पुनः कां उच्चारितात, त्यांना रामनामाचा महिमा माहित नसावा; असें समजून स्वामी म्हणाले, संतहो, ऐका. वाल्मीकीनें रचलेल्या शतकोटी रामायणापैकीं एक भाग स्वर्ग-लोकीं, एक भाग पाताळलोकीं, व एक भाग मृत्युलोकीं याप्रमाणें तीन ठिकाणीं समभाग वांटून दिले त्यांपैकीं सार रामनाम तें एकच वेळ भक्तीनें उच्चारिल्यास मुक्ति प्राप्त होते या करितां तुम्ही रामनाम वरचेवर उच्चारूं नये, उच्चारिल्यास त्याचें माहात्म्य कमी होतें म्हणून एकवेळ उच्चार करावा. हें संतांना मानवलें व रामनामाचे सकृत् उच्चारानें आनंद पावले. व स्वामीपुढें चालते झाले.

---

## प्रकरण २१ वें.

पुढें कटक नांवाच्या शहरीं आले व तेथून महानदी उतरून भद्राक्ष नांवाच्या नगरीं प्रवेश केला. तेथें भद्राक्ष देवाचें दर्शन घेऊन परत नदी उतरण्याचे वेळीं नाव मिळाली नाहीं. दोन दिवस नदीच्या कांठीं थंडींत उपाशीं राहून दुःख सोसलें. पूर्व-तपामुळें व शक्ति अधिक असल्यामुळें, इतकी पीडा झाली तरी शांति कायम होती. मग तिसरे दिवशीं एक भाग ओलांडून जाऊन चवथे दिवशीं दुसरा भाग ओलांडून पांचवे दिवशीं तिसरा भाग ओलांडण्यास नावाडी तीन पैसे मागूं लागले. मी पैशाला शिवत नाहीं, असें सांगितलें. तें त्याला खरें वाटलें नाहीं, म्हणून त्यांनीं पैसे नसले तर दुसरें कांहीं असलें तर दे असें म्हटलें. तेव्हां ह्या जुन्या कौपिनीशिवाय मजजवळ कांहीं नाहीं, असें सांगून ती त्यांच्या पुढें केली. तेव्हां ते नावाडी लज्जित होऊन ह्याच्याजवळ कांहीं नाहीं असें समजून त्यांनीं त्याला नदींतून पलीकडे फुकट पोंचविलें. उतरतांना इतर उतारूंपासून पैसे घेतले, ते त्या दिवशीं दर रोजच्या चौपट मिळाले. तेव्हां ते त्या अतिथीकडे पाहून म्हणाले, आज अधिक पैसा मिळाला, तो या अतिथीच्या कृपेमुळें मिळाला, हें त्याला नावेंतून अलीकडे आणलें त्याचें फल आहे. असें समजन त्याला एक वस्त्र देऊं या; असें म्हणून मांजरपाटाचें एक ठाण त्यांस दिलें. अवधूतानें त्यापैकीं फक्त ६ हातांचा एक तुकडा घेऊन बाकीचें कापड तेथें असलेल्या इतर अतिथींस देऊन टाकलें. हें पाहून सर्वजण म्हणाले कीं, देहावर याची प्रीति नसून ह्याला वस्त्राचीही गरज नाहीं; ह्यामुळें तितीक्षासाधनसंपन्न आहे; असें समजले. तेथून निघून ओढियां प्रांतांतून येत असतां त्या देशां-

तील लोक गरीब असून पैशाची इच्छा करणारे असल्यामुळें, घराच्यापुढें सुद्धां कोणास उभें राहूं देत नसत. कारण गरीबींत मनाची चंचलता फार होत असल्यामुळें, बुद्धीचें भ्रमण होत असतें. म्हणून अवधूत कोणत्याही घरापुढें उभेसुद्धां रहात नव्हते. तरी ह्यास रस्त्यानें जातांना पाहून ते आपल्या दोषामुळें म्हणूं लागले कीं, हा चोरासारखा दिसतो, ह्याला गांवाबाहेर घालवा. गांवांत लोक उभेसुद्धां राहूं देईनात. तेव्हां ज्याप्रमाणें एका गरोदर असलेल्या हरिणीला एका दिशेस जाळें, एका दिशेस व्याध बाण लावून तयार, एका दिशेला वणवा, एका दिशेस व्याधाचीं कुत्रीं असून तिचा प्रसूतिकाल आलेला, ह्या गोष्टींमुळें व्याकुल होऊन ती परमात्म्याचें स्मरण करूं लागली; तेव्हां त्याच्या मायेनें गडगडाट सुरू झाला, विजा चमकूं लागल्या, वारा सुटला, पाऊस पडूं लागला, तेव्हां वाऱ्यानें जाळें तुटलें; विजेच्या गडगडाटानें पारध्याचा नेम चुकला व तो बाण त्याच्या कुत्र्यास लागला, पावसानें वणवा विझाला, तेव्हां ध्यान करणाऱ्या हरिणीला शांति मिळून ती सुखानें प्रसूत झाली व तिचें दुःख निवारण झालें. त्याप्रमाणें अवधूताचेंही दुःख नाहींसें झालें. त्या गांवांत व आसपासच्या इतर गांवांत कोठेंही गेलें तरी अन्नपाणी मिळालें नाहीं व लोकांचा उपद्रव फारच होऊं लागला आणि जागा सुद्धां मिळेना, तेव्हां जंगलांत पडून राहून रस्त्यानें जाणारा बावा बैरागी भेटल्यास त्यानें कांहीं खावयास दिल्यास तेवढ्यावर निर्वाह करून शिवध्यानतत्पर राहून शीतोष्ण सहन करीत जात असतां अवधूत म्हणाले कीं, ही थंडी बदरीनाथाजवळच्या लक्ष्मण झोल्याच्या थंडीसारखी आहे. तथापि चित्ताची शांति क्षणमात्र ढळूं न देतां स्वस्वरूपीं चित्त सलग्न करून ते राहिले. ह्यामुळें सर्व दुःख नाहींसें होऊन आनंदांत निर्विकल्प

समाधि लावून थोड्या वेळानें पुढें जाऊं लागले. तों एक बैरागी म्हणाला पुढें छत्तीसगड लागेल. तेथें मनुष्याला माकडांचा फार उपद्रव होतो. या करितां एकटा जाऊं नको. तेव्हां अवधूत म्हणाले नष्ट होणारें शरीर किती दिवस जपून ठेवावयाचें. देह नाहींसा झाला तरी देही नाहींसा होत नाहीं. म्हणून नष्ट रूप शरीरावर ममता न ठेवितां नित्यरूप आत्म्यावर मन ठेविलें म्हणजे सर्व दुःख परिहार होतें म्हणून हृदयदर्पणापुढें भयभावनेनें नष्ट होणारें शरीर ठेविलें, तर भयाचेंच प्रतिबिंब पडेल. व नित्य असणाऱ्या आत्मरूप दर्पणापुढें अभय भावनेनें उभें राहिल्यास अभयाचेंच प्रतिबिंब उमटेल. म्हणून ज्ञानी मनुष्याचे मनोदर्पणापुढें सत्यानंद स्वरूप आत्मा दिसत असल्यामुळें माकडांची भीति नाहीं; इतकेंच नाहीं तर यमाचें सुद्धां भय नाहीं. असें म्हणून त्याच वाटेनें पुढें गेले. तेव्हां खरोखरच पुष्कळ माकडें खेळत खेळत इकडून एक दहावीस, तिकडून एक दहावीस याप्रमाणें धांवत धांवत, यांच्या जवळ कांहीं खावयाचा पदार्थ आहे काय म्हणून पाहूं लागली; तों हा नग्न व ह्याच्याजवळ कांहीं नाहीं असें पाहून निघून गेलीं. नंतर दैवयोगानें सिंहचलाला ते गेले तेथें श्रीनरसिंहाच्या देवालयांत गंधसमर्पण विधि पाहून म्हणाले कीं, देव सद्भासना असलेल्या मनुष्यास प्रत्यक्ष होतो व असद्भावना असलेल्यास अगोचर असतो हें विधिचिह्न आहे. असें दिसतें. नंतर ते देवालयाबाहेर येऊन गोमुख तीर्थाजवळ बसले.

इतक्यांत एक मारवाडी त्या गांवांत १२ वर्षांपासून महारोगामुळें झालेलें दुःख भोगीत होता. रोगाचा प्रतीकार कोणत्याही उपायानें होईना, याकरितां डोंगरावरून खालीं उडी टाकून देह त्याग करावा म्हणून जात असतां पुष्कळ लोक ती गम्मत

महाण्याकरितां जात होते. तेव्हां ही गडबड कशाची आहे असें अवधूतांनीं विचारिलें, तेव्हां लोकांनीं मारवाडी जीव देण्याकरितां जात आहे, असें सांगितलें. त्याला इकडे घेऊन या असें स्वामी म्हणाले. लोकांनीं धावत जाऊन त्याला आणून स्वामीपुढें उभें केलें. कामधेनू सारखें गोमुखतीर्थ असतांना तुझा रोग कसा राहील. असें सांगून तीर्थाजवळ बसवून ॐ नरसिंह मंत्राचा मोठ्यानें उच्चार करून व त्या मारवाड्याकडून करवून एक ओंजळभर पाणी आपल्या हातांत घेऊन अवधूतांनीं त्याच्या डोक्यावर घातलें. तत्काल त्याचें मन शांत होऊन सर्व अंगावरील दुःख निवारण होऊन सर्व अवयवांची जाड्यता जाऊन लघुत्व आलें. तेव्हां मारवाडी म्हणाला, हा साक्षात नरसिंह देवच वैद्यरूपानें मला मिळाला, मी सुखी झालों, यापुढें देहत्याग करीत नाहीं. असें म्हणून स्वामीच्या पायांवर पडला व पुष्कळ प्रकारांनीं स्तुति करूं लागला. आणि मोठ्या समारंभानें अवधताला घराकडे घेऊन गेला.

---

## प्रकरण २२ वें.

घरीं गेल्यावर तो मारवाडी म्हणाला, हें शरीर, घर, व द्रव्य वगैरे सर्व तुमचें आहे. वाटेल तें करा. असें म्हणून सर्व शिवार्पण करून त्यानें त्यावर उदक सोडलें. यापुढें प्रपंचाचे त्रासांत पडून तुमचें ध्यान सोडलें, तर गेलेलें दुःख पुनः भोगण्याची पाळी येईल, असें म्हणून शांत होऊन बसला. तेव्हां आरूढ म्हणाले, हें घर तुला राहूं दे. तुझ्या द्रव्याचे दोन भाग करून, एक भाग धर्मादाय कर आणि दुसरा तुझ्या मुलाला राहूं दे. तथास्तु असें म्हणून त्यानें त्यांचें म्हणणें कबूल केलें. मग स्वामी विजया-

नगरच्या किल्याकडे येऊन प्रतापसिंहाचें सिंहासन पाहून समुद्र-गामी नांवाच्या तोफेजवळ बसले. तेथें छत्तीसगडास गेलेले साधू राजाजवळून पक्का शिधा घेऊन समुद्रगामी तोफेजवळच आले. सर्वांनीं स्वयंपाक केला. व ह्या फक्कडालाही बोलवावें, असा विचार करून " आव फक्कड, भोजनकू आव " अशी हाक मारिली. तेव्हां अवधूत उठून त्यांच्या पंक्तीस जेवावयास बसले. तेव्हां जेवतांना अवधूतांनीं बावांला विचारिलें कीं, प्राणमार्गानें आंत गेलेलें अन्न हृदय व कंठ ह्यामध्यें असतांना त्याचें काय होतें? धातु होतात. पुढें काय होतें? तेव्हां त्यांतील एक जण म्हणाला मला एवढेंच माहीत आहे. तेव्हां अवधूत म्हणाले, "अन्नमयंहि सोम्य मन" या श्रुतीप्रमाणें पोटांत गेलेल्या अन्नाचें, पुरिष्ट, स्थविष्ट, अणिष्ट, असे तीन भाग होऊन पहिला भाग पुरिष्ट होऊन खालच्या मार्गानें जातो.व दुसऱ्या भागापासून धातु बनतात; आणि तिसऱ्या भागानें मनोरूप शांति मिळते. ही शांति आत्मध्यानाभिमुख झाली म्हणजे तो आनंद-ब्रह्मच होतो. या रीतीनें ध्यान करणारा महात्मा तो स्वतः धन्य होतो; इतकेंच नाहीं, तर तें अन्न देणाऱ्या यजमानालाही सद्गति देतो. हें न समजणारे तुम्ही भ्रष्ट होतां; इतकेंच नाहीं, तर अन्न दिलेल्या यजमानालासुद्धां अधोगतीला नेतां. तें ऐकून ते साधू अवधूताबरोबर फार प्रीतीनें विचार करीत त्या दिवशीं तेथेंच राहिले.

नंतर अवधूत तेथून निघून भद्राचल पर्वताला जाऊन रामदा-सांनीं जीर्णोद्धार केलेलें देवालय पाहून, हा सर्व महिमा परमा-त्म्याच्या विभूतीचा आहे असें म्हणून, गोदावरीच्या तीरीं अस-लेल्या रामदासांच्या कट्ट्यावर बसले. तेथें पांच पुरोहित येऊन विचारूं लागले कीं तुम्ही कोणच्या देशचे? तुमची स्थिति गति काय? अवधूत म्हणाले, माझा अपरिच्छिन्न देश, अधिष्ठान स्थिति, गति-निर्गति. ती कशी? असें त्यांनीं विचारिलें. तेव्हां अवधूत

म्हणाले, देश, काल, वस्तु, यांपासून परिच्छिन्न असलेल्या आत्म्याला कोणता देश, म्हणावा ? सर्व जगताच्या स्थितीला अधिष्टान असलेल्या सुखस्वरूपाला कोणती स्थिति सांगावी ? सर्व गमना गमनाला अवकाश देऊन कर्मरहित असलेल्यास गमन कोठलें ? तुम्हीच सांगा. हें ऐकून पुरोहित निरुत्तर झाले व त्यांना तूष्णीभाव आला. अवधूत म्हणाले, तुम्ही शुद्धचित्त आहां, म्हणून तुम्ही हा सिद्धांत लवकर ग्रहण केला. तें ऐकून खरें आहे आचार्यवर्य असें म्हणून ते चालते झाले. तेथून सिद्धारूढ कर्नाटक देशाकडे निघाले; आणि कांहीं तीर्थें वगैरे पहात बिझवाड्याजवळ कृष्णातीरीं गेले.

तेथें एक स्त्री भक्तीनें नमस्कार करून विचारूं लागली कीं, तुमचें लक्षण ब्रह्मनिष्ठासारखें दिसतें. तेव्हां तुम्ही महात्मे आहां. मी धन्य होईन, असा कांहीं मार्ग सांगा. स्वामी म्हणाले, तूं स्त्री अशुद्धचित्त आहेस म्हणून ब्रह्मोपदेशाला पात्र नाहींस. तरी सोमवारपयोव्रत केलेंस तर धन्य होशील. हें पयोव्रत कोणीं केलें व तो कसा धन्य झाला ? स्वामी म्हणाले, कलियुगाच्या आरंभीं धर्मराज नांवाचा राजा द्रौपदी नांवाच्या आपल्या पत्नीसहित हें व्रत करून धन्य झाला. ही कथा महाभारतांत प्रसिद्ध आहे. असें असेल, तर हे महाराजा, द्रौपदी पांचजणांची बायको असून एकट्या धर्मराजाची पत्नी असें कसें म्हणतां ? तेव्हां समर्थ म्हणाले, द्रौपदीच्या ठिकाणीं पंचशक्त्यंश असल्यामुळें पांडव हे पांच देवच होते, त्यांपैकीं इंद्रांश असलेल्या अर्जुनाला शची देवी अंशानें पत्नी झाली होती. यमांश असलेल्या धर्माला श्यामला देवी अंशानें पत्नी झाली होती. ह्याप्रमाणेंच त्या त्या देवाच्या अंशाला त्यांच्या त्यांच्या पत्नी अंशानें पत्नी झाली होती. हें ऐकून संतोष पावून स्वामीला पांच प्रदक्षिणा करून नमस्कार घालून

उठून उभी राहून भक्तीनें दोन्ही हात जोडून किंकरवृत्तीनें; कार्पण्य दाखवून, अतिशय स्तुति करून, अंजलीबद्ध होऊन ती विनंति करूं लागली कीं, तुझें भाषण ऐकून मी धन्य झालें. परंतु तूं सांगितलेलें व्रत केल्यानें माझें मन स्थिर होईल असा मला आशीर्वाद दे. तेव्हां धन्य हो, असा आशीर्वाद देऊन अवधूत तेथून चालते झाले.

तेथें स्वामी ओढ्याच्या कांठीं तीन वर्षेंपर्यंत मेंढ्यांचे कळप राखीत राहिले होते. कधीं थोडें दूध मिळालें तर मिळालें; नाहीं तर नाहीं. कधीं कधीं तर चिखल सुद्धां खाऊन कालहरण करीत व शीतोष्णाचें दुःख सहन करीत राहिले होते. तेथून निघून मंगळगिरी येथें येऊन स्वामीचें गूळ घातलेलें दूध घेऊन त्यांचा मुकुट घालून देवा जयजयकार असो असें अवधूत म्हणाले. पुजारी म्हणाला देवाला आशीर्वाद देतोस काय? तेव्हां अवधूत म्हणाले सगुण ब्रह्माचा सावयव अंश देव आहे, म्हणून आत्मज्ञानीं सगुण ब्रह्माचें प्रतिमेला मूळ असलेलें निर्गुण ब्रह्मच आपण असल्यामुळें आपला आशीर्वाद देवाच्या जीर्णोद्धाराला कारण होईल, बरें पुजारी बोवा. ज्ञानी पुरुषाचे चरणरजाचे आपण भागीदार व्हावें अशी इच्छा करणारे देव ज्ञान्याचे आशीर्वादाचीही इच्छा करितात. तें बोलणें पुजाऱ्यानें मान्य केलें; व त्यास संतोष झाला.

---

## प्रकरण २३ वें.

स्वामी मलयगिरी पर्वतावरून खालीं उतरत असतां एका गुहेंत सोमेश्वर नांवाचा ब्राम्हण त्यांना भेटला. तो कुक्कुटनाथकल्प, पर्वत-कल्प, वगैरे कल्पांतील मूलिकारसवाद, आकर्षण, स्तंभन, वगैरे

गुटिकासिद्धि, पादुकासिद्धि, वश्याकर्षण, इत्यादि क्षुद्रसिद्धिदायक व्याभिचारकर्मं ह्या लोकीं खऱ्या सुखासारखी पण परलोकीं महद्दुःखदाय अशीं क्षुद्रशास्त्रें, जाणणारा होता. त्याला पाहून अवधूत म्हणाले, हें काय करितोस ? तूं ब्राम्हण असून अशीं क्षुद्रशास्त्रें पहातोस? आपला धर्म सोडून परधर्माची इच्छा करितोस? यामुळें आपल्या धर्मापासून भ्रष्ट होशील. कल्पवृक्ष तोडून शिंदीचें झाड लाविलें तर तुझा मार्ग बंद होईल; लोकांचीं दूषणें मात्र तुला मिळतील; या क्षुद्रांच्या अध्ययनानें पूर्ण पुण्याई असलेल्या मनुष्यास सिद्धि साध्य होतात असें सांगितलें आहे. याकरितां पुण्य करण्यांत तत्पर असावें. ग्रंथाच्या भ्रांतींत पडूं नये. शिवाय तुझ्या स्वधर्मांत हरिनाम उच्चारण्यानें सर्व फलें प्राप्त होतात. असें आहे मग, हा खटाटोप करणें बरोबर नाहीं. त्याप्रमाणें श्रौत स्मार्त कर्मांच्या फळानें परलोकीं गेलें तरी पुण्यंक्षीण झाल्यावर मृत्युलोकीं यावयाचेच. असलीं वेदोक्त कर्में जर जीवांना जननमरणादि दुःखदायक होतात,तर तूं करतोस हीं क्षुद्र कर्में किती दुःखदायक होतील? याचा विचार कर. तेव्हां ब्राह्मण म्हणाला. या शास्त्राचें धर्म सांगणारानें अशा प्रकारचें दुःख प्राप्त होईल असें आम्हाला सांगितलें नाहीं. म्हणून आम्ही हें शास्त्र शिकण्यास प्रवृत्त झालों. अवधूत म्हणाले, तूं मार्ग न विचारतां, आडमार्ग धरणाऱ्या गुरुची परीक्षा न करतां त्यास शरण गेलास ही तुझीच चूक, त्याची नव्हे. आतां ह्या दोषांचा परिहार होण्याला उपाय कोणता ? असें त्यानें विचारिलें तेव्हां एका अक्षराला हजार याप्रमाणें चोवीस हजार गायत्री मंत्र जप केल्यास सर्वदोषपरिहार होऊन धर्मवृद्धि होऊन अंतःकरणशुद्धि होईल. असें सांगितल्यावर त्या ब्राह्मणानें तीं पुस्तकें टाकून दिलीं व स्वामीस नमस्कार करून उभा राहतांच स्वामींनीं धन्य आहेस, असा त्यास आशीर्वाद दिला.

तेथून निघून पुष्कळ गांवें, शहरें, खेडीं नद्या वगैरे ओलांडून त्या त्या गांवीं मुलांबरोबर खेळत, प्राप्त झालेलीं दुःखें सहन करीत मध्यानीला येऊन डोंगरावर बाळेकोळ ( केळीकुंडा ) जवळ महासाधूंचा समुदाय होता, तेथें जाऊन तीन महिने ब्रह्मजीज्ञासा करून तेथें असलेल्या सर्व मुमुक्षूंस सर्व संशया-पासून निवृत्त करून, ज्ञान दृढीकरण करीत असतां एक शिष्य म्हणाला, प्रत्यक्ष देह हाच मी अशी भावना असून देह आत्मा नव्हे तर दुसरा आत्मा आम्हाला कसा समजावा, तेव्हां स्वामी म्हणाले, ऐक बाबा, " पंचात्मकं, पंचसुर्वमानं, षडाश्रयं, षड्गुणयोगयुक्तं, ॥ तं सप्तधातुं, त्रिमलं, त्रियोनिं, चतुर्विधाहार-मयं शरीरं ॥ " या प्रमाणावरून याचीं सर्व तत्त्वें निराळीं काढून पहा. चैतन्यात्मक ब्रह्म असें दिसेल, तें कसें म्हणशील, तर शरी-राचा व्यवहार, पृथ्वी, आप, तेज, वायु, आणि आकार हीं पंचतत्त्वें चालविताहेत. व हीं परमात्म्यानें एकेक भूताचे दोन दोन विभाग करून त्यांत एकेक भाग आश्रय म्हणून ठेवून उरलेले अर्ध भागाचे चार चार विभाग करून आश्रय भागांत आपापलें सोडून दुसरे महाभागांत मिळविले तर २५ तत्त्वें होतात. हीं २५ तत्त्वें एके ठिकाणीं मिळून स्थूल देह केल्या नंतर चलनरहित झाला. तेव्हां परमात्मा म्हणाला हा जड आहे. माझ्या शिवाय याचें कसें चालेल. असें म्हणून कपालत्रय विदारून जीवरूपानें प्रवेश करून शरीराच्या अभिमानानें स्थूल भोग भोगून संस्कारयुक्त होऊन, स्वप्नांत सूक्ष्म भोग अनुभवून स्थूल सूक्ष्म लय होतांना सुषुप्तींत आनंदमय होऊन, तीन अवस्था जाणणाऱ्या मला स्थूल देहाचा संबंध कोठून आला ? शिष्य म्हणाला, या स्थूलाचा संबंध केव्हां येतो ? ऐक तर हे

शिष्या " यत् कठिनं तत् पृथ्वी " या शरीरांत जो द्रवांश असतो तें आप्, उष्णता तेजांश, चलन वाय्वंश, पोकळी तो आकाशांश याप्रमाणें देह पंचभूतांशीं संबंधी झाला आहे. स्वरूपतः अभावरूप देह मी आहें असें म्हणणें, अन्यायाचें आहे कीं न्यायाचें आहे? तेव्हां शिष्य म्हणाला तुमच्या प्रसादानें पंचवीस तत्त्वें निराळीं करून निराळें राहणारें चैतन्य मी असें समजून मी कृतार्थ झालों. असें म्हणून आनंदाश्रू ढाळीत, पुनः पुनः नमस्कार करून स्वामींचा आशीर्वाद घेऊन तो गेला.

तेथेंच एक कुष्ठरोगी होता, त्यानें दीनवाणीनें मागून घेतलें कीं, गुरुमहाराज या शिष्याचा मनोरोग नाहींसा केलात त्याप्रमाणें माझें कुष्ठ नाहींसें करा असें म्हणून त्यानें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां त्याला पंचाक्षरी मंत्र जपलास तर ब्रह्मस्वरूप होशील मग असला क्षुल्लक रोग त्या जपानें जाईल यांत आश्चर्य नाहीं. असें सांगून त्याला पंचाक्षरी मंत्राचा उपदेश करून पादोदकानें स्नान घालतांच कुष्ठरोग नाहींसा झाला. याप्रमाणें तेथें फार लोकांची दाटी होऊं लागतांच हें स्थळ सोडावें असें मनांत आणून तूष्णीभाव निर्विकल्प समाधि असतां कांहीं भाव न दाखवितां प्रारब्ध कर्म नांवाच्या वायूनें हा देह वाळलेल्या पिंपळाच्या पानासारखा उचलून, मधलीं गांवें, शहरें, खेडीं वगैरे फिरवून विजापुरास उचलून आणला.

## प्रकरण २४ वें.

विजापुरांत कांहीं दिवस असतांना एकदां तेथें वांगीवाल्याचे घराजवळ उभे राहिले असतां आंतून एक मूर्ख मनुष्य येऊन हा

आमचें वरकाम करण्यासारखा आहे. असें समजून, घरांत बोला-वून नेऊन थोडी भाकरी खा असें त्याला सांगून, भाकरी खाव-यास दिली व तें झाल्यानंतर हा शेणाचा ढीग पाटींतून नेऊन उकिरड्यांत घाल, असें म्हणाला. समभावी अवधूतानें त्याप्रमाणें करण्यास आरंभ केला. तेव्हां हा आतां काम करील असें वाटून तो दुसरीकडे कोठें गेला तों ही स्वारी निघून गेली. आणखी एकाच्या घरापुढें भिक्षेसाठीं उभा असतांना त्या गृहस्थानें अर्धी भाकर देऊन चिखल कालवून घेऊन भिंतीजवळ नेऊन टाकण्याचें काम सांगितलें. तो दुसरीकडे जातांच हाही निघून गेला. व विहिरीवर जाऊन निजला.

अशा रीतीनें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं रात्रीं एकानें त्या विहिरीवर येऊन या अवधूताला पाहून हा आमच्या नाचाच्या दिवशीं मशाल धरण्यास बरा आहे, असें समजून याला विचारलें कीं, बाबा जेवलास किंवा नाहीं? यानें मान हालवून नाहीं असें सुचविलें. तेव्हां त्यानें आपल्या घरीं त्यास जेवावयास नेलें, व कांहीं थोडें खावयास घालून, आपल्याबरोबर जुम्मा मशिदींत उरुसांत बोलावून घेऊन जाऊन, हिलाल त्याच्या हातांत दिला. व तेथेंच बसावयास सांगितलें. तेव्हां स्वामी आपणांशींच म्हण-तात कीं, मी श्रेष्ठ! कारण माझ्या प्रकाशानें माझ्यापुढें नाच होत आहे. तेव्हां मीच श्रीमान्! नंतर ती मशाल धरून बसून तीवर वरचेवर तेल घालीत असत. इतक्यांत त्या इसमाचा डोळा चुकतांच ही स्वारी मशाल टाकून चालती झाली. पुनः जेव्हां लोक मशाल धर म्हणूं लागले, तेव्हां त्यानें हात खालीं करून एक बोट वर वांकडे धरून आपला हात लोकांस दाखविला. तेव्हां लोक म्हणूं लागले हा खुळा आहे. याला कशाला आणला? तेव्हां एकजण उठला व ह्याच्या डोक्यावर दोन तीन ठोसे

लगावून गचांडी देऊन मशाल हातांत घेऊन येथेंच बैस असें म्हणून मशाल त्याच्या हातांत दिली. तेव्हां स्वामी म्हणाले, सर्वांना तोंडानें बोलाविलें. पण माझ्या डोक्यावरची धूळ झाडून मानेवरचा मळ पुसून हात धरून मोठ्या मानानें आणून प्रकाश ( मशाल ) हातांत देऊन बसविलें. तेव्हां मी महा भाग्यवान्! असें मनांत समजून तेथें बसले. रात्रीचे सात तास झाल्यावर नाच संपला. लोक घरोघर गेले, व स्वामींनीं तेथेंच जमिनीवर समाधि लाविली.

नंतर कांहीं दिवसांनीं, त्या गल्लींतील लोक त्रास देऊं लागले व भिक्षाही चांगली मिळेना म्हणून, लोकांचा सहवास सोडून किल्ल्यांतील एका पडक्या भागांत असलेल्या मशीदींत जाऊन राहिले. तेथें सीताफलांचीं झाडें पुष्कळ होतीं. त्यांचीं फळें खाऊन निर्वाह करूं लागले. याप्रमाणें अन्नाची आशा सोडिली, व वस्त्र सुद्धां नकोसें झालें. याप्रमाणें बाह्य वैराग्य पूर्ण बाणल्यामुळें आतां एकाग्रता मिळून मनोराज्य नाहींसें होऊन ( स्वराज्य ) आत्मसिद्धि मिळवून पूर्णानंद संपत्ति अनुभवीत हृदयप्रदेशावर एकछत्री राज्य चालवीत, अजातशत्रु भावना धरून फिरत राहिले. ह्याला पाहून त्रिगुणात्मक लोकांपैकीं कांहींजण हा महार असेल असें म्हणूं लागले. कांहीं सत्त्वगुणी स्त्रिया होत्या त्या म्हणूं लागल्या कीं, गरीब बिचारा अन्न नसतां, उपाशीं, लोकांचा सहवास सोडून रानावनांत भटकत आहे. तेव्हां याचें नशीब किती खडतर आहे ! !

स्त्रियांच्या बोलण्यापैकीं प्रारब्ध हा शब्द ऐकून स्वामींनां एकाएकीं आठवण झाली कीं, पूर्वीं श्री शैलमल्लिकार्जुनाच्या पूर्व भागीं असलेल्या बद्वेली नांवाच्या गांवीं एका देवालयांत

आपण बसलों असतां एक मूर्ख तळवार येऊन त्यानें तूं कोण म्हणून विचारिलें, तेव्हां अवधूतांचा स्वभाव वेदांतांत बोलण्याचा असल्यामुळें लौकिकांत बोलण्याची प्रवृत्ति नव्हती. याकरितां ते कांहीं न बोलतां स्वस्थ बसले. दोन तीन वेळां विचारलें तरी अवधूतांनीं उत्तर दिलें नाहीं. तेव्हां त्या मूर्खानें एक लाथ मारून हात धरून ओढीत नेऊन कचेरींत कोतवालाला सांगितलें. तेव्हां त्यानें अंधारकोठडींत ठेवून आपण तीन दिवसपर्यंत एका गांवाला निघून गेला. तेथून आल्यावर त्या तळवारानें आठवण केली तेव्हां त्याला बाहेर आणिलें, व त्यास तुझें गांव कोणतें ? कोठून आलास ? तूं कोण वगैरे प्रश्न विचारिलें. तरी हा बोलेना. तेव्हां याचें आंग फार खवखवतें आहे. याला "मर्दनं गुण वर्धनं" ह्या म्हणीप्रमाणें चांगला बडवा म्हणजे हा वठणीला येईल असें सांगितलें. मग काय विचारतां ! दोन तळवारांनीं दहावारा तडाके दिले. प्रत्येक तडाक्यास "शिवार्पणमस्तु." असें हा म्हणत असे. तेथें बसलेला एक वृद्ध ब्राह्मण कोतवालाला म्हणाला कीं, ही वृत्ति निराळी आहे. हा महापुरुष आहे. याला मी आपल्या घरीं नेऊन स्नान वगैरे घालून जेवावयास घालितों. याला माझ्या बरोबर पाठवा. मग कोतवालानें त्याला घेऊन जा असें सांगितल्यावर घरीं नेऊन अभ्यंगस्नान, भोजन वगैरे करवून १९ दिवस आपल्या घरीं ठेऊन घेऊन त्याचा योग्य सत्कार करीत असतां त्या तळवाराला व फौजदाराला लोक शिव्या देऊं लागले होते. ह्या गोष्टीचें स्मरण झाल्यावर ही स्त्री अरण्यांत फिरणें हें वाईट प्रारब्ध म्हणाली तें ह्या स्थितीपेक्षां किती तरी चांगलें असें म्हणून निर्विकल्प समाधि लावून ते बसले

## प्रकरण २९ वें.

नंतर मोहरमचा सण आला—तेव्हां कांहीं पुंड एका लांकडावर अवधूतास बसवून, इकडून तिकडे तिकडून इकडे नाचवीत प्रत्येक दुकानापुढें पैसा मागत पैसा मिळाल्यावर खालीं उतरवून फराळ करवून पाणी पाजवून पुनः पहिल्याप्रमाणें फिरवीत. याप्रमाणें सबंध दिवस आणि रात्र घालविली. काठीवर बसल्यामुळें मांड्या पोटऱ्या, वगैरे दुखूं लागल्या, फिरविण्यास सुद्धां येईनात. तेव्हां त्याच मशिदींत पडून राहून म्हणतात देवानें हा एक उपकारच केला. कारण फिरण्यानें मनाला विक्षेप झाला होता, तो एका जागीं बसल्यामुळें जाऊन निर्विकल्प समाधीस उत्तम झालें. या प्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर तेथेंही मुलें येऊं लागलीं. तेव्हां त्यांच्या बरोबर चेंडु, इटीदांडू, भोंवरा फिरविणें, पतंग करून उडविणें, व दुसऱ्यास तयार करून देणें, यांत कालक्रमण करीत असतां ही गोष्ट पुष्कळ मुलांस समजल्यामुळें तीं तेथें जमूं लागलीं.

ही हकीकत समजल्यावर तुळजापा नांवाचा एक भाविक गृहस्थ येऊन स्वामींचें दर्शन घेऊन म्हणाला कीं या माहात्म्याचें, दर्शन, नमन, स्पर्श, सेवा, सत्कार करणाऱ्याचे जन्म सफळ होतील असें मनांत आणून मुलांनां म्हणाला कीं याला खेळत खेळत आमच्या गल्लीकडे आणल्यास तुम्हाला फुटाणे व गूळ देईन, तव्हां दहावीस मुलांनीं चेंडूचा खेळ सुरू करून अवधूताला बोलावून त्याला मध्यें घालून त्या गल्लीकडे पळत, चेंडू फेकीत, तुळजापाच्या घराजवळ नेलें. तेव्हां त्यानें बाहेर येऊन या राजयोग्याला हात धरून घरांत आणून एका खोलींत बसवून

दरवाजा लावला व कबूल केल्याप्रमाणें मुलांना फुटाणे वगैरे दिले. नंतर गल्लींतील कांहीं भक्तांना बोलावून स्वामींना बाहेर आणून क्षौर करवून अभ्यंग स्नान घालून उत्तम पक्कान्नांचें जेवण घालून निजविलें. नंतर दररोज रात्रीं सर्व भक्त जमून सर्वजण अधिकाराप्रमाणें प्रश्नोत्तरें करीत, भजन पूजन वगैरे चाले. अशा रीतीनें कांहीं दिवस गेले. पुढें पुष्कळ लोक दर्शनास येऊं लागले.

नंतर अवधूत तुळजापाला म्हणूं लागले कीं आपल्या मनास येईल, त्याप्रमाणें आकाशांत उडणाऱ्या पक्षांस पिंजऱ्यांत घातल्या प्रमाणें मला ह्या घरांत बंदीखान्यांत घातलें आहे, तेव्हां माझें मन एथें रमत नाहीं म्हणून मला त्या मशीदींत पोंचीव. असें म्हणतांच त्यांना तेथें नेऊन पोंचविलें. नंतर ब्राह्मण, वकील, मामलेदार, फौजदार वगैरे गृहस्थ ह्या माहात्म्याची हकीकत ऐकून रात्रीं त्याच्या दर्शनास जाऊं लागले. तें ऐकून प्रथम ज्यांनीं पीडा दिलीं होतीं, तेही तेथें येऊं लागले व त्यांना पश्चात्ताप झाला व भक्तिपूर्वक वागूं लागले. घरांत बायका मुलांस रोग वगैरे झाल्यास अवधूतास बोलावून नेऊन डोक्यावर हात ठेवून घेऊं लागले. याप्रमाणें कांहीं दिवस तेथें काळक्रमणा केली.

पुढें कांहीं दिवसांनीं अठरा पगड जातीचे लोक जमून आपआपली जात श्रेष्ठ व आपआपला वर्णाश्रम धर्म श्रेष्ठ म्हणून स्वामीपुढें वादविवाद करूं लागले; तेव्हां स्वामी म्हणाले; सर्वांचा देव एकच दोन नाहींत, ह्या देवांचे गांवास जावयाचें असल्यास अनेक मार्गांनीं जातां येतें. पुष्कळ रस्ते एकाच गांवास जातात, त्याप्रमाणें देवाचें करुणासाध्य सर्व जातीला एकच आहे. तथास्तु. असें म्हणून सर्व लोक स्वामीस नमस्कार करून आपआपल्या घरीं गेले.

याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यावर पुनः संचारार्थ अन्य देशीं जावयास निघाले, तेव्हां गांवांतील भक्त लोकांनीं तुम्ही जाऊं नका, आम्हासारख्या पापी लोकांना नित्य दर्शन देऊन आमचा उद्धार करावा, असें म्हणतांच स्वामी म्हणाले, ह्याप्रांताला पुढें दुष्काळ पडावयाचा आहे व तुम्हांला अन्नाचें तापत्रय येईल. तें मला पहावणार नाहीं. तेव्हां एक सावकार म्हणाला माझ्या घरांत माझ्या कुटुंबाला २० वर्षे पुरेल इतकें धान्य आहे, त्यांपैकीं तुम्हाला देईन, तुम्हीं जाऊं नये. असें म्हणून त्यांना एक नवें कांबळें, नवें धोतर देऊन आणखी काय पाहिजे म्हणून त्यानें त्यास विचारलें. तेव्हां ईश्वराचा क्षोभ कोणाकडूनही निवारण होणार नाहीं; नळ, हरिश्चंद्र, रामचंद्र, धर्मराज वगैरे महापुरुष व मोठमोठे राजे यांनाही तो निवारण करितां आला नाहीं; आमच्यासारख्याकडून काय होणार ! ! आम्ही स्वच्छंदानें वाटेल तिकडे फिरणारे, आम्हाला तीनही लोक सारखेच. असें म्हणून ते निर्विकल्प समाधींत राहिले व जमलेले सर्व लोक आपापले घरीं गेले, तेव्हां सिद्धारूढ तो रवीकडे चालते झाले.

---

## प्रकरण २६ वें.

तेथून निघून वाटेंत भिक्षा मागत, गुराख्यांबरोबर खेळत ज्याप्रमाणें सात भूमिका साधणारे योगी पहिली भूमिका मिळाल्यावर पुढील भूमिकेस जातात त्याप्रमाणें मधलीं पुष्कळ गांवें पाहून पुढील गांवीं गेले. इतक्यांत हिंवाळा सुरू झाला. तेव्हां ज्याप्रमाणें ध्यानयोगाच्या बलानें पुष्कळ दिवसांचें पाप नाहींसें होतें, त्याप्रमाणें नद्या, तळीं, विहिरी वगैरे जलसंचयांतील पाणी आटून गेलें. पुढें प्रारब्ध कर्माप्रमाणें, कर्मजनित देहाला प्राप्त झालेलीं

सुखदुःखें अनुभवित आपण असंग राहून जीवन्मुक्त सुख मिळवून जमखिंडी जवळच्या सिद्धापुर गांवीं आले. तेथें एक हटयोगी असा एक जंगम आपल्याला सहस्र जंगमाची अर्चा करावयाची आहे. तेवढें द्रव्य दिल्यास मी माझी ही स्थिति सोडीन असें म्हणून हात जमिनीवर टेंकून पाय वर करून राहिला होता. त्याला उपाशीं ठेवून आपण कसें जेवावें असें म्हणून गांवांतले प्रमुख लोक गांवाबाहेर त्याच्या भोंवतीं जमले होते. त्याचा बहिर्दृष्टीचा अभिप्राय पाहून स्वामी भक्तांस म्हणाले कीं, त्याचें समाधान मी करितों. मग तुजकडून सहस्र जंगमाची अर्चा करवितों असें अवधूतांनीं त्यास नमस्कार करून सांगितलें. व त्या भक्तांनींही त्यास नमस्कार घातला. मग गजम ( उलटें उभें रहाणें ) सोडून तो जंगम स्वामीजवळ आला व बसला. तेव्हां स्वामी त्याला म्हणाले जंगम जगभर आहेत, तूं कोणत्या जंगमास जेवावयास घालणार? किंवा कांहीं मात्र जंगम आहेत! जंगम षडुर्मीरहित आहेत म्हणतोस किंवा सहित आहेत म्हणतोस? सहित म्हणशील तर ते पूजेला अयोग्य आहेत, व रहित म्हणशील तर नित्य तृप्त, शिवस्वरूप अशांना पूजा, नैवेद्य वगैरे काय करावयाचा आहे? असें विचारतांच त्याचें तोंड बंद झालें. तेव्हां तूं दांभिकपणा दाखवून मर्यादेचा भंग केलास असें अवधूत उद्वेगानें त्यास म्हणाले. हें ऐकून जंगमाचें मन चकित झालें. स्वामींनीं थोडें दूध व साखर आणवून त्या जंगमास पाजवून त्याला तृप्त करून पाठविलें व बाकीच्या लोकांसही गांवांत परत पाठवून स्वतः ब्रह्मभावना धरून वाटेनें लागलेलीं गांवें पहात पहात यादबाडास आले. अवधूत रूपानें गांवांत फिरत असतां एका बाईच्या दारांत भिक्षा मागण्याच्या निमित्तानें उभे राहिले. तिनें आंबाड्याची भाजी भाकरीला लावून ती भाकरी वाढली. तेव्हां अवधूत म्हणाले, सर्व भागाला भाजी लागली

नाहीं. तेव्हां हा कोणी खुळा असेल असें समजून तीच भाजी सर्व भाकरीस लावून दिली, तेव्हां भाकरी कोठून मोडावी; मोडावयास भाकरीच नाहीं असें स्वामी म्हणाले. तेव्हां ती बाई हांसतच घरांत गेली. स्वामीही हांसत हांसत ब्रह्मानंदीं लीन होऊन अल्लमया नांवाच्या प्रसिद्ध पुराणिकाच्या घरीं गेले.

अवधूताची उन्मत्त चर्या पाहून पुराणीक म्हणाले, हा पापी आहे. ह्याला आंत सोडूं नका. तेव्हां बळजबरीनें ते आंत घुसले. तेथें पुराणिक बोवा आपल्या श्रोत्यांस चनबसवेश्वर पुराणांपैकीं कांहीं भागाचा अर्थ सांगत होते. ईश्वराच्या पंचवीस लीलांपैकीं अंधकासुराची कथा चालली होती. त्यांत उपमा अलंकाराचा एक प्रसंग आला तो असा कीं–(स्मरनसोकातेनें यसदु दोंदु, मामरं शंकर निदि होळ्) यांत हत्ती व झाड यांचा उपमान उपमेय भाव आहे, आणि मधु व मित्र या नांवाच्या दोन पक्षांचें त्या झाडावर भाषण चाललें आहे. त्यांपैकीं मधूच्या भाषणांत विद्युल्लता हा शब्द आला आहे, हा विद्युल्लता शब्द झाडाला लागू आहे किंवा हत्तीला लागू आहे असें अवधूतांनीं विचारलें. तेव्हां ते निरुत्तर झाले. हा विद्युल्लता शब्द झाडाला लाविला तर स्थावर स्थिति रहाणार नाहीं व हत्तीला लाविला तर–इतक्यांत पुराणिक म्हणाले हा खुळा नव्हे ही व्यक्ति निराळी आहे. असें म्हणून क्षणभर शांत राहून, पुराणिकबोवा म्हणाले असें आहे तर हे महाभागा, ही विद्युल्लतेची उपमा कोठें दिली तर चांगली दिसेल? तेव्हां महात्मे म्हणाले पिपिलिकेपासून हत्तीपर्यंत सर्वचर प्राण्याचे शरीरांतील वृत्तिदर्पणांत प्रतिबिंबित असलेला जो चिदाभास त्याला विद्युल्लता उपमेय लागतें. कसें म्हणाल तर ऐका—जशी वीज मेघाग्नीपासून उत्पन्न होऊन भू लोकांतील वस्तु क्षणमात्र दाखवून

लागलीच तिचे आश्रयभूत जो मेघाग्नि त्यांत ऐक्य होतें. तसें कूटस्थाजवळ कल्पित असलेल्या बुद्धींत चिदाभास प्रतिबिंबित होऊन चवदा अधिदेवतांनीं भासणारे चौदा भौक्तिक अध्यात्म योगानें चिदाभास बहिर त्रिपुटी भासमान होतांच त्याच्या आश्रयाखालीं असलेल्या कूटस्थ संवित्तामध्यें ऐक्य होतो. म्हणून चिदाभासाला विद्युल्लता हें उपमान द्यावें हें योग्य आहे. दुसऱ्याला देणें अयोग्य आहे. असें सांगून अवधूतांनीं आपल्या हातीं असलेली भाकरी पुराणाच्या पोथीवर ठेविली. पुराणिकांनीं तो महाप्रसाद मानून ती डोक्यावर ठेवून घेतली व पूर्वीं तिरस्कारिलेल्या चुकीकरितां मी महापापी असें म्हणून प्रायश्चित्त घेऊन नंतर मी धन्य, मी धन्य झालों म्हणून पुराणिकबोवा हात जोडून ब्रह्मनिष्ठ अशा गुरूंच्या चरणारविंदीं नमस्कार करून म्हणाला कीं, मी काशीस जातों, परवानगी असावी. अवधूत म्हणाले, काशीला गेलेले परत येत नाहींत! तूं कां जातोस? मी जातों खरा; अवश्य जा, पुनः माघारीं येऊं नको! असा त्यांला आशीर्वाद दिला. पुढें काकतालीय न्यायानें अवधूतांनीं सांगितल्याप्रमाणें पुराणिक काशींतच मरण पावले.

नंतर अवधूत बाजार सोडून पुढें चालू लागले तों किल्याजवळ येईपर्यंत रात्र झाली व अंधार पडला. तिकडून जमादार शिपायाला घेऊन येत होते व चोराचा तपास चालला होता. इतक्यांत त्यांनीं अवधूताला पाहिलें व कोण म्हणून विचारिलें. हे कांहीं बोलेनात. तेव्हां हाच चोर असें समजून शिपायाकडून त्याला मारविलें. इतक्यांत दैववशात् दोन गृहस्थ तेथें येऊन सांगूं लागले कीं, हा भिक्षुक आहे याला मारूं नका, तेव्हां त्यांनीं त्याला सोडून दिलें, व गांवाबाहेर हाकून देण्यास सांगितलें. शिपायांनीं ही

तसेंच केलें. पुढें अवधूत अर्धामैल गेल्यावर मारुतीच्या एका ओसाड देवळांत जाऊन पडले. इतक्यांत अवधूताला जमादारानें मारिलें हें पुराणिकांसह सर्व भक्तांना समजलें. तेव्हां ते तपास करीत करीत तिकडे गेले. अवधूत आपल्याशींच विचार करीत होते कीं अशा प्रकारचें दुःख बल्लारीस झालें होतें पण त्या पेक्षां हें कमी आहे. ती गोष्ट अशी कीं, कौल बाजारांत चितुर हणमंत शट्टी यांच्या दारांत हे भिक्षेसाठीं उभे राहिले तेव्हां दरवाजा राखणारा शिपाई बडेसाब यानें तूं कोण असें त्यांना विचारिलें. सिद्धारूढ कांहीं बोलले नाहींत या करितां परवां एका सावकाराच्या घरीं दरवडा घातला व आज ह्या सावकाराचे घराची टेहळणी करितोस काय ? असें म्हणून पांचवे पायरीवर असलेल्या अवधूताला त्यानें लाथ मारून खालीं ढकलून दिलें. रक्त निघण्यासारखी जखम गुढघ्याला झाली व सर्वांग खरचटलें. त्या मानानें आजचें दुःख कांहींच नाहीं. इतक्यांत गांवचे बरेच लोक जमले व ते सर्वजण प्रार्थना करूं लागले कीं, गांवांत चला. अवधूतांनीं पुनः परत येण्याचें नाकारिलें तेव्हां लोकांनीं तेथेंच भोजनाचें ताट आणून त्यांना जेवावयास घातलें व शेष प्रसाद सर्वांनीं ग्रहण करून ती रात्र तेथेंच ब्रह्मभावनेंत आनंदांत घालवून सकाळीं सर्व गांवांत निघून गेले व अवधूत पुढें चालते झाले.

# प्रकरण २७ वें.

याप्रमाणें प्रारब्धवशात् प्राप्त झालेल्या सुखदुःखाचा अनुभव घेत असतां पूर्वकर्मवशात् रोगाचा प्रादुर्भाव झाला, तेव्हां त्यांनीं अन्नोदक वर्ज करून त्या रोगाचा परिहार केला. या रीतीनें तापाचा परिहार कसा होतो म्हणाल तर तापाचे नाडीचा व मनाचा संयोग योग साधनानें होऊं दिला नाहीं म्हणजे रोगापासून होणारें दुःख वाटत नाहीं. याप्रमाणें प्रवास करीत, दिवस घालवीत, गोपाळा बरोबर क्रीडा करीत, क्षुधाशांती करितां नशीबावर हवाला ठेवून, यदृच्छा लाभ संतुष्ट राहून, निरालंब भावनेनें, निरुपद्रव चित्तानें, निजानंदभरित होऊन, वाटेनें लागलेलीं गांवें पहात पहात ते गोकाकेस आले. तेथें गांवांत फिरल्यावर थोडीशी भिक्षा मिळाली, ती खाऊन नदीचें पाणी पिऊन कांठावर उभे असतां एक नावाडी म्हणाला; अरे वेड्या इकडे ये, तेव्हां स्वामी त्याजकडे न जातां तेथेंच त्याच्याकडे पाठ करून उभे राहिले. मग तो पुनः म्हणाला तुला नांवेंतून पलीकडे नेतों तरी स्वामी गेले नाहींत. न जाणो पूर्वीं एका माहात्म्याच्या पाद—स्पर्शानें शिळेची स्त्री झाली तशी आपल्या पादस्पर्शानें या नौकेची स्त्री झाल्यास गरीबाचा पोटाचा धंदा नाहींसा होईल ! अशा तऱ्हेची कांहीं तरी भावना करीत तसेच उभे राहिले. मग नावाड्यानें येऊन हात धरून नेऊन नावेचा दोर त्यांचे हातांत दिला व नाव इकडे ओढ असें सांगितलें. नंतर ७।८ माणसाला न हालणारी नाव् स्वामींनीं सहज ओढून त्यानें सोड म्हणतांच सोडिली.

मग तेथून निघून वाटेनें जात असतां आतां प्रारब्धभोग निवृत्ति झाली, डोक्यावरचें ओझें उतरलें असें म्हणून हुबळीस

येऊन मुकेपणानें गोपाळांसह क्रीडा करण्यांत दोन वर्षें घालविलीं. भूक लागल्यास मुकेपणानें दारापुढें रहावें, कोणी कांहीं दिल्यास तें तेथेंच खावें, मिळेल तेथें पाणी प्यावें व तोरवी वाल्याचे विहिरींतील गुहेंत निजावें. ती जागा अत्यंत गलिच्छ असल्यामुळें तेथें नाना प्रकारचे कृमि, कीटक, मुरकुटें, वगैरे चावून अत्यंत त्रास देत असत. तरी सिद्धारूढ निर्विकल्प समाधींत राहून दिवस क्रमीत असतां, कोणी मुलानें वैश्यां पैकीं मोदल टप्पा याजकडे स्वामींची ही स्थिति कळविली. तें ऐकून सावकाराला दया आली व हा महात्मा आहे किंवा नाहीं हें पहावें म्हणून त्याला घराकडे आणावयाचें ठरवून त्याचा हात धरून त्याला घराकडे नेऊन अभ्यंग स्नान घालून, सुंदर शुभ्र धोतर पांघरावयास देऊन मिष्टान्न भोजन घालून, एका खोलींत निजविलें. व तो आपल्या कामाला निघून गेला. तों हे तें नवीन वस्त्र तेथेंच टाकून आपलें जुनें धोतर घेऊन त्या विहिरीकडे चालते झाले. दोन तासांनीं सावकार परत आला व पहातो तों अवधूत घरांत नाहींत. तेव्हां निरिच्छ मनुष्यें विषय सुखाकडे दुर्लक्ष करून त्यांचें सेवन करीत नाहींत असें समजून तो स्वस्थ राहिला.

ही गोष्ट गांवांतील इतर लोकांस समजल्यावर गुरुलिंग या नांवाचे शास्त्री कांहीं भक्त लोकांस बरोबर घेऊन विहिरीवर गेले. व तेथेंच शास्त्रीय विषयाची चर्चा सुरू झाली. तेव्हां पुष्कळ लोक जमूं लागले. व निरनिराळे प्रश्न विचारूं लागले. त्या त्यांच्या सर्व शंकांचें निरसन झाल्यामुळें प्रशंसा होऊं लागली. पुढें उदासीन वगैरे त्रिगुणात्मक लोक तेथें जमूं लागले. एके दिवशीं बसवणीअप्पा या नांवाचा एक भक्त आला व स्वामीस नमस्कार घालून प्रार्थना करूं लागला कीं, माझ्या घरीं योगवा-

सिष्ठ चालू आहे. व त्यांतील कांहीं भाग आपल्या मुखानें श्रवण करावा अशी इच्छा आहे. तेव्हां आरूढांनीं विचार केला कीं, आपलें राहिलेलें आयुष्य दीनाच्या उद्धारासाठीं घालविणें बरें. असें समजून त्याच्याबरोबर जाऊन त्याच्या घरीं दररोज तासरात्रीपासून चार तास रात्रीपर्यंत वासिष्ठ व्याख्यान चालूं लागलें. नित्य व्याख्यान संपल्यावर बसवणी अप्पा स्वामींना भोजन घालून रात्रीं विहिरीकडे पोंचवीत. याप्रमाणें काळक्रमणा चालली असतां एके दिवशीं गुरुलिंग स्वामी येऊन स्वामीस म्हणाले कीं, तुम्ही आत्मा देहांतच राहतो, असें म्हणतां तर मला तो कां दिसत नाहीं. स्पर्शगोचर वस्तु दृष्टिगोचर होत नाहीं. तें कसें तें पहा. एका प्रमाणानें खरी ठरलेली गोष्ट दुसऱ्या प्रमाणानें जरी ठरतेच असा नियम नाहीं. अशी त्याचीं संमत्ति घेऊन त्याचा परिहार केला कीं, ऐका शास्त्रीबोवा, ह्याच वाशिष्टांत " जलदोकडगिह हुतांशुवु तन्न लघुरूपव बीरुवंददि " ह्या पदांत ऊन पाण्यांत असलेला अग्निस्पर्श प्रयोगानें गोचर होता पण तो नेत्र गोचर होत नाहीं. तसा देहांत असलेला आत्मा ज्ञानाला गोचर आहे, अज्ञानाला गोचर नाहीं. तें ज्ञान कोणतें म्हणाल तर आत्मानात्मविवेक पहिला धरून " अहं ब्रह्मास्मि " हें ज्ञान होईपर्यंत अनात्मबुद्धि त्याग होऊन ब्रह्माकारबुद्धि होण्याच्या संधींत जें निर्विकल्प ज्ञान असतें, तें. त्या ज्ञानाला आत्मा अगोचर कसा होईल म्हणाल तर आवरणनिवृत्ति झालेली नसते, म्हणून घटादि पदार्थाप्रमाणें तो गोचर होत नाहीं. म्हणून तुम्हांला शब्दज्ञान असून अनुभवज्ञान नसल्याकारणानें आत्मा दिसत नाहीं. संशय येतो. तेव्हां सत्य आहे असें म्हणून नमस्कार करून ते चालते झाले.

नंतर कांहीं दिवसांनीं तेथें पुष्कळ लोक जमूं लागले, तेव्हा " संगत संजायते कायः " हें स्मृति वाक्य आठवून ' संगत्यक्त्वासुखीभव " या वाक्याप्रमाणें लोकांचा संग मनोविक्षेपाला कारण होतो म्हणून तेथून डुमगेरीच्या कट्ट्यावर गुराखी मुलाबरोबर पाडाचे आंबे काढीत, करवंदे खात, जांभळें, पेरू वगैरे गोळा करीत, शेण भरून मुलांना द्यावें, अशा रीतीनें कांहीं दिवस त्यांनीं कालक्रमणा केली.

---

## प्रकरण २८ वें.

या प्रमाणें काळ घालवीत असतां एके दिवशीं कांहीं मुलें फणस चोरून घेऊन जात होतीं तेव्हां तेथें अवधूतास पाहून मालकानें त्यास दोन तडाखे दिले. योगी कर्मपाशापासून मुक्त होतो तसें फणसाचा मालक जो चांभार त्यानें सोडलें तर आपण मोकळा होईन असें वाटून ते भयभीत झाले. इतक्यांत चांभारानें सोडिलेंही. तेव्हां गोपाळांबरोबर चिद्घनानंद स्वामीच्या समाधिस्थानीं येऊन त्यांनीं विश्रांति घेतली. नंतर मनांत म्हणाले; मृत्युलोकवासी जो त्या मजवर चोरीचा आळ आला तर आश्चर्य कसलें; वैकुंठवासी कृष्णावर सुद्धां स्यमंतक मणी चोरल्याचा आळ आला व त्यामुळेंच त्याचें जांबुवतीबरोबर लग्न झालें. त्याप्रमाणें लग्नाची तरी पीडा माझ्या मागें लागली नाहीं, हें एक बरेंच. असें म्हणून ते शांतचित्तानें येऊन बसले आहेत तों अनेक भक्त व लिंगायत लोक येऊन नमस्कार करूं लागले.

अशा रीतीनें अगदीं एकीकडे रहात असतांही आलेले लोकांच्या शंकांचें समाधान करावें लागे, व त्यामुळें त्यांची चोहोंकडे

कीर्ति झाली. ती सहन न होऊन एका लिंगायतानें मत्सरें करून एके दिवशीं रात्रीं चिद्घनानंदस्वामींच्या समाधींत अवधूत निजले असतां तेथें येऊन आंत कोण आहे असें विचारिलें. तेव्हां जबाब आला नाहीं म्हणून आंत शिरून त्यांना बाहेर आणून म्हणाला कीं तूं लिंगायत असून लिंग न बांधतां भवी होऊन लिंगायताकडून नमस्कार कसा करवून घेतोस ? याकरितां तुला योग्य शिक्षा देतों. असें म्हणून स्वामीस खुबे धरून डोक्या इतकें उंच उचलून खालीं आपटलें, व मारूं लागला. इतक्यांत गडगड असा ध्वनी येऊं लागला तो ऐकून तो पळून गेला. गुडघा दुखावला व कोपराचें रक्त निघालें. पाठीवर जोराचे तडाखे बसल्यामुळें उठलेल्या वळांत रक्त साखळलें होतें. कोपराचें रक्त पुसून रांगत रांगत समाधींत येऊन एकक्षण विश्रांति घेऊन दुसऱ्याच्या शरीराबद्दल जसा आपल्याला अभिमान नसतो तसा आपल्याही शरीरांचा अभिमान न बाळगतां निरभिमानपणानें जीवन्मुक्तिसुखांत सलग्नचित्त होऊन ते निजानंदांत निमग्न झाले. दुसरे दिवशीं हन्यार्ड मठाचे स्वामी रोजच्याप्रमाणें सकाळींच आले, तों स्वामीच्या वस्त्रावर रक्ताचे डाग दिसले. म्हणून त्यांनीं अंगावरील वस्त्र काढून पाहिलें तों बराच मार बसला आहे. मग स्वामीस काय झालें म्हणून विचारिलें असतां स्वामी म्हणाले, प्रारब्धभोग भोगिला. आतां त्याचा क्षय होऊन ब्रह्मरूप विदेह कैवल्य जवळ झालें. हन्यार्ड मठाच्या स्वामींनीं ह्या जखमा तशाच सोडल्या तर फारच त्रास होईल म्हणून गुरुपादप्पालकुंडी संगाप्पायरगल्ल, बसाप्पायरगल्ल इत्यादि भक्तांला बोलावून आणून अवधूताला आपल्या मठांत नेऊन कांहीं दिवस तेथेंच ठेवून घेऊन उपचार केले. जखमा बऱ्या झाल्याबरोबर स्वामी पुनः त्या समाधीजवळ येऊन चदरंग, इस्पेट, सोंगट्या, वाघशेळ्या, चेंडु, गोट्या

इत्यादि खेळ गुराखीमुलांबरोबर दिवसा खेळत व रात्रीं शास्त्र चर्चा करीत तीन वर्षे त्या मठांत काळ घालवून स्वच्छंदानें रहात असतां मूर्खाला ह्यांची ही स्थिति सहन झाली नाहीं. यांचा जीव घ्यावा म्हणून त्यांनी यांना ओसाड विहिरींत टाकलें तेथें आंगांत कांटे मोडले, दगडावर आंग ठेचलें, असा त्यांना अत्यंत ताप झाला. तथापि मरण आलें नाहीं. पुढें कांहीं जण स्वामींस ओसाड देवालयांत कोंडून बाहेरून दरवाजा बंद करून घेऊन चालते झाले. देवालयांत वस्ती नसल्यामुळें तेथें घुंघटीं, डांस, मिरचीकिडे, वगैरे प्राण्यांपासून त्यांना अत्यंत ताप झाला, तथापि निर्विकल्प समाधींत चित्ताचा लय करून स्वामी बसले असतां तीन दिवसांनीं परमात्म्यानें येऊन ऊठ, ऊठ, जागा हो, तूं दुःखी होऊं नको, असें म्हणून अंगावर हात फिरविला. त्यायोगानें स्वामींचे सर्व श्रम परिहार झाले. याप्रमाणें परमात्म्याची कृपा पूर्ण असल्यामुळें असलीं अनेक अमोघ संकटें आलीं तरी त्यांना कांहींएक अपाय झाला नाहीं.

पुढें कांहीं लिंगायत लोकांनीं सभा करून ठरविलें कीं, या भवीला जो लिंगायत नमस्कार करील त्यानें प्रायश्चित्त घेतलें पाहिजे. तरी मुमुक्षु लोक ही भीति न मानितां परमार्थसाधनाकरितां येतच होते. कांहीं दिवसांनीं हंदरय्या नांवाचा एक इसम पहांटे २ वाजतां एका हातांत एक सोटा व एका हातांत एक पायतान घेऊन आला, व पायतान स्वामींच्या डोक्यावर ठेवून जर हें पडलें तर मरेमरेतों मारीन असें म्हणाला. स्वामी एक तासपर्यंत तसे ताठ बसले, पुढें शरीरधर्माप्रमाणें थोडेसें हाललें, तों पायतान खालीं पडलें. हंदरय्या शिंदी प्याला होता, व त्याचा अंमल चढल्यामुळें त्यानें हातांतील सोट्यानें चार सडाखे

स्वामींस लगावले व म्हणाला कीं, अरे तूं आरूढ झाला आहेस तर शिंदी कां पीत नाहींस, जर तूं शिंदी, दारू वगैरे प्यालास तर मात्र भेदभावरहित आरूढ खरा. नाहीं तर कसला आरूढ! असें म्हणून लाथाबुक्यांनीं वाटेल तसें मारूं लागला. इतक्यांत उजाडलें व बशट्टीअप्पा, मेयाशीनकायी वगैरे गृहस्थ येत होते, त्यांना पाहून आरूढ स्वामी म्हणाले, बाबा, आतांपर्यंत कोणी नव्हतें तुला वाटेल तें करितां आलें. आतां भक्त लोक येऊं लागले, त्यांनीं पाहिलें तर तुला चौपट प्रायश्चित्त मिळेल. याकरितां चालता हो. तेव्हां तो पळून गेला.

नंतर त्या भक्तांनीं येऊन नमस्कार करून पाहिलें, तों सर्वांग ठेचलें आहे. यावरून रात्रीं एथें कोणी तरी आला होता व त्यानें मारलें असावें असें समजून आंगावरून हात फिरवून विचारिलें कीं, कोणी मारिलें त्याचें नांव सांगा म्हणजे त्याला धरून आणून योग्य प्रायश्चित देऊं. तेव्हां आरूढ स्वामी म्हणाले, " यद्भावितव्यं तद्भवति " या वाक्याप्रमाणें प्रारब्धांत असलेलें सुख-दुःख भोगून कर्माचा नाश होतो. त्याबद्दल प्रयत्न करूं नये. कारण तें शिल्लक राहून जन्माला कारण होतें. योग्यता पावलेल्यानें आपल्यास दुसऱ्यांनीं दोष दिला तरी किंवा चांगलें म्हटलें तरी दोन्ही आपल्या पूर्वकर्माप्रमाणें आहेत असें समजून शांत चित्त असावें. हें ऐकून आपल्या क्रोधवृत्ति आवरून त्या दिवशीं पुष्कळ वेळ बसून भक्त निघून गेले. नंतर कांहीं दिवसांनीं एक मूर्ख आला व त्यानें स्वामींचें नवीन धोतर चोरून नेलें. असा स्वामींस बराच त्रास होत होता.

गांवांतील एक लिंगायत पौर्णिमेचे दिवशीं दोनप्रहरीं शेताकडे अन्नाचीं पाटी घेऊन, हातांतून पेटलेले गोवरीचा विस्तव घेऊन

जात असतां स्वामी हेग्गीरीच्या जवळच्या चुनेगची कट्टयावर बसले होते. त्यांस पाहून हा लिंगायत म्हणाला हा साधु म्हणवून घेऊन मुका बसतो याची परीक्षा पाहूंया. नंतर जवळ येऊन हातांतली जळकी शेणी स्वामीच्या डोक्यावर ठेवून चालता झाला. तेव्हां महाराज म्हणाले एकदां लहानपणीं एका नागानें माझ्या डोक्यावर फणा धरिली होती, त्यावेळीं तो महादेवाचा अलंकार आपल्याला मिळाला असें समजत होतों. तसेंच आतांही त्याचा तिसरा डोळा आपल्या डोक्यावर ठेविला आहे, असें समजून स्वस्थ बसले. इतक्यांत दुसरा एक मनुष्य येऊन त्यानें काठीनें तो विस्तव खालीं पाडिला व त्याला म्हणाला मूर्खा माहात्म्याचे डोक्यावर विस्तव ठेवितोस तुझा परिणाम काय होईल? असें म्हणून तोही आपल्या वाटेनें गेला. पुढें तीन महिन्याचे आंत शेणी ठेवणारा त्याच्या हातास एक करट होऊन त्यांत किडे पडून तो मेला व त्याची बायको मरून नष्टांश झाला. बहुत-करून त्याला यमराजानें तापलेल्या लोहरसाच्या वैतर्णी नदींत टाकलें असावें.


या प्रमाणें ज्यांनीं ज्यांनीं त्रास दिला त्यांना देवानें त्याच वेळीं योग्य प्रायश्चित् दिलें. हें असो. भीमप्पा उज्जणवर या नांवाच्या मनुष्याला मूल होत नव्हतें, म्हणून तो अन्नदान, अतिथि अभ्यागत यांची सेवा वगैरे पुण्यकर्में करीत असे, पुढें तोही ह्या महात्म्याची सेवा करूं लागला व मला मूल नाहीं तुमच्या कृपेनें मला मूल व्हावें अशी प्रार्थना करूं लागला. तेव्हां तुला दोन्हीं कुलांचा उद्धार करणारा ज्ञानी पुत्र पाहिजे किंवा संसारी राहून ताप सोसणारा पुत्र पाहिजे असें स्वामींनीं विचारिलें. तेव्हां त्याचें अंतःकरण निर्विकल्प असल्यामुळें त्यानें सगराप्रमाणें विषम न

बोलतां ज्ञानपुत्र पाहिजे म्हणून सांगितलें. तेव्हां अवश्य असें म्हणून मीच तुझा पुत्र, माझ्यावर ममता कर असें स्वामी म्हणाले, आणि पुत्राच्या पालनानें जें सुख तुम्हाला होणार तेंच या सेवेनें होईल. तेव्हांपासून आतांपर्यंत त्याचे वंशज स्वामीची सेवा करितात. भीमप्पाच्या इच्छेप्रमाणें स्वामीही त्याच्या घरीं राहून बालक्रीडा करूं लागले. सद्भक्त म्हणतात कीं, पूर्वी ओम्यवा नांवाच्या आईच्या घरांत परमेश्वर बालक होऊन खेळत होतें असें ऐकितों, ती गोष्ट आतां खरी झाली. कांहीं बापाला यांचा हा आनंदातिशय आवडत नसे ते यांना शिव्या देऊन व शारीर क्लेश देऊन दुःख देतच होते. तरी श्रियाळाचे सत्त्वाची परीक्षा केल्याप्रमाणें हें चाललें आहे, असें समजून भीमप्पा वगैरेंची भक्ति चालली होती त्यांत अंतर पडलें नाहीं.

---

## प्रकरण २९ वें.


कांहीं दिवसांनीं बाजारपेठेंत नऊ कळसांचा रथ तयार करून गौरी उत्सव करावा म्हणून सहा महिन्यापासून वाटाघाट चालली होती, त्यांत एकमेकांचे भाषणानें तेढ येऊन रथोत्सव रहित झाला. त्या दिवसापासून भीमप्पा आपले घरांतील दागिने वगैरे विकून उत्तम पक्वान्नें तयार करून आलेल्या अतिथि, अभ्यागत, सत्पुरुष वगैरेस जेवायास घालूं लागला; तसेंच त्यांना नमस्कार करणें, त्यांच्याशीं अत्यंत नम्रपणानें वागणें, त्यांची इतर सेवा करणें, सर्व प्रकारें त्यांचा सत्कार करणें, वगैरे गोष्टी करूं लागला. तेव्हां आरूढ स्वामी डुमगेरी नांवाच्या तळ्याच्या कांठीं फिरत असतां रथोत्सव करणाऱ्या पक्षाचे कांहीं लोकांनीं स्वामीस रथांत बसवावें असें ठरवून चौघांनीं येऊन स्वामीचा हात धरून त्यांस नेऊन



श्रीसिद्धारूढ स्वामी महाराजांच्या शिवरात्रीच्या वेळच्या रथोत्सवाचा देखावा.

नवीन वस्त्राभरणें देऊन मोठ्या डौलानें रथांत बसविले; पूजा करून सुवासिनींकडून त्यांची मंगलारति करवून 'हर हर महादेव' असें म्हणून टाळ्या पिटल्या. तेव्हां स्वामींनीं कल्याण असो असा आशीर्वाद दिला. याप्रमाणें रथोत्सव संपला तेव्हां स्वामी म्हणाले आमचें प्रारब्ध जनका सारखें दिसतें. कारण एका तासापूर्वींच चौघां मुसलमानाकडून खूब मार मिळाला आणि आतां हा उत्सव झाला तेव्हां दोहोंची वजावाट झाली अशा प्रकारें निर्विकल्प स्थितींत राहून पुढें म्हणूं लागले कीं, मी त्या रथावर बसलों नाहीं तर ७२ हजार नाडींतून जाऊन ब्रह्मरंध्रांत राहणारी पुरीतति नाडी तिच्या शेवटीं सुषुप्तिकालांत मिळणारे सुखासारख्या आनंद स्वरूपांत मी आहें असें म्हणून निजानंदांत राहिले. हा उत्सव संपल्यावर सर्व ग्रामस्थांनीं मिळून स्वामी रहात होते, त्या चिद्घनानंद स्वामींच्या समाधीजवळ दोन मोठ्या समाराधना केल्या. तेव्हां सामान ठेवण्याला जागा नव्हती, याकरितां मल्लापा करडगी, होंबण्णा शिरगुप्पी, यांनीं दोन धर्मशाळा बांधल्या व एक विहीर तयार केली. इतक्यांत धातु नाम संवत्सराचा दुष्काळ पडला, भुकेनें पीडलेले हजारों लोक गांवभर फिरूं लागले. त्यांना अन्न न मिळाल्यामुळें अत्यंत व्याकूळ झालेले पाहून स्वामींच्या शिष्यांनीं व जुन्या हुबळींतील कांहीं गृहस्थांनीं एक मोठी समाराधना केली व त्या दुष्काळपीडित लोकांना पोटभर जेवावयास घातलें. तेव्हां स्वामी म्हणाले हें उत्तम काम केलें याच्या योगानें तुमच्यावर अन्नपूर्णा देवीची कृपा होईल व तुम्हांस गरिबांचा आशीर्वाद मिळेल वै देह असेपर्यंत आनंद, आणि नंतर विदेहमुक्ति मिळेल. असा स्वामींनीं आशीर्वाद दिला. तेव्हां सर्वजण तथास्तु असें म्हणाले. नंतर भूतदयेनें प्रेरित होऊन होंबण्णा नांवाच्या सांवकारानें एकट्यानेंच गरीब लोकांकरितां फारच मोठी समा-

राधना केली. लोकांचें जेवण चाललें आहे, इतक्यांत कांहीं सरकारी कामगारांनीं त्या सावकाराला कळविलें कीं, या गरीब लोकांस यथेष्ट जेवावयास घातलें तर ह्यांस अजीर्ण होऊन हे मरतील, याकरितां जेवण बंद करा. याप्रमाणें प्रतिबंध झाल्यामुळें चार तास जेवण बंद करावें लागलें, ज्या कामगारांनीं प्रतिबंध केला त्यांच्या वरिष्ठ कामगारांकडून भिकाऱ्यांना अर्धपोटीं जेवावयास घालण्याचा हुकूम आणला. नंतर मोठमोठ्या पंक्ती बसवून दोनप्रहर पासून संध्याकाळपर्यंत परठिकाणीं राहणाऱ्या लोकांस जेवावयास घालून प्रत्येकास थोड थोडें अन्न बांधून देऊन रवाना केले. व गांवच्या लोकांना रात्रीं १२ वाजेपर्यंत अन्नसंतर्पण चाललें होतें. त्या दिवशीं कार्तिक शुद्ध १५ पौर्णिमा होती. स्वामींचे मुख्य शिष्य विरण्या कोट्टय्या, शिवप्पा गुडद, चनवीरप्पा हल्ली केरी, बसवणी अप्पा क्षीरसागर, वगैरे होते त्यांनीं निश्चय केला कीं याप्रमाणेंच दरसाल कार्तिक शु. १५ पौर्णिमेस समाराधना करावयाची व त्याप्रमाणें कार्तिकमासीं पूजा, समाराधना वगैरे चालत असे. दोन वर्षांनीं मोठा मांडव घालून त्यांत स्वामीस उच्चासनावर बसवून ते त्यांची पूजा अर्चा करूं लागले व रथोत्सवही चालू केला. समाराधना चालू होत्याच. हें ऐकून दूरदूरचे लोक उत्सवास येऊं लागले. जत्रा बरीच मोठी जमूं लागल्यामुळें चवथ्या वर्षीं मोठा रथ केला व खूप दारू उडविली. त्यावेळीं दारूची ठिणगी पडून सर्व रथ जळून गेला. तेव्हां हें दुश्चिन्ह झालें असें समजून लोक काळजी करूं लागले. मग स्वामी म्हणाले हें दुश्चिन्ह नव्हे, ही ठिणगी आकाशांतून येऊन पडली आहे, व मोठा प्रकाश पडला आहे, यामुळें आतां या उत्सवाची कीर्ति फार वाढेल, तेव्हां सर्व निश्चिंत झाले. याप्रमाणें कांहीं वर्षें उत्सव झाल्यावर पाण्यावरील रथ करण्याचें ठरलें व त्याला "तेप्पद तेरू" असें नांव ठेविलें.



श्रीसिद्धारूढ स्वामीच्या शिवरात्रीच्या महा पूजेचा देखावा.

असा उत्सव बरेच वर्षे चालला होता, पुढें कार्तिकमहिन्यांतच ह्या शहरीं प्लेगचा उपद्रव फार वाढूं लागल्यामुळें दोन वर्षे यात्रा फारच कमी आली, व उत्सवही बेताचाच झाला. म्हणून शिवरात्रीसच मोठा उत्सव करावयाचा असें ठरवून कार्तिकांतील उत्सव बंद केला व श्रावण महिन्यांतही थोडासा उत्सव करून 'तेप्पद तेरू' करण्याचा परिपाठ पडला आहे. शिवरात्रीं उत्सवांत सात दिवसपर्यंत अहोरात्र "शिवाय नमः" या पंचाक्षरी मंत्राचा जप चालू असतो. सकाळीं ब्रह्मज्ञानसंबंधीं चर्चा चालते. नंतर लोकांच्या समजुतीप्रमाणें वर्णाश्रम धर्माला अनुसरून अन्नसंतर्पण होतें. दोनप्रहरीं कीर्तन, भजन, गुरुपूजन वगैरे होऊन रात्रीं जत्रेंतील सर्व स्त्रीपुरुष, जिज्ञासू वगैरे आपआपल्या अधिकाराप्रमाणें भजन, पूजन, मानसपूजा वगैरे करितात, कांहीं भक्त गायन, नर्तन करितात. हा उत्सव पहाण्यानें आपण धन्य झालों असें कांहींजण समजतात. कांहींजण आपला जीव असेपर्यंत हा उत्सवच आपली काशीयात्रा, जप, तप, अनुष्ठान, स्वधर्म वगैरे सर्व सत्कार्यें होत, अशी भावना करितात. कारण एथें महद्विचार, ब्रह्मजिज्ञासा होत असल्यामुळें, आणि सर्व सत्कृत्याचें फल यापासूनच मिळावयाचें असल्यामुळें आपण धन्य होऊं असें ते समजतात.

---

## प्रकरण ३० वें.

### कांहीं शिष्यांची व इतर माहिती.

श्रीमद्विवेकसिंधूप्रमाणें, शिष्यांचा हा ताप हरण करणारे, श्री सिद्धारूढ स्वामी अखंडसच्चिदानंदरूपानें विराजमान आहेत. त्यांकडे कांहीं वर्षांपूर्वीं एक मुमुक्षु लहान वयांतच संसारतापानें तप्त होऊन हा ताप दूर करण्याला गुरु मिळावा. म्हणून विचार



बसलेले—१ विजापूरचे रामदास. २ हुबळीचे जडपन्नवर. ३ श्री सिद्धारूढ स्वामी महाराज. ४ श्री कबीरदास. ३ श्री शिवानंद.
उभे राहिलेले—१ रामदास शिष्य. २ श्री शरणय्या. ३ सोलापुरचे शरणय्या. ४ रामय्या. ५ गोरखनाथ.

करीत पूर्वसुकृताच्या योगानें, अनेक देश फिरत व तीर्थयात्रा करीत श्री सिद्धारूढ स्वामींची कीर्ति श्रवण करून या ठिकाणीं आला व मुमुक्षुत्वादि चार साधनसहित गुरूचे सान्निध येऊन साष्टांग नमस्कार करून नम्रतेनें हात जोडून विनयानें म्हणाला कीं, साक्षात् परमेश्वरच अशा गुरुमहाराजा, अनायासानें हा ताप दूर करण्याचें कर्तृत्व तुमच्या ठिकाणीं आहे, असें म्हणून हात जोडून उभा राहिला. स्वामी त्याजकडे दुर्लक्ष करून हा सत्याधिकारी आहे किंवा नाहीं, याची परीक्षा करावी म्हणून उदासीन राहिले. मी कृपाकटाक्षाला पात्र नसेन असें स्वामीस वाटलें असेल, असें समजून तोही गप्प राहिला; व मनांत समजला कीं, रूप पहावयास ज्याप्रमाणें डोळे पाहिजेत त्याप्रमाणें गुरुकृपाकटाक्ष पाहिजे तर गुरूची सेवा केली पाहिजे. पुढें हा नानाप्रकारची सेवा करूं लागला. त्याची परीक्षा पहाण्याकरितां एकेक दिवशीं गुरु त्याच्या जेवणाची उपेक्षा करीत असत. तरी त्यानें सद्भाव न सोडतां सेवेंत कमी केलें नाहीं. अगदीं नेहमीं तो तत्पर असे. हा सद्भावानें सेवा करीत आहे असें पाहून गुरूंनीं त्याला कबीरदास हें नांव योग्य आहे, असें समजून त्याला कबीरदास या नांवानें हाक मारून आपल्या समोर बसवून घेतलें. पण हा तेथें न बसतां गुरूंच्या मागील बाजूस जाऊन बसला. तेव्हां गुरूंनीं याची साधनें निश्चयात्मक आहेत काय ? हें पाहण्याकरितां त्याला विचारिलें कीं, ज्ञानसाधन मोक्षाला विवेक हें एकच साधन पुरे, इतर साधनें कशाला पाहिजेत ? असा प्रश्न ऐकून बालशिष्य म्हणाला वैराग्यावांचून विवेक नाहीं. तर मग वैराग्य व विवेक दोनच साधनें पुरेत. इतर साधनांची काय आवश्यकता आहे ? शमादि साधनें नसतील तर वैराग्य नष्ट होतें. तर मग शम एकच पुरे; दया कशाला पाहिजे ? मनोनिग्रह

व इंद्रियनिग्रह हे एकमेकांवर अवलंबून आहेत, म्हणून दया, क्षमा वगैरेची जरूरी आहे. आतां बोलण्याप्रमाणें याची भावना आहे किंवा नाहीं हें पहाण्याकरितां स्वामी म्हणाले, अरे शिष्या,— हीं साधनें प्राण्याला मरणाचें औषध आहेत, याकरितां यांची इच्छा करूं नको. यामलशास्त्रांत स्त्रीवश्य, जनवश्य, राजवश्य, भूतवश्य, रसवाद, पौष्टिकत्व इत्यादि सचा सिद्धि आहेत म्हणून तीं शास्त्रें तुला सांगतों. तीं साधन केलीं तर तुला शांति मिळून जीवितवृत्ति चालेल. तेव्हां बालशिष्य म्हणाला कीं, या लोकीं कदाचित् सुखाला कारण होतील, परंतु परत्र दुःखालाच कारण आहेत. याकरितां विचार करूनच त्याचा मी त्याग केला आहे. गुरु म्हणाले परसुखाकरितां निराळी उपासना किंवा योगसाधन सांगतों. त्यानें तुला सुख मिळेल. शिष्य म्हणाला, ॥ यथेह कर्मचितान् लोकः क्षीयते, तथैवामुत्र कर्मचितो लोकः क्षीयते ॥ या श्रुतीप्रमाणें परलोकादि कर्म रचित असल्यामुळें नष्ट होतात, असें ऐकिलें आहे. गुरु म्हणाले ज्या अर्थीं विषयच इहलोकीं सुखाचें साधन आहेत, त्या अर्थीं तेच प्राप्त करून घे. शिष्य म्हणाला, " न कर्मणा, न प्रजया, न धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः " या प्रमाणानें इहपर न सोडतां अमृतसुख मिळणार नाहीं म्हणून इहपर या दोहोंचाही स्वीकार योग्य नाहीं. तेव्हां गुरु म्हणाले, हा योग्य अधिकारी आहे. याला इतर कामें सांगणें योग्य नव्हे. तेव्हां कबीरदासास म्हणाले, तुझी इच्छा काय आहे. कबीरदास म्हणाले, ईशावास्य उपनिषद् कर्मपर आहे, किंवा ज्ञानपर आहे, याबद्दल संशय आहे. तो निरसन व्हावा अशी प्रार्थना आहे. तेव्हां गुरूंनीं कबीरदासाकडून त्याचा कानडींत अर्थ करवून त्याची शंका निरसन केली. या भाषांतर करणारालाही योग्य

फुरसत मिळाल्यास व गुरुकृपा झाल्यास त्याचें भाषांतर मराठींत करावें अशी इच्छा आहे, कधीं सफल होईल तीं होवो.

शिवानंद या नांवाचे दुसरे एक शिष्य आहेत, ते लहानपणींच वैराग्यशमदमादि साधनानीं युक्त होऊन पुष्कळ वर्षे लखनौकडे होते. तेथें त्यांनीं एक आश्रम स्थापिला आहे. पुढें एथें " वेदांत पाठशाळा व अनाथ बालकाश्रम " स्थापावा व त्याच्या व्यवस्थेकरितां एक कायमचा फंड जमवावा, अशी यांची खटपट चालू आहे. या कार्याकरितां लागणारी भव्य इमारत डा० भगवंतराव सखाराम पाटकर व त्यांचे आप्त रा० रा० वसंतराव आनंदराव दाभोळकर वगैरेच्या साह्यानें एथेंच चिद्घनानंद स्वामीच्या समाधिजवळ तयार केली आहे.

शरणया नांवाचे एक शिष्य आहेत, ते लिंगायत लोकांचा विशेषतः परामर्ष घेतात. स्वतः सिद्धारूढस्वामी हे पूर्ण अद्वैतवादी आहेत, पण पुष्कळ लोक आपआपल्या ज्ञातिधर्मांप्रमाणेंच वागणारे आहेत, या करितां मठांत त्यांच्या त्यांच्या धर्मांप्रमाणें त्यांची व्यवस्था ठेविलेली असते.


एक गणाप्पा नांवाचा चित्रकार कलघटगीचा राहणारा शिष्य होता, तो अगदीं निरपेक्षबुद्धीनें स्वामीची सेवा करीत असे. त्यानें स्वामीकरितां एक चंदनाची उत्तम पालखी करून दिली आहे. तसेंच सोनार शिष्य आहेत, त्यांनीं एक सोन्याचा व एक रुप्याचा असे दोन मुकुट, पादुका वगैरे करून दिल्या आहेत. उत्सवाच्या वेळीं स्वामी गांवांत सोन्याचे पांच कळस असलेल्या पालखींतून मिरवत जातात. बेंकापा नांवाचा एक शिष्य आहे, तो उत्तम चित्रकार आहे. याचें बाळबोध अक्षर फारच उत्तम आहे, हें जागजागीं दगडावर कोरलेल्या उपनिषदांतील श्लोकांच्या

अक्षरावरून समजून येईल. तुकाप्पा सपार या नांवाचा एक कोष्टी आहे. त्यानें महाराजांच्या पालखीवर घालण्याकरितां एक जरीचें उत्तम कापड येथेंच विणून तयार केलें आहे.

रा. रा. बाबागर्दे, व्यंकटराव गोखले, परापा आणा, वामनराव फणसळकर, रघुनाथराव उर्फ आपाराव शिरगांवकर वगैरे मुमुक्षु शिष्य पुष्कळच आहेत. रा. वामनराव फणसळकर यांनीं स्वामीचें चरित्र मराठींत लिहिलें आहे, व वेदांतमाला नांवाचा आणखी एक ग्रंथ केला आहे. तसेंच रा. रा. बाबा गर्दे यांची कीर्ति तर सर्वांना माहीतच आहे. त्यांनीं ब्रह्मसिद्धांत नांवाचें पुस्तक, गीतपंचदशी, गीताशतपदी वगैरे पुस्तकें लिहिलीं आहेत.

प्रो. काशीनाथपंत छत्रे वगैरे श्रीमान् शिष्यही पुष्कळ आहेत. त्यांनीं महाराजांच्या समाधीची दगडी इमारत बांधण्यास व तलावास वगैरे चांगली मदत केली आहे. व वेळोवेळीं सामान सुमान वगैरे त्यांजकडून बरेच येतें. तसेंच या ठिकाणीं पाण्याची सोय नव्हती कारण एक विहीर होती तिला पाणी अगदीं नव्हतें यामुळें ती बुजवून टाकिली. व तलाव खोदण्याचें ठरून लागलीच काम सुरू होऊन एक दगडी पायऱ्यांचा सुंदर तलाव तयार झाला. आतां पाण्याची चांगली सोय झाली आहे. पण पिण्याचें स्वच्छ पाणी मिळण्याकरितां विहीर पाहिजे आहे.


हल्लीं एथें एक चिद्घनानंद स्वामींची समाधी व तीवर दुसरा मजला करून स्वामीस निजण्याची जागा चांगली सचित्र तयार केली आहे. दुसरी स्वामींची दगडी समाधी ही इमारत बदामी पांढऱ्या दगडाची बांधली आहे, तींत मोठमोठे शिलालेख आहेत. त्यांत कानडी व मराठी लिपींत ईशावास्योपनिषदांतील श्लोक कोरिले आहेत. व एक सापाचें एकसंधि दगडावर फारच मोठें



श्री सद्गुरु सिद्धारूढ स्वामी महाराज यांजकरितां बांधलेलें समाधिस्थान.




श्री सिद्धारूढ स्वामीच्या मठांतील तलावाचा देखावा.



श्री चिद्घनानंद स्वामींची समाधी व श्री सिद्धारूढ स्वामींचें शयनस्थान.



श्री सद्गुरु सिद्धारूढ स्वामीचे मठाचा देखावा.



श्री सद्गुरु सिद्धारूढ स्वामी महाराज यांची नेहमीं बसण्याची जागा. येथें प्रातःकाळीं व सायंकाळीं भक्तमंडळी येऊन काकड आरती वगैरे करीत असतात.

चित्र कोरिलें आहे. ब्राह्मणलोकांकरितां एक व लिंगायतलोकांकरितां एक अशा दोन मोठ्या धर्मशाळा व दोन स्वयंपाक घरें आहेत. श्रीकबीरदास एका मोठ्या सोप्यांत वास करितात. एथें श्री स्वामीचा मोठ्या प्रमाणांत काढलेला एक मोठा सुंदर रंगीत फोटो आहे व एक स्वामींची लाकडी कोरीव मूर्ति आहे. ही अगदीं हुबेहुब आहे. ही मूर्ति पाहिल्यावर आपल्याकडे अझूनपर्यंत खोदकाम उत्तम करणारे व रंगाचेंही उत्तम काम करणारे कारागीर आहेत, असें मनांत आल्यावांचून रहात नाहीं. यापुढें नवीन धर्मशाळा श्री शिवानंदस्वामी यांचे खटपटीनें व डॉ. पाटकर यांचे स्फूर्तीनें तयार झाली आहे. त्यांतच आतां वेदांतशाळा व अनाथबालिकाश्रम स्थापन व्हावयाचा आहे.

श्री. स्वामींची दिनचर्या अशी आहे कीं, भीमप्पा उज्जनवर याचे घरीं रात्रीं शयन करावयाचें व पहाटे चार वाजतां उठावयाचें. त्या वेळीं बरीच भक्तमंडळी मंगल आरत्या घेऊन आलेली असते. तेव्हां तेथें आरती भजन वगैरे घेऊन ६।–६॥ चे सुमारास महाराज मठास जातात. स्वामी एकवेळ अत्यंत आजारी झाले होते. तेव्हांपासून त्यांची प्रकृति फार अशक्त झाली. पायानें जाण्यायेण्याचे श्रम सोसेनात तेव्हां मल्लापा आणा दिवटे या नांवाचे शिष्यानें एक टांगा ठेवून महाराजांची मठांत जाण्यायेण्याची सोय केली आहे. मठांत गेल्यावर एक तास दीडतास वेदांतकथन चालते. या वेळीं श्रीकबीरदास हे पंचदशी, उपनिषदें, वगैरे वेदांतविषयक ग्रंथ वाचून त्यांचा कानडींत अर्थ सांगतात. व ज्या ठिकाणीं अर्थ फार विशद करावयाचा असेल त्याठिकाणीं स्वामी स्वतः कांहीं भाग सांगतात. मग स्वामी मठांतच थोडें भोजन करितात. अगर कोणी जेवावयास

बोलाविलें असतां तिकडे जेवावयास जातात. पुढें १–१॥ चे सुमारास मठांत येतात व १ तास विश्रांति घेऊन नंतर पुनः सकाळच्या प्रमाणें वेदांतचर्चा चालते. यावेळीं पुष्कळ शिष्य, व भक्त श्रवणाकरितां आलेले असतात. अगदीं सायंकाळीं विरूपाक्ष शास्त्री हे महाभागवत सांगतात; मग भजन, आरती होते. आणि नंतर स्वामीमहाराज दिवटे यांचे टांग्यांतून उज्जनवर यांचे घरीं येतात. तेथें गांवांतील व्यापारी वगैरे भक्तमंडळी जमलेली असते, तेथें पुनः थोडा वेळ वेदांतचर्चा चालते. या ठिकाणीं कोणी तरी पंचदशी अगर दुसरा ग्रंथ वाचतात. व स्वामी स्वतः त्याचा अर्थ विशद करून सांगतात. कोणी सद्भक्त परठिकाणाहून मठांत रहावयास आल्यास स्वामी महाराज रात्रीं गांवांत न जातां मठांतच राहतात. स्वामींच्या ठिकाणीं एक मोठा विशेष गुण असा आहे कीं, कोणी कसाही वादविवाद करावयास येवो. त्याचा अधिकार पाहून त्याचें समाधान होईल, असेंच ते त्याला उत्तर देतात. यामुळें येथें कोणीही आला तरी त्याचें समाधान झालें नाहीं, असें होतच नाहीं.

हें चरित्र लिहिण्याचा उद्देश असा आहे कीं, हें वाचणारास मी कोण? कोठून आलों? मला काय करावयाचें आहे? हें जाणण्याची इच्छा व्हावी व केवळ पशूप्रमाणें शारीरिक क्रिया करण्याकरितांच मनुष्याचा जन्म नाहीं. हें प्रत्येकानें ध्यानांत आणून ब्रह्मानंद अनुभवण्यास प्रवृत्त व्हावें. हा उद्देश या जगाचा जो कोणी नियंता असेल त्यानें सिद्धीस न्यावा अशी त्याची प्रार्थना करून मी प्रणाम करितों.

---

# प्रकरण ३१ वें.

मूळ चरित्रांत प्रकरणाचे आरंभीं व शेवटीं एकेक श्लोक आहे. त्याचें हें भाषांतर केलें आहे म्हणून प्रत्येक पद्याचे मथळ्यावर त्या त्या प्रकरणाचा अंक घालून त्यापुढें आरंभींचें याबद्दल आ. व शेवटचें ह्याबद्दल शे. अशीं अक्षरें घातलीं आहेत व अवघड शब्दावर टीपा दिल्या आहेत.

## पृथ्वी. १ शे.

जनास नमण्या जरी कथितसे गुरू सिद्ध हा ।
तरी न मनिं भावना पुजक पूज्य पूजा पहा ॥
तथापि गुरु शिष्यही सतत रीति चालावया ।
प्रणाम करितों पहा परम सच्चिदात्मा तया ॥ १ ॥

## मंदाक्रांता २ आ.

पंचक्लेशा निवडुनि पदीं षड्भ्रमा षड्रिपूंना ।
घालीं पाही; त्रिगुण समुहा; पाठवी दिक्षु नाना ॥
तापा देतें सकल जगतां त्याच तापत्रयातें ।
ज्ञानश्रेष्ठा उचिताचि करी कृत्यही सिद्ध हातें ॥ २ ॥

## पंचचामर २ शे.

निरंजना यतीश्वराऽनघा प्रकाशरूपका ।
गरू गुणाधिशा, रहीत द्वंद्वमोहनाशका ॥
कलातिता, मनःस्थ, व्योमरूपका, निरंतरा ।
वसे सदा सुतेजरूप माझिया हृदंतरा ॥ ३ ॥

## पंचचामर ३ आ.

कुमार साच मंदहास्य उज्ज्वलीत बाल हा ।
उपासना करी कृपा कटाक्ष मंत्रयुक्त हा ॥
सुभाषणा करूनि बालकांसि तोषवीत हा ।
जनांस तोच रक्षुं मोह दंभ वारुनी महा ॥ ४ ॥

### भुजंगप्रयात ३ शे.

सदा सर्वसाक्षी सदा सर्वकर्ता । सदा सर्वव्यापी असे सर्वज्ञाता ॥
सदातर्क्य जो हा पुनः सर्वभोगी । हृदब्जीं वसो तो गुरू सिद्ध योगी ॥५॥

### पंचचामर ४ आ.

परीस स्पर्श होय तोंच लोह स्वर्ण होतसे ।
गुरू, जनास लोह कल्पुनी सुबोध देतसे ॥
जईं शिवें सुबोध वाक्य हा परीस येउनी ।
तईंच जाय जीव लोह-ब्रम्हस्वर्ण होउनी ॥ ६ ॥

### आर्या ४ शे.

अज्ञान पिशाच्यानें संसारीं मूढ फार त्रासविले ॥
सद्बोधामृतमंत्रें सिद्ध गुरूनेंच त्यांस सोडविले ॥ ७ ॥

### वसंततिलका ५ आ.

तो कल्पवृक्ष भजकां फळ कल्पितां दे ।
ती कामधेनु फल इच्छित कामुका दे ॥
चिंतामणी फल हि चिंतनकास देई ।
स्वानंद सौख्य गुरुसिद्ध अनिच्छ देईं ॥ ८ ॥

### मालिनी ५ आ.

कुणि जन तुज नेत्रीं पाहुनी धन्य झाले ।
कुणि पदकमलातें आठवूनी निमाले ॥
पुलकित तनु झाले स्वस्वरूपा बघून ।
स्मरण नच करे तैं द्वैत भ्रांती हरून ॥ ९ ॥

### शालिनी ६ आ.

श्री सिद्धा तूं गाजसी ब्रम्हतेजें । भ्रांती जाई आठविती तुला जे ॥
संसाराचा तापही हारविसी । लाभो कीर्ति सज्जनाधारकासी ॥ १० ॥

### कामदा ७ आ.

नाहिं या कलीं पूज्य सिद्धसा । प्रेममोक्ष हा देइं राजसां* ॥
श्रेष्ठ मूर्ति आरूढ मोक्षदा । राहसी समाधींत सर्वदा ॥ ११ ॥

---

* राजस गुणी लोकांना.

### द्रुतविलंबित. ७ शे.

श्रुतिस गोचर तूं नससी खरें । मन,† मती तुजला नच पाहि रे ॥
मग तुं इंद्रिय गोचर होशिल । वचन कोण प्रमाणहि मानिल ॥ १२ ॥

### कामदा ८ आ.

वेद गोचरारूढ श्रीपते । तूंच या जगा निर्मुनीच तें ॥
रक्षिसी तसा करिसि नाशही । तंत्र हें गुरो सहज होतही ॥ १३ ॥

### आर्या ८ शे.

वाक्यामृत तव ऐकुनि हृदयामाजींच शूलपाणि वसे ॥
कलिकाळा धूळीला मिळवुनि आरूढनाथ शोभतसे ॥ १४ ॥

### आर्या ९ आ.

परिसाची योग्य नव्हे उपमा तूं स्वस्वरूप देतोसी ॥
हरिहर रूपीं असुनी गुरुसिद्धा नरसमान कीं दिससी ॥ १५ ॥

### कामदा ९ शे.

त्रिगुणरूपका, निर्गुणात्मका । निगमपालका, लोकपूजका ॥
सहनशक्ति दे रक्षि या जगा । सगुणमूर्ति आरूढ रूप गा ॥ १६ ॥

### कामदा १० आ.

विश्व तूंच गा प्राज्ञ तूंच गा । तेज तूंच गा तुर्य तूंच गा ॥
सर्व तूंच गा या जना गति । होसि तूंच आरूढ श्रीपती ॥ १७ ॥

### कामदा १० शे.

सिद्धमूर्ति तूं ज्ञान देउनी । पापवासना धुवुन टाकुनी ॥
अंतरीं वसो माझिया सदा । भो गुरो तुझें रूप मोक्षदा ॥ १८ ॥

### कामदा ११ आ.

अल्पवस्तुला श्रेष्ठता पहा । देशि तूं अशी शक्ति त्वन्महा ॥
प्रार्थितों तुला जोडुनी करा । हे दयानिधे आरुढेश्वरा ॥ १९ ॥

### कामदा ११ शे.

स्वप्निंही बहू ताप होतसे । जागरूकता दुःख देतसे ॥
तूझिया गुणीं मन्मती जडो । भो गुरो तुझा संगही घडो ॥ २० ॥

† बुद्धि व मन यांना तूं दिसत नाहींस म्हणजे गोचर नाहींस.

### कामदा १२ आ.

देहबुद्धिचा मोहपाशही । नासुनी तशी मत्वबुद्धि ही ॥
आत्मबुद्धि सोऽहं अशी मला । देइ आरुढा हे अघानला ॥ २१ ॥

### भुजंगप्रयात १२ शे.

तुझे कर्ण हे ब्रह्मरूपीं अहा रे । तुझे नेत्र हे स्वप्रकाशीं महा रे ॥
तुझ्या दर्शनें पाप हें नाश होई । गुरू सिद्ध तो स्वात्मबुद्धीच देई ॥२२॥

### द्रुतविलंबित १३ आ.

कवण मी कुठला कळुं दे अगा । तटतटां तुटुं दे भवपाश गा ॥
म्हणुनि प्रार्थुनियां कर जोडितों । करिल आरुढही मज मुक्त तो ॥ २३ ॥

### तोटक १३ शे.

ममता कळुं दे मजला पुरती । बघ तारक तूं असती म्हणती ॥
मम दुःख मुळीं कर नाश विभो । पतितावन आरुढ श्रीपति भो ॥२४॥

### शालिनी १४ आ.

स्वप्नामध्यें वस्तु वाटे खरीच । मिथ्या वाटे जागरूकीं हि तीच ॥
भासो मिथ्या जागृती सत्यज्ञानें । होवो ऐसें आरुढा त्वत्कृपेनें ॥ २५ ॥

### शालिनी १४ शें.

होवो सत्य ज्ञान या चेतनेचें । देहो मिथ्या होय या कल्पनेचें ॥
दोहोंचाही निश्चयो मन्मनीं वा । सिद्धारूढा श्रीगुरो तूं करावा ॥२६॥

### शालिनी १५ आ.

हास्या मुद्रा होय कल्याणकारी । वस्तूदर्शी आणि दाताऽविकारी ॥
देहामाजीं वस्ति देवांशरूपा । कल्याणा तूं सिद्ध आरूढ भूपा ॥ २७ ॥

### वसंततिलका १५ शे.

मूर्ती तुझी दिसति फारच प्रेमरूपी । इच्छारहीत मजसी सम एकरूपी ॥
ज्ञानास देसि सतत प्रभुसामगानें । आरूढ देव मज तारिसि त्वत्कृपेनें ॥ २८ ॥

### वसंततिलका १६ आ.

स्थानत्रयीं दिससि वा न तुं षड्रिपूंत । तारुण्य आक्रमुनि जाति अशा जगांत ॥
माझ्या मनोगतिस आवरुनीहि तारा । सिद्धारुढा करि असें भ्रम जाय सारा २९

### कामदा १६ शे.

मेघ अंबरीं दीसती कसे । होति नाहिसे बुडबुडे जसे ॥
प्राप्त होतसे देह मृत्युला । सत्यज्ञान दे आरुढा मला ॥ ३० ॥

### शालिनी १७ आ.

मृत्यूकाळीं नाणि तूं बुद्धि अन्या । नेई अम्हां स्वस्वरूपींच धन्या ॥
अस्तीकाळीं देइं ज्ञाना खऱ्या त्या । सिद्धारूढा हे गुरो ज्ञानदात्या ॥ ३१ ॥

### कामदा १७ शे.

आनुकूल्य बा इष्टवृत्तित । प्रातिकूल्य वाऽनिष्टवृत्तित ॥
सत्यज्ञान तूं देउनी जना । तारि आरुढा हे दयाघना ॥ ३२ ॥

### शुद्धकामदा १८ आ.

सगुण रूपका निर्गुणात्मका । निगमवंद्य तूं विश्वव्यापका ॥
त्वरित तारि बा त्वत्पदांशका । सदय आरुढा शिष्यतारका ॥ ३३ ॥

### कामदा १८ शे.

अन्य वृत्तिदृक् धीर होसि तूं । अन्यमुक्तिदृक् देसि इष्ट तूं ॥
मी तुझ्या पदीं नम्र होई गा । सिद्धआरूढा मोक्ष देइ गा ॥ ३४ ॥

### शुद्धकामदा १९ आ.

शरिर वंचितें मांसरूपिसें । परि अशुद्ध देहीं न मी फसें ॥
विमळ बुद्धि दे आणि मुक्ति दे । सदय आरुढा आत्मबुद्धि दे ॥ ३५ ॥

### शुद्धकामदा १९ शे.

त्रिगुणमूर्ति तूं भक्तवत्सला । जगतिं ज्योति तूं सत्त्व सच्छिला ।
कवण जाणिजे तूझिया गुणा । निगम बुद्धि दे आदिकारणा ॥ ३६ ॥

### द्रुतविलंबित २० आरंभ.

भवविमुक्त गुरो करिशी जरी । त्वरित तार मला भवसागरीं ॥
शरण येत तुला अघतारण । तव पदांबुज हे मज तारण ॥ ३७ ॥

### आर्या २० शे.

कलिमलहारक सदया, गुरु सिद्धेशा शरीररिपुदमना ॥
तारी स्वपदरजें मज, तारी जें या असंख्य आर्त जना ॥ ३८ ॥

### शालिनी २१ आ.

वैरा साधों आपुली पाले लोकीं । होवो निंदा आणखी सर्व लोकीं ॥
सौख्या दाते वंचनाही करोत । सिद्धा स्थीरा इंद्रियें हीं असोत ॥ ३९ ॥

### शुद्धकामदा २१ शे..

गुरु वरेण्य तूं ज्ञानदायकीं । परममूर्ति ही लोकपूजका
शरण येइं मी शांतिदायका । सदय आरुढा भक्तपूजका ॥ ४० ॥

### शुद्धकामदा २२ आ.

विमलमूर्ति तूं तापहारका । कमलमित्र वा मोदरूपका ॥
सुमनवंद्य हे बीजरूपका । कुमनहारका सिद्धतारका ॥ ४१ ॥

### कामदा २२ शे.

तापहारका पुण्यदायका । कोपहारका रागनाशका ॥
मापरूपका मुक्तिदायका । तारि आरुढा ब्रह्मरूपका ॥ ४२ ॥

### आर्या २३ आ.

त्वन्मायेनें मोहित झालों मुकलों निजस्वरूपा कीं ॥
सिद्धारूढा तीरी संसारार्णवि दया करुनि लोकीं ॥ ४३ ॥

### आर्या २३ शे.

विपुल मदा दूर करी, ज्ञाननयन अमितरूप सिद्ध मुनी ॥
मायेपासुनि तारी, सहन करायास शक्ति देइं जनीं ॥ ४४ ॥

### शिखरिणी २३ शे.

अनन्याभक्ताचा करिसि लय संसार सदया ।
कुणा निंदीती हे ? जरि न भवमुक्ता हनन या ।
प्रपंचाच्या तापा दुर करुनि नामा सफल या ।
करी, निंदा होई न मग तव आरूढ सदया ॥ ४५ ॥

### कामदा २४ आ.

मृत्युपाश हो प्राप्त झालिया । भक्त रक्षिसी वारुनी तया ॥
सिद्ध आरुढा शुद्ध मुक्ति दे । स्थीर ज्ञान दे चित्समाधि दे ॥ ४६ ॥

### कामदा २४ वा.

वाणि चित्त ही तुज पहावया । आस टाकुनी मनन व्हावया ॥
पाहुनी तुझ्या चिन्मया रुपा । चिंतना करूं आरुढा नृपा ॥ ४७ ॥

### पंचचामर २४ वें.

जयास लोक सत्य सिद्ध वर्णितात फार गा ।
करीत जो निजात्मबोध तो परीस होय गा ॥
सुशिष्य पाप लोह होय स्वर्ण स्पर्श तो जयीं ।
घडे परस्परांस, पाप जाय भंगुनी तयीं ॥ ४८ ॥

### द्रुतविलंबित २५ वा.

मदविवर्जित भक्त करूनियां । सहज तारिसि तूं मुददातया ॥
कुमददायक या धन संपदे । सदय आरुढ नासुनि मुक्ति दे ॥ ४९ ॥

### मालिनी २५ वें.

श्रुति मति नयनाला तूं नहो ज्ञात बा गा ।
म्हणउनि करिती हे भक्त चिंता बहू गा ॥
परि श्रुति उपदेशा देउनी या जनाला ।
अरुढ यति असें हें नाम घेसी स्वताला ॥ ५० ॥

### पंचचामर २६ वें.

शिवस्वरूप घेउनीच मन्मथास जाळिसी ।
परी मना न जाळिलेंस तूं म्हणून जन्मसी ॥
तुला स्वरूपवि स्मृती नसे परी जना असे ।
मनास जाळ आरुढा करी न जन्म येइसें ॥ ५१ ॥

### शार्दूलविक्रीडित २६ वा.

श्रीमन्नित्यनिरंजना निरघनिर्द्वंद्वा सदानंदजी ।
व्योमाकार* अमंदमानसानिवासा मोह दूरां अजी ।
कामातीत कलादि दूर विलसा चिन्मूर्ति तूं गा खरा ।
प्रेमें चित्त सदा प्रकाशित करा हे सिद्ध योगीश्वरा ॥ ५२ ॥

**शिखरिणी २६ श्लो.**

जयांच्या अंतातें करुं न शकती काल जन ही ।
सदा जो पूर्णत्वें सुखमय रमे लोकहृदयीं ॥
मतीपासूनी तूं दुर असासि ऐसें समजुनी ।
ठसों सिद्धारूढा अचल तव मूर्ती मम मनीं ॥ ५३ ॥

**मंदाक्रांता २७ आ.**

नित्यानंदा निगमविनुता नेत्रवाक्चित्त दूरा ।
सत्या, पूर्णा, त्रिगुणरहिता तत्त्वमस्यादिलक्ष्या ॥
भक्तां लोकां परमसुखदा सर्वलोकैकनाथा ।
स्तुत्या, नित्या, परमनिरुता श्रीमदारूढ देवा ॥ ५४ ॥

**मंदाक्रांता २७ श्लो.**

जन्माला जे आखिल जन हे येति कारुण्यदृष्टी ।
पाहे त्यांना सकलहि, तदज्ञान दूरी करोनी ॥
दिव्य ज्ञानें श्रुतिमतप्रमाणास दावूनि त्यांना ।
सिद्धारूढा भवभयहरा पालिसी तूंच यांना ॥ ५५ ॥

**मंदाक्रांता २८ आ.**

पायीं घाली त्रिगुणसमुहां षड्रिपूला हि जैसे ।
पंचक्लेशा निरसुनि करा षड्भ्रमा दूर तैसे ॥
सारी तापत्रय भय दुरी नाशि लोकत्रयातें ।
सिद्धारूढा झडकरि करी मुक्त यांतून मातें ॥ ५६ ॥

**पृथ्वी २८ श्लो.**

तुला बघुनियां मला स्तुति सुचे नही ध्यानही ।
पहा तव सदा न मी बघतसें मुखाब्जास ही ॥
सगद्गद सुकंठ हो सुपुर येइ प्रेमाश्रुला ।
न भान स्मरण्या उरे मजहि सिद्ध योग्या तुला ॥ ५७ ॥

---

* ज्ञानीं.

### पृथ्वी २९ आ.

धृती तव पिता क्षमा जननि शांति भार्या बरी॰।
तुझा तनय सत्य हा भगिनि सत्कृपा ही खरी ॥
सुबंधु मनसंयमी असुनियां यति नाम कां।
तुला यतिवरा, असा त्यजिसि तूंच संसार कां ॥ ५८ ॥

### पृथ्वी २९ शो.

खरोखर न पाप या जगतिं जीव हिंसेसम।
पदां शरण आलिया अभय देति साधूजन ॥
परी सकल जीवभावलय तूं करीसी खरा।
विलक्षण असा कृपाजलनिधी नसे दूसरा ॥ ५९ ॥

### आर्या २९ शो.

सुरतरु सुरधेनूही देती इच्छीत इच्छील्या समज ॥
निष्कामि जना देसी, सारूप्या मुक्ति आरुढा सहज ॥ ६० ॥

### पृथ्वी २९ शो.

पित्यास धन मागतां सकल तो कधीं देईना।
सुभक्तसुत मागतां परम अर्थ *द्रव्यास ना ॥
न तूं म्हणसि देसि त्या सकल अर्थ योगी विभो।
म्हणोनि म्हणती तुला सुजगदेकतात प्रभो ॥ ६१ ॥

---

## प्रकरण ३२ वें.

---

### पदें आरत्या वगैरे.

आरूढ, सत्पदारूढ, तमोमयमूढ, जगीं जन भरला।
त्यां मुक्त कराया सांबचि जणुं अवतरला ॥ धृ० ॥
जरि रोड आकृति गोड, पाहतां कोड, पुरत नेत्रांचें ॥
तद्भाषण वाटे सार ब्रह्मसूत्रांचें ॥

---

* तूं द्रव्यास ना न म्हणसी असा अन्वय

मनिं शांति, मुखावरि कांति, घालवी भ्रांति, प्रणत लोकांची ॥
या अल्पमुखें मी स्तुति केविं करुं त्यांची ॥
॥ चाल ॥ कुणि म्हणति जातिच्या वाणी त्याजला ॥
कुणि म्हणति कोष्टिकुलवंशीं जन्मला ॥
परि अधिक द्विजाहुनि वाटे तो मला ॥
समदृष्टि, सदा संतुष्टि, असो तो कोष्टि, विप्र कीं वाणी ॥
तो वंद्यचि मजला चिद्रत्नाची खाणी ॥ आरूढ० ॥ १ ॥
बहु दिवस, असा सहवास, कराया नवस, चित्त करि माझें ॥
तो योग आणिला सहजचि सद्गुरुराजें ॥
संगती, ज्याचि सद्गती, देउनी मती, शुद्ध करि खाशी ॥
हा राहुनि येथें हुब्बळिची करि काशी ॥
॥ चाल ॥ असतील शेंकडो ज्ञानी महिवरी ॥
जाहले मुक्त स्वज्ञानें ते जरी ॥
उपकारी क्वचितचि होती या परी ॥
शिशुपरी, खेळ कुणि करी, वदत वैखरी, पिशापरि कोणी ॥
कुणि वसति मुक्यापरि स्तंभुनि आपुली वाणी ॥ आरूढ० ॥ २ ॥
ही माय, दुभती गाय, वंदितां पाय, ज्ञानपय देइ ॥
गुण, अंग, जाति, वय, काळ, वेळ, नच पाही ॥
जन भरति, ऐकुनी कीर्ति, पहाया मूर्ति, रथावरि यांची ॥
दर वर्षी भरे ती जत्रा कशि मौजेची ॥
॥ चाल ॥ प्रार्थना जनानों आतां आयका ॥
कल्पतरु तुम्हांला लाधे हा फुका ॥
संधि ही हतांतुनि जाऊं देऊं नका ॥
जा शरण, धरा तच्चरण, व्हावया तरण भवांबुधिमाजीं ॥
ही कृष्णसुताची विनति ऐकुनी घ्या जी ॥ आरूढ ॥ ३ ॥

**पद २ चाल–( म्हातारा इतुका न ).**

स्वामिन् जयजयकार । करिती दास तुम्हा जोहार । करणें दिनोद्धार ॥ध्रु॥
दैवगतीनें खालीं पडलों नव्हता मज आधार ।
नरक मूत्र मी सेवन करितां सुटलों त्यांतुनि पार ॥ १ ॥

बाळपणीं मी अजाण केवळ नकळे मज सुविचार ।
तरुणपणीं मज जिंकू आला कामरिपू अनिवार ॥ २ ॥
विद्ध कराया करितो मजवर बाणांचा भडिमार
बनलों त्याचा गुलाम बंदा होउन मी लाचार ॥ ३ ॥
घालुनि माझ्या पदीं शृंखला बहु जड हे सुतदार ।
संसारीं मज लोटुनि दिधलें भोगी कारागार ॥ ४ ॥
इतुक्यानें नच भोग संपला दुसरा साथीदार ।
क्रोध येउनी भाजी आंगा लावुनियां अंगार ॥ ५ ॥
लोभ मोह हें चांडालद्वय राखी तेथें द्वार ।
स्वस्थ झोंपही देत न घेउनी फिरविति वारंवार ॥ ६ ॥
त्यांचा नायक मद आला जो त्याहुनि दुष्ट अपार ।
कीलेनें मम नेत्र फोडिले अंधहि झालों ठार ॥ ७ ॥
पाहुनि मजला दुर्बल जाची मत्सर त्यास कुमार ।
त्याचे संगें वेडा झालों पडलों मी बेमार ॥ ८ ॥
अशा स्थितींतुनि दीनाला या मुक्त कोण करणार ।
सद्‌गुरु तुमचा आठव केला पाहुनियां अधिकार ॥ ९ ॥

[ ३ ]

अगम्य लीला सद्गुरु घरची वर्णवेना मजसी !
धाडुनियां मुळ घेउनि जावें शांति माहेरासी ॥ ध्रु ॥
संसारासी बहुतचि विटलें सौख्य नाहिं मजला ।
भवभय भीति आतिशय जाची जीव तेथ श्रमला ॥
धरोनि वांछा परमार्थाची नमितें चरणासी ॥ अगम्य० ॥ १ ॥
पतितपावना ने मज ऐकुनि घरिं ही येऊनि ।
ठेवुनियां शिरिं हस्त कृपेचा पावन मज करुनी ॥
विमल ज्ञान देई मजला अखंड स्मरणासी ॥ अगम्य० ॥ २ ॥
पतीतपावन नाम ऐकुनि धावुनियां आलें ।
ठेवुनी शिरीं हस्त कृपेचा पावन मज केलें ॥
विमल ज्ञान दिधलें मजला अखंड स्मरणासी ॥ अगम्य० ॥ ३ ॥

श्रीगुरुपदाब्ज पडतां दृष्टी हर्ष बहू झाला ।
सांडुनियां लौकीक लज्जा वास पदीं केला ॥
भक्ताभिमानी अससि दयाळा मजला राखीसी ॥ अगम्य० ॥ ४ ॥
परब्रह्म हें रूप खरोखर सद्गुरुचें खास ।
वर्णन करितां मुका राहिला सहस्रमुखी शेष ॥
अद्वैताची साधुनि जोडी विनवितसे दासी ॥ अगम्य ॥ ५ ॥

[ ४ ]

दीनदयाळा भक्तवत्सला दाखवि पाऊलें ।
हातीं आरति घेउनि द्वारीं तिष्ठत मी बसलें ॥ धृ० ॥
लक्ष चौऱ्यांशी फेरे फिरुनी श्रम बहु जाहले ।
नरदेहासी येउनि आतां नेत्र उघडीले ॥
सार्थक कांहीं व्हावें म्हणुनी गुरुशी वंदियलें ॥ दीन० ॥
सद्गुरुरायें ज्ञानांजन नेत्रीं घालविलें ।
द्वेष सर्व जाइल विलया ऐसें बोधियलें ॥
ब्रह्मरूप हें एक असें तूं आम्हां दाखविलें ॥ दीनदया० ॥ २ ॥
ज्ञानाग्नि हा सिद्ध करूनी उजळीली ज्योत ।
मी माझें हें समुळ काढुनि ओतियलें घृत ॥
सोहंभाव चरणी अर्पुनि स्वरुपिं लीन झालें ॥ दीन० ॥ ३ ॥
अंतःकरणीं अनुहातध्वनि घणाघणा चाले ।
अणूरेणूपासुनि सारें ब्रह्मरूप भरलें ॥
स्वरुपिं विरतां सावित्रीचें सुखदुःख हरलें ॥ दीन० ॥ ४ ॥
आतां येणें जाणें नलगे सहजचि हें झालें ।
जिवाशिवाचें ऐक्य करोनी मौनी राहियलें ॥ दीन० ॥ ५ ॥

[ ५ ]

श्री सिद्धारूढराया मन्मन हें विमल करी ॥ धृ० ॥
जडलें प्रपंचि त्यांतुनि काढी तें । जडवि तत्क्षणीं तव पदिं आधीं तें ॥
तव पादामृत पाजुनि त्यातें । दुस्तर हा भवसिंधु तराया ॥ श्रीसिद्धा० ॥ १ ॥
मिथ्या प्रपंच किं सत्य गणावा । त्यामाधिं कैसा जीव तरावा ॥
बंध किं मोक्ष हा स्पष्ट कळावा । ऐसें ज्ञान तुं देइं दिना या ॥ श्रीसिद्धा० ॥ २ ॥

कोण्या देवालागीं भजावें । ज्ञानें किं भवें त्या अळवावें ॥ ६
ब्रह्म कसें तें न पडे ठावें । अन्य न तुजसम हें विराया ॥ श्रीसिद्धा० ॥ ३ ॥
इच्छित इतुकें हें पुरवावें । चंचल मन हें स्थीर करावें ॥
तव पदकमलीं भावें रिझावें । ध्यान करी तव लक्ष्मीतनया ॥ श्रीसिद्धा ॥ ४ ॥

[ ६ ]

हुब्बळि ग्रामा धन्यचि केलें; सिद्धारूढाख्या धरुनी ।
सद्गुरुरत्नहि भलें लाभलें, भावें ध्यावें उमजोनी ॥ धृ० ॥
सन्मुद्रा ती पाहुनि प्रेमळ, ज्ञानरवीचा उदय जनीं ।
अज्ञानातें दूर कराया, झाला ऐसें गमत मनीं ॥ १ ॥
म्हणुनि मनाची ओढ लागली, गुरुचरणीं त्या रात्रदिनीं ।
भवोदधींतुनि तारिशि भक्तां, शिवनामामृत पाजोनी ॥ २ ॥
चिद्रुप चिन्मय मूर्ति मनोहर, म्हणती भजती हो ज्ञानी ।
सद्गुरुमहिमा अगाध आहे, वर्णु कशी त्यालागोनी ॥ ३ ॥
मंदमती परी वंदन माझें आरुढचरणा दृढ धरुनी ।
तारिं तारिं मज सद्गुरुनाथा, कृपाकटाक्षें पाहोनी ॥ ४ ॥
भवसिंधूतुनि पार पडावा, नाव नसे त्वत्कृपेहुनी ।
पैलतिरासी कधीं नेशिल बा, लक्ष्मीतनुजा चिंति मनीं ॥ ५ ॥

[ ७ ]

किती गोड ध्यान तें श्रीसद्गुरुचें । हृन्नयनीं पाहतां चित्सुख साचें ॥ धृ० ॥
नेत्र सफल हे श्रीमुख पाहुनी । विमल शीर्ष हें त्वत्पद वंदुनी ॥
श्रवण पुनित तव स्तुति ऐकोनी । त्वत्स्मरण करितसे पुनितचि वाचे ॥ १ ॥
हस्त शुची तव सेवा अर्चनीं । पाद शुची तव सन्निध तिष्ठुनी ॥
अनन्यभावें शरण रिघोनीं । रक्षण करू मज रज तव पदिंचे ॥ किती ॥ २ ॥
सिद्ध ब्रह्मानंदाऽभिधानी । भूलत* गौरीपुर वसवोनी ॥
दीनोद्धारक ब्रिद समजोनी । ध्यान असो मनिं मातनयेचें‡॥ किती० ॥ ३ ॥

[ ८ ]

इस दुनयेका पालनवाला भगवत् दीन दयाल कहो ।
सदा उसीका ध्यान लगाकर परब्रह्ममें सुखी रहो ॥ धृ० ॥

---

* हुब्बळी शहर. ‡ लक्ष्मीच्या मुलीचें.

अजब तुडाखा जमका लडका चूकर तुमने देखाहै ।
पलख घडीमें निकल जायगा जान घडीका सवदा है ॥
कोन तुमारे भाई बेटा कोन तुमारी माता है ।
कोन तुमारे जोरू लडके भगवत्‌की सब माया है ॥ १ ॥
गाडी घोडा महाल बगीचा मेरा मेरा तूं कहता ।
ना हो तेरा ना हो मेरा भूलनकी हे है बाता ॥
पैसा पैसा करके कैसा नंगे फिरता तूं जाता ।
कोन तुमारे साथ चलेगा धरम अकेलाही आता ॥ २ ॥
बेटा तेरा वदन एक दिन मट्टिबराबर मिलजाता ।
मट्टिका तो मिसलवनाया मट्टिबराबर हो जाता ॥
खाना पीना भोग बिछाना चमन उडाना सब दिन है !
भगवत् का कुछ ध्यान घडीभर करना तुझकू मुष्किल है ॥ ३ ॥
दास सखीका सवाल सुनिये भाई मनमे शोच करो ॥
गुणिजन पालन भगवत् गावन घडी घडीका प्रेम धरो ॥ ४ ॥

[ ९ ]

गुरुरायचरण नमितां हो । भिड काय तुह्मी धरितां हो ॥
मोक्षचि हा जवळी असतां सोडुनि कां जातां ॥ १ ॥
किति प्रपंचासि तुह्मि जपतां । त्यांत काय मिळालें हातां ॥
व्यर्थचि त्या मोहजळामाधिं काय तुह्मी पडतां ॥ २ ॥
किति एक मुलाचे आशे । किति विषयाचे अभिलाषे ॥
जमताति बकध्यानी पैर मैद । जसे खांसे ॥ ३ ॥
सुख वाटे परि तें खोटें । किति दुःख सांगु मज मोठें ॥
श्रीगुरुच्या चरणीं लागा परमानंद साठे ॥ ४ ॥
सकलांसि विनंती माझी । गुरुचरण नमा आजी ॥
प्रार्थितसे दासाचि घ्या तुह्मी सार यांतलें जी ॥ ५ ॥

[ १० ]

शिव शिव शंकर हरहर शंकर अर्धांगी नटला ।
नमि दास हा पदीं ठेवुनी शिर कमला ॥ धृ० ॥

गुण गाऊं शिव ध्याऊं भक्तसमुह जमला, मज भक्त समुह मिळला ।
ब्रह्मानंदें डुलूनि जातां भ्रांतिमधें पडला ॥ १ ॥
तें देखोनी अवचित गुरुनें कर माझा धरिला, गुरूनें कर माझा धरिला ।
भ्रांती पडदा दूर करोनी वरद हस्त दिधला ॥ २ ॥
प्रसन्न होउनि कृपा दृष्टिनें अवलोकिलें मजला, गुरूनें अवलोकिलें मजला ।
स्वस्वरूपीं ठेवुनि भिन्नभाव नाहीं उरला ॥ ३ ॥
पुनरपि जनना पुनरपि मरणा भीत नाहिं त्याला, गुरू हा भीत नाहिं त्याला ॥
शिव शिव तुजला हेंच मागणें विसर न नामाला ॥ ४ ॥

[ ११ ]

उठा उठा तुम्हि गुरुच्या स्मरणीं । घेउनि दर्शन नमुया चरणा ॥ १ ॥
कां मनिं वाहतां ही भवचिंता । जाऊं गुरुशीं शरणचि आतां ॥ २ ॥
सर्वहि मायिक मिथ्या वदतां । विश्वासा तुम्ही मग कां धरितां ॥ ३ ॥
या फेऱ्यांतुनी तरुनी जाया । नामचि हे *तरी श्रेष्ठ †खरी या ॥ ४ ॥
संतसमागम नित्य असावा । त्यांच्या कार्यी देह झिजावा ॥ ५ ॥
भ्रम टाकुनियां कर सुविचारा । गुरुवांचोनी देव न दुसरा ॥ ६ ॥
दासाची या विनति तुम्हाला । विसरुं नका त्या गुरुचरणाला ॥ ७ ॥

[ १२ ]

स्वामी राया हुबळीवीसा । सख निद्रा केव्हां घेसी ॥
भक्तासाठीं शिणलासी । प्रार्थी बालक चरणापासीं ॥ १ ॥
ब्रह्मा विष्णु महादेवा । सुरगण करिती तुझी सेवा ॥
तूंचि स्वानंदाचा ठेवा । विश्वपती देवाधिदेवा ॥ २ ॥
प्राणीमात्रा जन्म देसी । सृष्टिस्थितीलया करिसी ॥
सर्वहि तीर्थें तुजपाशीं । गोकुळ मथुरा माया काशी ॥ ३ ॥
कलानिधे ते जोराशी । विद्यासृष्टीपति होसी ॥
शरणागता उद्धरीसी । गुरूमुर्ती तूं संन्यासी ॥ ४ ॥
स्वामी अद्वय परमानंद । निर्गुण आनंदाचा कंद ॥
जिकडे तिकडे कीर्तीगंध । भक्त सेवुन घेती छंद ॥ ५ ॥

---

* नाव. † ह्या प्राण्यांना.

करवीरक्षेत्रींचा निवासी । अर्पी भावें रुवंरत्रासी ॥
सेवासुख यावें त्यासी । विनवी प्रेमें दासानुदासी ॥ ६ ॥

[ १३ ]

माझी देवपुजा देवपुजा । पाय तुझे गुरुराजा ॥ धृ० ॥
गुरुचरणाची माती । तेचि माझी भागीरथी ॥ माझी देव ॥ १ ॥
गुरुचरणाचा बिंदु । तोचि माझा क्षीरसिंधु ॥ माझी देव ॥ २ ॥
गुरुचरणाचें ध्यान । तेंचि माझें संध्यास्नान ॥ माझी देव ॥ ३ ॥
शिवादिन केसरि पायीं । सद्गुरुवांचुनि दैवत नाहीं ॥ माझी० ॥ ४ ॥

[ १४ ]

धन्य धन्य हे प्रदाक्षिणा सद्गुरुरायाची ॥
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ धृ० ॥
गुरुभजनाचा माहिमा नकळे आगमा निगमासी ॥
अनुभविते जाणती जे गुरुपदिंचे अभिलाषी ॥ १ ॥
पदोपदीं अपार झाल्या पुण्याच्या राशी ॥
सर्व तीर्थे घडलीं आम्हां आदिकरुनि काशी ॥ २ ॥
मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती ॥
नाम संकीर्तनें नित्यानंदें नाचती ॥ ३ ॥
कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ॥
लोटांगण घालतां मोक्ष लोळे पायांत ॥ ४ ॥
प्रदक्षिणा करुनि देह भावें वाहीला ॥
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥ ५ ॥

[ १५ ]

## आरती.

जयदेव जयदेव जयचिन्मयमूर्ते ।
सिद्धारूढस्वामिन् सच्चित्सुखपूर्ते ॥ धृ० ॥
साधनचतुष्क साधुनि कर्मविलय करिसी ॥
शोधुनि सद्गुरु हंसाश्रित जनी उद्धरिसी ॥

शरण आलियासी ॥

सहजें स्वस्वरुपीं नेसी ॥ जयदेव जयदेव ॥ १ ॥

वाक्यज्ञान प्रमुदित निजहृदया ॥

योगाचार्या योगीवृंदसमपर्या ॥

शंकर निष्ठित भाव प्रतिशंकरवर्या ॥

जीवन्मुक्तानंता ओवाळूं सदया ॥ जयदेव जयदेव ॥ २ ॥

आंतरबाह्यीं समता दंभातीतमत्ता ॥

ब्रह्मज्ञानें शाश्वत ब्रह्मानंदिं रता ॥

मुनिजनमानसहंसा प्रकृतिगुणातीता ॥

जलबिंद्रंभो निधिवत् परमात्मीं निरता ॥ जयदेव ॥ ३ ॥

भेदाभेदा त्यागुनि नास्तिक संहरसी ॥

श्रितजनरक्षण करुनी सौख्यपदा नेसी ॥

धर्मावनति दूर कराया सिद्ध सदा असता ॥

भवभयसंहाराया शिव अवतरलासी ॥ जयदेव ॥ ४ ॥

[ १६ ]

आरती करा हो सज्जना द्वैतभाव टाकुनी ॥ आरती करा हो० ॥

विवेक सद्बुद्धि, सद्बुद्धि, लक्ष ठेवुनी पदीं । अंतःकरुणा हो ॥

मनबुद्धि देहातीत तुम्हि शोधी ॥ आरती करा ॥ १ ॥

इडा पिंगला सुषुम्ना मार्ग आहे कठीण ॥ त्रिकुटसंगमा ॥

मज्जना महालिंगदर्शना ॥ आरती करा हो ॥ २ ॥

चिन्मय गुरुमूर्ति गुरुमूर्ति अणूरेणू भासती ॥ बुद्धि ध्यास ती ॥

निजज्योती गुरुपुत्र जाणति ॥ आरती करा हो ॥ ३ ॥

[ १७ ]

ज्याच्या कृपेनें निज लाभ झाला । देहत्रयाचा जडभार गेला ॥

निरामय ऐसा मज बोध केला । विसरूं कसा मी गुरुपादुकाला ॥ १ ॥

स्वरूप माझें मज दाखविलें । भावाअभावाविरहीत केलें ॥

उपकार ज्यानें मज पूर्ण केला । विसरूं कसा मी गुरुपादुकाला ॥ २ ॥

…वैस्त्रासी ॥
स्वानंदडोहीं मन कालविलें । हातीं धर… उदासी ॥ ६ ॥
हा बोध ज्याणें मज पूर्ण केला । विसरूं ॥ ३ ॥
प्रसादकाळीं मति शुद्ध झाली । दुर्बुद्धि माझी विसरूनी ॥
संसार ज्यानें स्मशान केला । विसरूं ॥ ४ ॥
जन्मांतरेंही बहु चूकविले । जिवा शिवाशी पदमावळीलें ॥
सखाचि ज्यांहो गुरुपूर्ण केला । विसरूं ॥ ५ ॥
आत्माचि माझा मज दाखविला । सोहं प्रकाशें मज भेटविला ॥
जिव शिव तेथें विरोनि गेला । विसरूं ॥ ६ ॥
धरोनि मातें निवांत केलें । ठेवोनि पोटीं परिवार नेलें ॥
सांगोनि वाक्यें उपदेश केला । विसरूं ॥ ७ ॥
अखंड माझे हृदयीं रहावें । स्वभावदृष्टी परिपूर्ण पहावें ॥
टाकोनि मातें दुर नाहिं गेला । विसरूं ॥ ८ ॥

## [ १८ ] विनवणी अभंग.

विनवणी माझी स्वामी गुरुराया । कर जोडोनियां पायापाशीं ॥ १ ॥
नसे भाव भक्ति असें ज्ञानावीण । मंद मी अज्ञान दास तूझा ॥ २ ॥
काम क्रोध मद षड्रिपू झोंबती । होतसे फजिती अनिवार ॥ ३ ॥
क्षमा दया शांती वसे तुझ्या अंगीं । तूंच वीतरागी स्वामी माझा ॥ ४ ॥
सेवा तुझी देवा नित्य मज घडो । नामामृत पडो मुखीं माझ्या ॥ ५
अनन्यभावानें शरण मी आलों । मायेंत बुडालों वर काढी ॥ ६ ॥
कन्या पुत्र बंधु आणिक सोयरे । तुजवीण खरें कोणी नाहीं ॥ ७ ॥
तूंचि मातापिता तूंचि ज्येष्ठ भ्राता । तुझी सर्व सत्ता चहूंकडे ॥ ८ ॥
तुझिया सत्तेनें सर्व कांहीं घडे । धांव मजकडे सिद्धराया ॥ ९ ॥
उदार दयाळू कोमळ मनाचा । सुकाळ कृपेचा करी आतां ॥ १० ॥
नाहीं शक्ति मज तूज वर्णावया । वर्णन कराया तूंचि योग्य ॥ ११ ॥
बालकासी आतां धीर धरवेना । दीनाची करूणा येऊं द्यावी ॥ १२ ॥

## [ १९ ] विडा.

विडा घ्या हो स्वामी गुरुराया । तूंचि विश्रांतीची छाया ॥
अर्पितसे स्वीकार कराया । समर्थ तूं योगीराया ॥ ध्रु० ॥